पश्चिम विदर्भातील सर्वाधिक अग्रगण्य सायं दैनिक

# सिटी न्यूज सुपरफास्ट

अकोला • वर्ष १६ • अंक २२ • मंगळवार, दि. २८ जुलै २०२६ • मूल्य ५ • पृष्ठे ८

RNI No.- MAHMAR/2012/49642 Postal Regn. No. AKL DN/283/2024-26 Web. https://epaper.citynewssuperfast.com




## सुविचार

" विचार सकारात्मक असतील तर आयुष्यातील प्रत्येक कठीण प्रसंग सोपा वाटू लागतो."

## »थोडक्यात

### पंतप्रधान नरेंद्र मोदींचा 'तो' व्हिडीओ फेसबुकने हटवला!

दिल्ली : पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आंदोलक विद्यार्थ्यांसाठी गुरुवारी मध्यरात्री शेअर केलेला व्हिडिओ फेसबुकवरुन अल्प काळासाठी हटवल्याने मोठा गदारोळ उडाला होता. हा व्हिडिओ काही वेळानंतर पुन्हा रिस्टोअर करण्यात आला असून मेटाने माफी मागितली आहे. तांत्रिक अडचणींमुळे हा व्हिडिओ रिमूव्ह करण्यात आल्याची माहिती आहे. 'मेटा'च्या प्रवक्तäयांनी निवेदनात म्हटले आहे की, 'तो व्हिडिओ चुकून हटवण्यात आला होता. आता तो पूर्ववत करण्यात आला आहे.' परंतु केंद्र सरकार या प्रकाराची तपासणी करत आहे. तात्पुरत्या स्वरुपात हटवलेल्या व्हिडिओबाबत स्पष्टीकरण देण्यासाठी 'मेटा'च्या अधिकाऱ्यांना समन्स बजावण्यात आले आहेत.

### 'त्या' आरोपांत काही तथ्य नाही, सीईटी सेलकडून खंडन!

नवी दिल्ली : नीटचे प्रकरण शांत होतं ना होतं तोच आता राज्यात नीट पेक्षाही एमएचटी-सीईटी मध्येही महाघोटाळा झाल्याचा आरोप विरोधकांनी केला असून त्यामुळे पुन्हा खळबळ माजली आहे. राष्ट्रवादीचे महादेव बालगुडे यांनी एका शिक्षकाचा व्हिडिओ त्यांच्या सोशल मीडिया एक्स हँडलवरून शेअर केला आहे. सीईटी सेलकडून या आरोपांचं खंडन करण्यात आलं आहे. सोशल मीडियावरील आरोपांमध्ये काहीही तथ्य नाही, असं म्हणत सीईटी सेलचे आयुक्त सरदेसाई यांनी स्पष्टीकरण दिलं आहे. काही विद्यार्थी बोर्डापेक्षा सीईटीला जास्त प्राधान्य देतात, त्यामुळे त्यांना सीईटी परीक्षेत जास्त गुण असतात.

### विजयासोबत नम्रताही असली पाहिजे!

नवी दिल्ली : केंद्रीय शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान यांचा राजीनामा हे कॉकरोच जनता पार्टीचं मोठं यश आहे. त्यामुळे सीजेपीने या आंदोलनचा जोरदार सेलिब्रेश केलं. त्याचे व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल झाले. खरंतर या आंदोलनाला ओळख मिळाली ते सोनम वांगचूक यांच्यामुळे. ते २६ दिवस आमरण उपोषणाला बसले होते. सीजेपीच्या सेलिब्रेशनचे हे जे व्हिडिओ आता व्हायरल झालेत, त्यावर सोनम वांगचूक यांनी प्रतिक्रिया दिली आहे. वांगचूक यांनी सर्व समर्थकांना प्रतिमा, संयम आणि जबाबदारीने सेलीब्रेशन करण्याचं आवाहन केलं आहे.

# शहरातील किती जागांवर ड्राफ्ट्समन एरर....!

## क्रिम जागेवरचा ग्रीन झोन मोकळा कधी होणार



प्रतिनिधी २८ जुलै

**अकोला:** अकोला शहरातील रुक्मिणी नगर परिसरातील अत्यंत मोक्याच्या आणि मौल्यवान मानल्या जाणाऱ्या खेळाच्या मैदानाच्या जागेचा 'गेम' करण्याचा प्रयत्न अखेर पुरता फसला आहे !. नगर रचना विभाग आणि प्रशासनाच्या वरिष्ठ स्तरावरून झालेल्या महत्त्वपूर्ण घडामोडींनंतर, अकोला महानगरपालिकेने अखेर कडक भूमिका घेत विवादित 'आरेखकीय चूक' दुरुस्तीचे आदेश रद्द करण्याची दणकेबाज कारवाई सुरू केली आहे. या धडक निर्णयामुळे कोट्यवधींच्या सार्वजनिक जमिनीवर डोळा ठेवून बसलेल्यांचे धाबे दणाणले आहेत. पण, शहरात अशा प्रकारच्या किती जागांवर ड्राफ्ट्समन एरर 'आरेखकीय चूक' आहे. याचा शोध घेण्याची गरज आहे. यात शहरातील बड्या बिल्डर, राजकीय नेत्यांच्या जमीनी असल्याची धक्कादायक माहिती समोर आली आहे. शहरातील विविध ड्राफ्ट्समन एरर ची माहिती लवकरच सिटी न्यूज सुपरफास्ट अकोलेकरांसमोर मांडणार आहे.

### जनतेचा उद्रेक आणि शासनाला माघार!

» मेन पोस्ट ऑफिस कडून सिव्हिल लाईन्स चौकाकडे जातानाची ही जागा असून सार्वजनिक वापराचे मैदान खासगी घशात घालण्याच्या या आदेशानंतर नागरिक आणि लोकप्रतिनिधींमध्ये प्रचंड संताप पसरला आहे. या अन्यायाविरोधात राज्य शासनाकडे तक्रारी आणि निवेदनाचा भडीमार झाला. प्रकरणाचे गांभीर्य लक्षात घेत नगर विकास विभागाने १८ मार्च २०२६ रोजी पुन्हा कागदपत्रांची छाननी करण्याचे निर्देश दिले. महापालिकेने ८ जून २०२६ रोजी स्पष्ट मार्गदर्शनाचा प्रस्ताव शासनाकडे पाठवला. अखेर, शासनाच्या नगर विकास विभागाने १६ जून २०२६ च्या पत्राद्वारे (जे मनपाला १८ जून २०२६ रोजी प्राप्त झाले) अकोला महापालिकेला २१ जानेवारी २०२५ रोजी केलेला बेकायदेशीर/विवादित आदेश तात्काळ रद्द करण्याचे थेट निर्देश दिले आहेत.

### आता मैदान पुन्हा जनतेचेच !, पण केव्हा ?

» शासकीय आदेश प्राप्त होताच अकोला महानगरपालिकेने २१ जानेवारी २०२५ चा आदेश रद्द करण्याची कायदेशीर प्रक्रिया दणक्यात सुरू केली आहे. त्यामुळे १४१३.३३ चौरस मीटरची ही मोकळी जागा पुन्हा एकदा अधिकृतपणे 'ग्रीन झोन' म्हणजेच खेळाचे मैदान म्हणूनच कायम राहणार आहे. अशी माहिती महापालिकेचे नगररचनाकार साबळे यांनी आर आर सी न्यूज सोबत बोलताना दिली. हा जर ग्रीन झोन आहे तर तो खाली का करण्यात आला नाही अशी विचारणा आता होत आहे. त्यावर कारवाई कधी होणार, या प्रकरणात आरडा ओरड करणारे नगरसेवक ही चुप बसले असून त्यांची मवाळ भूमिका बरेच काही सांगून जात आहे. झोन अधिकाऱ्यांची या सर्व प्रकरणात चुप्पी असून महापालिका आयुक्तांनी लक्ष देण्याची मागणी होत आहे.

## 80 कैद्यांपैकी दोन अद्याप परतले नाहीत ?

अकोला : कोविड-१९ महामारीच्या काळात कारागृहांमधील गर्दी कमी करण्यासाठी शासनाच्या निर्देशानुसार अकोला जिल्हा कारागृहातून ८० कैद्यांना तात्पुरत्या जामिनावर (बेल) सोडण्यात आले होते. तसेच ४७ कैद्यांना अभिवचन रजा मंजूर करण्यात आली होती. विशेष म्हणजे, अभिवचन रजेवर गेलेल्या सर्व ४७ कैद्यांनी नियोजित मुदतीत कारागृहात परत येऊन नियमांचे पालन केले. मात्र, बेलवर सुटलेल्या ८० कैद्यांपैकी दोन कैदी अद्याप कारागृहात परतलेले नसल्याची माहिती समोर आली आहे. कारागृहाच्या नोंदीनुसार, परत न आलेल्या कैद्यांमध्ये खदान पोलीस स्टेशन हद्दीतील,तर दूसरा अकोट फैल पोलीस स्टेशन हद्दीतील कैदी आहे. या प्रकरणाची पडताळणी करण्यासाठी संबंधित खदान आणि अकोट फैल पोलीस ठाण्यांशी संपर्क साधला असता, या दोन्ही कैद्यांबाबत किंवा त्यांच्या शोधासंदर्भात कोणतीही माहिती उपलब्ध नसल्याचे सांगण्यात आले. त्यामुळे कारागृह प्रशासनाने या प्रकरणी संबंधित पोलीस ठाण्यांना अधिकृतरीत्या कळविले होते का, तसेच त्यानंतर कोणती कार्यवाही झाली, याबाबत प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. कोविड काळात अनेक कैद्यांना तात्पुरता दिलासा देण्यात आला होता. बहुतांश कैद्यांनी नियमांचे पालन करून कारागृहात पुनरागमन केले. मात्र, दोन कैदी अद्याप परतले नसतानाही संबंधित पोलीस यंत्रणेकडे त्याबाबत स्पष्ट माहिती नसल्याचे समोर आल्याने प्रशासनातील समन्वयावर प्रश्न उपस्थित होत आहेत.

# मुख्य सूत्रधार गौरव शर्माच्या शोधासाठी स्थानिक गुन्हे शाखेची 2 ते 3 पथके रवाना



प्रतिनिधी २८ जुलै

अकोला : एमआयडीसी परिसरातील कोट्यवधी रुपयांच्या दोन अवैध गुटखा फॅक्टरींवर अन्न व औषध प्रशासन आणि स्थानिक गुन्हे शाखा यांनी संयुक्त धाड टाकून मोठी कारवाई केली होती. या प्रकरणात मुख्य सूत्रधार म्हणून गौरव शर्मा यांच्या विरोधात गुन्हा दाखल असून १३ दिवस उलटले तरी तो अजूनही फरार आहे. यावर अकोला पोलिसांनी आपली बाजू स्पष्ट केली आहे. स्थानिक गुन्हे शाखेचे प्रमुख नितीन लव्हलेकर यांनी दिलेल्या माहितीनुसार, एमआयडीसी गुटखा प्रकरणात अकोला पोलिसांकडून वेगाने कारवाई सुरू आहे. या प्रकरणात मुख्य आरोपी गौरव शर्मा, त्याचे वडील अशोक शर्मा आणि इतर सहआरोपींवर गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. आरोपी



अशोक शर्मा यांना पोलिसांनी आधीच अटक केली आहे. तसेच, मुख्य आरोपी गौरव शर्मा अजूनही फरार असून त्याच्या अटकेसाठी स्थानिक गुन्हे शाखेची २ ते ३ विशेष पथके विविध ठिकाणी रवाना करण्यात आली आहेत. तो लवकरच पोलिसांच्या जाळ्यात येईल आणि त्याच्यावर कठोर कायदेशीर कारवाई केली जाईल, असा विश्वास पोलिसांनी व्यक्त केला आहे. दरम्यान, अन्न व औषध प्रशासनाचे प्रमुख तुकाराम मुंढे १ ऑगस्ट रोजी अमरावतीत येत आहे. तत्पुर्वी गौरव शर्मा ला अटक होते की नाही हे पाहण्यासारखे असेल.

# माओवादी नेता मिसिर बेसराच्या अंगरक्षकासह 24 जण शरण!

प्रतिनिधी २८ जुलै

गडचिरोली : सुरक्षा दल व पोलिसांच्या वाढत्या दबावामुळे जहाल माओवादी नेता मिसिर बेसरा. निघालेल्या कथित देशभरात अस्ताकडे माओवादी चळवळीतील शेवटचा सक्रिय सर्वोच्च नेता मिसिर बेसरा याची झारखंडच्या सारंडा जंगलात अन्नावाचून कोंडी झाली होती. मोजक्या माओवाद्यांसह तो या जंगलात भटकत असतानाच आता त्याच्या अंगरक्षकासह एकूण २४ जणांनी त्याची साथ सोडून मुख्य प्रवाहात येण्याचा निर्णय २७ जुलै रोजी घेतला. त्यामुळे मिसिर बेसराला मोठा हादरा बसला आहे.

पोलिस सूत्रांच्या माहितीनुसार, आत्मसमर्पण करणाऱ्या दोन डझन माओवाद्यांचा समावेश आहे. यामध्ये झारखंडचे १६ आणि शेजारील छत्तीसगडमधील ८ माओवाद्यांचा समावेश आहे. या आत्मसमर्पण करणाऱ्यांवर झारखंड सरकारचे एकूण ३९ लाखांचे इनाम घोषित होते. यात एका माओवाद्यावर १५ लाख, एकावर १० लाख, दोघांवर ५-५ लाख आणि अन्य दोघांवर २-२ लाखांचे बक्षीस होते. दरम्यान, पोलिसांच्या सततच्या अभियानामुळे माओवाद्यांना जंगलाबाहेर पडणे कठीण बनले आहे, अशा स्थितीत जवळचे धान्य संपल्याने मोठी कोंडी झाली आहे. त्यामुळे मिसिर बेसरानेच आपल्या साथीदारांना आत्मसमर्पणाचा सल्ला दिल्याचीही जोरदार चर्चा आहे. छत्तीसगड आणि महाराष्ट्र राज्यातील नक्षलग्रस्त सीमावर्ती भागात सुरक्षा यंत्रणा अधिक आक्रमक होणार असून, दोन्ही राज्यांच्या पोलिस दलांनी नक्षलविरोधी कारवायांसाठी संयुक्त रणनीती आखली आहे. नारायणपूर येथे २७ जुलै रोजी पार पडलेल्या उच्चस्तरीय आंतरराज्यीय समन्वय बैठकीत यासंदर्भातील महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आले आहेत.

# आमच्याकडचे बहुतांश लोक लढायला तयार!

प्रतिनिधी २८ जुलै

**मुंबई :** शरद पवार हे जंतर मंतरवरील विद्यार्थ्यांच्या अडचणी सोडवण्यासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना भेटले होते. ते राष्ट्रीय लोकशाही आघाडीसोबत (एनडीए) जाणार नाहीत, असे स्पष्टीकरण राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे आमदार रोहित पवार यांनी दिले आहे. ते मंगळवारी मुंबईत प्रसारमाध्यमांशी बोलत होते.

दिल्लीत अलीकडेच प्रफुल पटेल आणि पार्थ पवार यांनी शरद पवार यांची भेट घेतल्याची माहिती समोर आली होती. त्यानंतर दोन्ही राष्ट्रवादी काँग्रेसच्या विलिनीकरणाच्या प्रक्रियेला पुन्हा सुरुवात झाल्याच्या चर्चांना उधाण आले आहे. मात्र, रोहित पवार यांनी ही शक्यता फेटाळून लावली. यावेळी त्यांनी शरद पवार हे एनडीएसोबत जाणार असल्याच्या वृत्ताचा इन्कार केला. विद्यार्थ्यांच्या अडचणी



सोडवण्यासाठी शरद पवार मोदींना भेटले. युवा वर्गावर होणारा अन्याय त्यांनी मांडला आहे. सुप्रिया सुळे या अमित शाह यांना भेटल्या. १० ऑगस्टला दिल्लीत रेवती सुळे-सारंग लखानी यांच्या लग्नाचे रिसेप्शन होणार आहे. त्या कार्यक्रमाला खासदार केंद्रीय मंत्री देखील येणार आहेत. शरद पवार एनडीएसोबत जाणार नाहीत. आमच्याकडचे बहुतांश आमदार-खासदार लढाईला तयार आहेत. मी लोकांसोबत, विचारासोबत राहिलो आहे. त्यामुळे पुढे जाऊन देखील मी लढणार आहे. एनडीए सोबत मी जाणार नाही, असे रोहित पवार यांनी ठणकावून सांगितले. सीईटी सेलचा मुद्दा आमच्याकडे देखील आला आहे.

# दिल्ली पोलिसांच्या लाठीमारची चौकशी होणार!

## सरन्यायाधीश सूर्यकांत विद्यार्थ्यांवर कारवाई नको

प्रतिनिधी २८ जुलै

नवी दिल्ली : नीट पेपरफुटी प्रकरणी दिल्लीच्या जंतर मंतर येथे कॉकरोच जनता पार्टी आणि विद्यार्थ्यांनी केलेल्या आंदोलनावेळी २० जुलैला पोलिसांनी बेछूट लाठीमार केला होता. संसद भवनाच्या दिशेने निघालेल्या आणि जंतर मंतरवरील विद्यार्थ्यांवर पोलिसांनी अमानुषपणे लाठीमार करुन अनेकांची डोकी फोडली होती, काहींना जखमी केले होते. यानंतर दिल्ली पोलिसांनी जंतर मंतरवरील आंदोलकांवर गुन्हे दाखल करायचा आणि त्यांना अटक करण्याचा सपाटा लावला होता. कॉक्रोच आंदोलनावर सर्वोच्च न्यायालयात सुनावणीला मंगळवारी सुरुवात झाली. यावेळी सरन्यायाशीध सूर्यकांत यांनी दिल्ली पोलिसांकडून करण्यात आलेल्या लाठीमाराची गंभीर दखल घेत महत्त्वाचे आदेश दिले. दिल्ली पोलिसांच्या लाठीमाराची चौकशी करण्याला आणि जबाबदारी निश्चित करण्याला न्यायालयाने परवानगी दिली आहे. तसेच सर्वोच्च न्यायालयाने महाराष्ट्रासह सात राज्यांना नोटीस पाठवून नीट आंदोलनातील विद्यार्थ्यांच्या एफआयआरवर पोलिसांनी तपास सुरू ठेवावा पण दंडात्मक कारवाई नको, असे निर्देश दिले आहेत. तसेच ज्यांचे जुने क्रिमिनल रेकॉर्ड नाहीत त्यांना अटकेत ठेवू नये, अशा स्पष्ट सूचना दिल्या आहेत.




# 10 आणि 20 रुपयांच्या प्लास्टिक नोटा येणार

## लोकसभेत प्रस्ताव पास आरबीआयच्या पॉलिमर नोटांला केंद्राची मंजुरी!

प्रतिनिधी २८ जुलै

**नवी दिल्ली :** भारतात लवकरच १० आणि २० रुपयांच्या प्लास्टिक (पॉलिमर) च्या नोटा पाहायला मिळू शकतात. केंद्र सरकारनं रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाच्या पॉलिमर नोटांच्या पायलट प्रोजेक्टला मंजुरी दिली आहे. ज्यानुसार १० आणि २० रुपयांच्या १००-१०० कोटी पॉलिमर नोटा चाचणीसाठी जारी केल्या जातील. ही चाचणी यशस्वी ठरल्यास पॉलिमर नोटा मोठ्या प्रमाणात जारी करण्यासंदर्भात निर्णय घेतला जाऊ शकतो. केंद्रीय वित्त राज्यमंत्री पंकज चौधरी यांनी लोकसभेत लेखी उत्तरात यासंदर्भात माहिती दिली. आरबीआयच्या पॉलिमर नोटांच्या प्रस्तावाला मंजुरी देण्यात आली आहे. आता फक्त हा एक पायलट प्रोजेक्ट आहे. भारतातील हवामान आणि परिस्थितीत प्लास्टिक नोटा किती टिकाऊ आणि उपयुक्त ठरतात हे पाहिलं जाणार आहे. लोकसभेत वित्त राज्यमंत्री पंकज चौधरी यांनी दिलेल्या माहितीनुसार, सरकारने १० आणि २० रुपयांच्या पॉलिमर बँक नोटांना मंजुरी दिली आहे. भारतीय रिझर्व बँकने आपल्या केंद्रीय संचालक मंडळाच्या शिफारशीवरून, रिझर्व्ह बँक अधिनियम, १९३४ च्या कलम २५ अंतर्गत सरकारला १० आणि २० रुपये मूल्यवर्गाच्या प्रत्येकी एक अब्ज (१०० कोटी) पॉलिमर बँक नोटांच्या फील्ड ट्रायलसाठी आणि ट्रायल यशस्वी झाल्यानंतर या मूल्यवर्गांमध्ये नियमितपणे पॉलिमर नोट्स जारी करण्याचा प्रस्ताव पाठवला होता. या प्रस्तावाला सरकारने मंजुरी दिली आहे. आरबीआयचा पायलट प्रोजेक्ट यशस्वी झाला तर भारतीय मुद्रण व्यवस्थेत एक मोठा बदल होऊन नोटा छापण्याचा खर्च दीर्घकाळासाठी कमी होऊ शकतो.



### भारतात प्रायोगिक पातळीवर वापर होणार सुरू

» आरबीआयच्या मते पॉलिमर नोटा सध्या चलनात असलेल्या कागदी नोटांच्या तुलनेत अधिक मजबूत आणि दीर्घकाळ टिकतात. काही देशांमध्ये प्लास्टिकच्या नोटांचा वापर सुरु आहे, त्याचे चांगले परिणाम पाहायला मिळाले आहेत. भारतात त्याचा प्रायोगिक पातळीवर वापर सुरु होईल.

### १०, २० च्या पॉलिमर नोटा राहणार चलनात

» प्लास्टिक नोटांच्या पायलट प्रोजेक्टला मंजुरी देताना कागदाच्या नोटा बंद होणार नाहीत, असे सरकारने स्पष्ट केले. प्लास्टिक नोटा चलनात आल्यानंतर चलनातील सध्या कागदी नोटा देखील चलनात राहतील. प्लास्टिक नोटाची चाचणी यशस्वी झाल्यास पॉलिमर आणि कागदी नोटा दोन्ही एकाच वेळी चलनात राहतील.

## अजूनही उत्तर नाही, संयम सुटतोय : युगेंद्र पवार

**पुणे :** दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या विमान अपघाताला सहा महिने झाले आहेत. पण, अजूनही अपघाताच्या चौकशीचा अहवाल समोर आलेला नाही. यावरुन मंगळवारी युगेंद्र पवार यांनी संताप व्यक्त केला. 'दादांना जाऊन सहा महिने झाले, पण अजूनही काहीच निष्पन्न झाले नाही याची मोठी खंत आहे,' असे सांगत युगेंद्र पवार यांनी संताप व्यक्त केला. अजितदादांच्या दुर्दैवी निधनानंतर केंद्र व राज्य सरकारमधील अनेक बड्या नेत्यांनी आणि प्रशासनाने सखोल चौकशीची आश्वासने दिली होती. सीआयडी आणि नागरी विमान वाहतूक महासंचालनालय या प्रकरणी तपास करत आहेत. मात्र, इतका काळ उलटूनही अपघाताचे साधे व्हिडीओ किंवा सीसीटीव्ही फुटेजही समोर आलेले नाही, असा गंभीर आरोप युगेंद्र पवार यांनी केला आहे.

# प्राणी, वनस्पतींच्या 44 हजारांहून अधिक प्रजातींचे अस्तित्व धोक्यात!

जागतिक निसर्ग संवर्धन दिन दरवर्षी २८ जुलै रोजी जगभरात साजरा केला जातो आणि २०२६ मध्ये हा दिवस मंगळवारी येत आहे. हा महत्त्वपूर्ण वार्षिक दिवस, आपण हवा, माती आणि पाणी यांसारख्या मौल्यवान नैसर्गिक संसाधनांचा वापर कसा करतो, हे पाहण्यासाठी मानवतेला एकत्र आणतो.

हे पूर्वीपेक्षाही अधिक गंभीर आहे. इंटरनॅशनल युनियन फॉर कॉन्झर्व्हेशन ऑफ नेचरच्या धोक्यात असलेल्या प्रजातींच्या रेड लिस्टनुसार, आज प्राणी आणि वनस्पतींच्या ४४,००० हून अधिक प्रजाती धोक्यात आहेत. सतत होणारी जंगलतोड, अधिवासाचा ऱ्हास, वाढते जागतिक तापमान आणि इतर अनेक घटकांमुळे आपल्या निसर्ग-आधारित प्रणालींवर गंभीर ताण येत आहे. जागतिक निसर्ग संवर्धन दिन हा सरकार, उद्योग आणि लोकांसाठी पर्यावरणीय पुनर्संचयन आणि संसाधन व्यवस्थापनाकडे आपले प्राधान्यक्रम पुन्हा निश्चित



करण्याची एक संधी आहे.२०२६ साठी जागतिक संकल्पना आणि मुख्य पर्यावरणीय प्राधान्यक्रमांचे स्पष्टीकरण. निसर्ग, पर्यावरण आणि वन्यजीव यांच्या निरीक्षणात काही फरक आहेत. निसर्ग निरीक्षण, पर्यावरण निरीक्षण आणि वन्यजीव निरीक्षण यांच्यात फरक आहेत. उत्सवासाठीच्या विशिष्ट कृती आणि चक्रीय औद्योगिक पद्धती परिसंस्थांचे संरक्षण कसे करत आहेत.

हा एक महत्त्वाचा आंतरराष्ट्रीय निसर्ग संवर्धन दिन म्हणून ओळखला जातो आणि सर्व आंतरराष्ट्रीय नागरिकांना दररोज त्यांच्या पर्यावरणीय पदचिन्हावर चिंतन करण्यास प्रोत्साहित करतो. जागतिक निसर्ग संवर्धन दिन हा निसर्गाचा वापर आणि त्याचे व्यवस्थापन यांचे महत्त्व अधोरेखित करण्यासाठी २८ जुलै रोजी साजरा केला जाणारा एक वार्षिक आंतरराष्ट्रीय दिवस आहे. निसर्ग संवर्धनासाठी समर्पित असलेल्या या दिवसाचा मुख्य उद्देश, आपली वनस्पती, प्राणीसृष्टी, पाणी आणि मृदा या संसाधनांच्या नाजूकपणाबद्दल सर्व नागरिकांना संवेदनशील करणे आणि त्यांना शाश्वत जीवनशैली जगण्यासाठी प्रोत्साहित करणे हा आहे, जेणेकरून ते ही संसाधने भावी पिढ्यांसाठी जतन करू शकतील.

हा एक वार्षिक कार्यक्रम आहे जो आंतरराष्ट्रीय स्तरावर साजरा केला जातो. माती, पाणी, हवा, ऊर्जा, खनिजे आणि नैसर्गिक अधिवासांचे संरक्षण करणे. उद्दिष्ट्ये: संसाधनांच्या वापराची अशी शाश्वत प्रणाली स्थापित करणे, ज्यामुळे पर्यावरणाची हानी आणि प्रजातींचा ऱ्हास टाळता येईल. आंतरराष्ट्रीय स्तरावर साजरा होणारा हा निसर्ग संवर्धनाचा एक महत्त्वाचा दिवस आहे, जो जगातील प्रत्येक नागरिकाला त्याच्या दैनंदिन जीवनातील पर्यावरणीय प्रभावाचे मूल्यांकन करण्याचे आवाहन करतो.

जागतिक पर्यावरण संवर्धन दिनाच्या विविध वचनबद्धता एकमेकांत मिसळत असल्यामुळे, बऱ्याच लोकांना त्याबद्दल फारशी माहिती नसते. या दिनांमध्ये फरक स्पष्ट करण्यासाठी, जागतिक पर्यावरण दिन (जून) विशेषतः जागतिक धोरणात्मक चौकट आणि हवामान बदलावर लक्ष केंद्रित करतो.

### जागतिक संवर्धन दिनाचा इतिहास आणि उगम

अनेक जागतिक दिवस केवळ संयुक्त राष्ट्रांच्या आंतरराष्ट्रीय ठरावाद्वारे घोषित केले जातात, याच्या विपरीत, जागतिक संवर्धन दिनाची संकल्पना अनेक वर्षांच्या कालावधीत विकसित झाली. याचा उगम १९४८ मध्ये स्थापन झालेल्या 'इंटरनॅशनल युनियन फॉर कॉन्झर्व्हेशन ऑफ नेचर' आणि १९६४ मधील 'आययूसीएन रेड लिस्ट'मध्ये शोधता येतो, ज्याने जगाला जैवविविधतेच्या समस्येबद्दल सावध केले. कालांतराने, २८ जुलै ही तारीख तळागाळातील पर्यावरणवादी चळवळी आणि जगभरातील संघटनांकडून पर्यावरण संरक्षणाचे आवाहन करण्यासाठी वापरली जाऊ लागली. आधुनिक युगातील जागतिक संवर्धन दिन हा कार्यक्रम, संयुक्त राष्ट्रांचे परिसंस्था पुनर्संचयन दशक (२०२१-२०३०), कुनिंग-मॉन्ट्रियल जागतिक जैवविविधता आराखडा आणि इतर अशा विविध आंतरराष्ट्रीय महत्त्वाच्या टप्प्यांशी संबंधित आहे.

# विश्व निसर्ग संरक्षण दिन



विश्व निसर्ग संरक्षण दिन हा दरवर्षी २८ जुलै रोजी साजरा केला जातो. हा दिवस साजरा करण्यामागचा मुख्य उद्देश निसर्गाचे महत्त्व समजून घेणे, नैसर्गिक संसाधनांचे (जल, जंगल, जमीन, वायू) रक्षण करणे आणि पर्यावरणाचा समतोल राखण्याबाबत समाजात जागरूकता निर्माण करणे हा आहे.

**निसर्ग संरक्षण का आवश्यक आहे?**

आज मानव प्रगतीची नवनवीन शिखरे पादाक्रांत करत आहे; मात्र या विकासप्रक्रियेत निसर्गाचा मोठा बळी जात आहे. वृक्षतोड आणि जंगलतोड: वाढते शहरीकरण आणि औद्योगिकरणामुळे जंगले नष्ट केली जात आहेत. प्रदूषण: हवा, पाणी आणि मातीचे वाढते प्रदूषण मानवी आरोग्यासाठीच नव्हे, तर सर्व जीवसष्टीसाठी धोकादायक ठरत आहे.

**हवामान बदल:**

अतिवृष्टी, दुष्काळ, अवकाळी पाऊस आणि तापमानात होणारी वाढ हे सर्व निसर्गाचा समतोल बिघडल्याचे संकेत आहेत. जैवविविधतेचा ऱ्हास: अनेक वनस्पती आणि प्राण्यांच्या प्रजाती नामशेष होण्याच्या मार्गावर आहेत. "निसर्गाकडे प्रत्येकाची गरज भागवण्याचे सामर्थ्य आहे, पण कोणाचाही हाव किंवा हावरेपणा भागवण्याचे नाही."

आपण काय करू शकतो? (छोटे बदल, मोठा परिणाम) निसर्गाचे रक्षण करण्यासाठी फक्त शासनाने किंवा संस्थांनी काम करणे पुरेसे नाही, तर प्रत्येक नागरिकाने यात योगदान दिले पाहिजे:

**वृक्षारोपण आणि संगोपन:** केवळ झाडे लावणे नाही, तर ती जगवणे आणि मोठे करणे ही आपली जबाबदारी आहे.

**पाण्याचा योग्य वापर:** पाण्याचा अपव्यय टाळा. पावसाचे पाणी साठवण्यासाठी (Rainwater Harvesting) पुढाकार घ्या.

प्लास्टिकचा वापर टाळा: एकदाच वापरल्या जाणाऱ्या (Single-use) प्लास्टिकऐवजी कापडी पिशव्या आणि पुनर्वापर करता येणाऱ्या वस्तू वापरा.

ऊर्जा बचत: वीज, इंधन यांचा अनावश्यक वापर टाळा. सौरऊर्जेसारख्या अक्षय ऊर्जेच्या (Renewable Energy) स्रोतांचा वापर वाढवा.

'३ R' चा नियम पाळा: (कमी करा), (पुनर्वापर करा), आणि (पुनर्चक्रण करा).

निसर्ग आहे म्हणूनच मानवाचे अस्तित्व आहे. जर आपण आज निसर्गाचे रक्षण केले नाही, तर येणाऱ्या पिढीला एका मोठ्या संकटाचा सामना करावा लागेल. त्यामुळे केवळ २८ जुलै रोजीच नव्हे, तर वर्षाचे ३६५ दिवस निसर्ग संवर्धनाचा ध्यास घेणे काळाची गरज आहे. या विश्व निसर्ग संरक्षण दिनानिमित्त आपण सर्वजण निसर्गाशी नाते अधिक घट्ट करण्याचा आणि पर्यावरणाचा समतोल राखण्याचा संकल्प करूया!

# जागतिक हिपॅटायटिस दिन

28 जुलै रोजी जगभरात जागतिक हिपॅटायटिस दिन साजरा केला जातो. या दिवसाचा उद्देश हिपॅटायटिस या आजाराविषयी जनजागृती करणे, त्याची प्रतिबंधात्मक उपाययोजना सांगणे आणि वेळेवर निदान व उपचाराचे महत्त्व लोकांपर्यंत पोहोचवणे हा आहे.

हिपॅटायटिस म्हणजे काय?


हिपॅटायटिस म्हणजे यकृताला (लिव्हरला) होणारी सूज. हा आजार मुख्यतः हिपॅटायटिस A, B, C, D आणि E या विषाणूंमुळे होतो. यापैकी हिपॅटायटिस B आणि C हे गंभीर स्वरूपाचे असून ते दीर्घकालीन यकृतविकार, यकृत निकामी होणे किंवा यकृताचा कर्करोग होण्यास कारणीभूत ठरू शकतात.

हिपॅटायटिसची प्रमुख लक्षणे म्हणजे ताप, थकवा, भूक न लागणे, मळमळ, उलट्या, पोटदुखी, डोळे व त्वचा पिवळी पडणे (कावीळ), गडद रंगाची लघवी इत्यादी. काही वेळा सुरुवातीच्या टप्प्यात कोणतीही लक्षणे दिसून येत नाहीत.

हिपॅटायटिस B ची लस वेळेवर घेणे, स्वच्छ पाणी आणि स्वच्छ अन्नाचा वापर करणे, निर्जंतुक सुया व वैद्यकीय उपकरणांचा वापर करणे, सुरक्षित रक्तच चढवणे, वैयक्तिक स्वच्छतेची काळजी घेणे, नियमित आरोग्य तपासणी करून घेणे.

जागतिक हिपॅटायटिस दिनाचे महत्त्व :

या दिवसानिमित्त विविध



आरोग्य शिबिरे, जनजागृती मोहीम, रक्त तपासणी, लसीकरण कार्यक्रम आणि मार्गदर्शन सत्रांचे आयोजन केले जाते. यामुळे लोकांमध्ये या आजाराबद्दल जागरूकता वाढते आणि वेळेवर उपचार घेण्यास प्रोत्साहन मिळते.

हिपॅटायटिस हा गंभीर आजार असला तरी योग्य माहिती, लसीकरण, स्वच्छता आणि वेळेवर उपचार यांच्या मदतीने त्यावर प्रभावी नियंत्रण मिळवता येते. जागतिक हिपॅटायटिस दिन हा केवळ एक दिवस नसून निरोगी समाज घडविण्याचा संकल्प करण्याचा दिवस आहे. प्रत्येकाने या आजाराविषयी जागरूक राहून स्वतःचे आणि समाजाचे आरोग्य जपावे. आरोग्य विभाग अकोला

लसीकरण, स्वच्छता आणि उपचाराने हिपॅटायटिसवर मात शक्य

हिपॅटायटिस हा गंभीर आजार असला तरी योग्य माहिती, लसीकरण, स्वच्छता आणि वेळेवर उपचार यांच्या मदतीने त्यावर प्रभावी नियंत्रण मिळवता येते. जागतिक हिपॅटायटिस दिन हा केवळ एक दिवस नसून निरोगी समाज घडविण्याचा संकल्प करण्याचा दिवस आहे. प्रत्येकाने या आजाराविषयी जागरूक राहून स्वतःचे आणि समाजाचे आरोग्य जपावे, असे आवाहन अकोला येथील जिल्हा आरोग्य कार्यालयाने केले आहे.

हिपॅटायटिस म्हणजे यकृताला (लिव्हरला) होणारी सूज. हा आजार मुख्यतः हिपॅटायटिस ए, बी, सी, डी आणि ई या विषाणूंमुळे होतो. यापैकी हिपॅटायटिस बी आणि सी हे गंभीर स्वरूपाचे असून ते दीर्घकालीन यकृतविकार, यकृत निकामी होणे किंवा यकृताचा कर्करोग होण्यास कारणीभूत ठरू शकतात.जागतिक हिपॅटायटिस दिवसानिमित्त विविध आरोग्य शिबिरे, जनजागृती मोहीम, रक्त तपासणी, लसीकरण कार्यक्रम आणि मार्गदर्शन सत्रांचे आयोजन केले जात आहे. यामुळे लोकांमध्ये या आजाराबद्दल जागरूकता आणि वेळेवर उपचार घेण्यास प्रोत्साहन दिले जाणार आहे.

# खरा इतिहास सामान्य माणसांकडून घडवला जातो!

## आज स्मृती दिवस

महाश्वेता देवी ह्या एक भारतीय बंगाली भाषेतील लेखिका आणि कार्यकर्त्या होत्या.त्यांच्या उल्लेखनीय साहित्यकृतींमध्ये 'हजार चौराशिर माँ' , 'रुदाली' आणि 'अरण्येर अधिकार' यांचा समावेश आहे . त्या एक डाव्या विचारसरणीच्या होत्या, ज्यांनी भारतातील पश्चिम बंगाल , बिहार, मध्य प्रदेश आणि छत्तीसगड राज्यांतील आदिवासी लोकांच्या ( लोढा आणि शाबर ) हक्कांसाठी आणि सक्षमीकरणासाठी काम केले. त्यांना साहित्य अकादमी पुरस्कार ( बंगालीमध्ये ), ज्ञानपीठ पुरस्कार आणि रॅमन मॅगसेसे पुरस्कार यांसारख्या विविध साहित्यिक पुरस्कारांनी, तसेच भारताचे नागरी पुरस्कार पद्मश्री आणि पद्मविभूषण यांनी सन्मानित करण्यात आले होते.

महाश्वेता देवी यांचा जन्म १४ जानेवारी १९२६ रोजी ब्रिटिश भारतातील ढाका ( आता ढाका , बांगलादेश ) येथे एका बंगाली ब्राह्मण कुटुंबात झाला. त्यांचे वडील, मनीष घटक , कल्लोळ चळवळीतील कवी आणि कादंबरीकार होते जे जुबनश्व या टोपणनावाने ओळखले जात. घटक यांचे भाऊ चित्रपट निर्माते ऋत्विक घटक होते. देवींची आई, धरित्री देवी, या देखील एक लेखिका आणि समाजसेविका होत्या. ज्यांच्या भावांमध्ये शिल्पकार शंख चौधरी आणि 'इकॉनॉमिक अँड पॉलिटिकल वीकली ऑफ इंडिया'चे संस्थापक-संपादक सचिन चौधरी यांचा समावेश आहे.

देवींचे पहिले शालेय शिक्षण ढाका येथील ईडन मॉन्टेसरी स्कूलमध्ये (१९३०) झाले . त्यानंतर त्या पश्चिम बंगालमध्ये (आता भारतात) गेल्या. त्यानंतर त्यांनी मिदनापूर येथील मिशन गर्ल्स हायस्कूलमध्ये शिक्षण घेतले . त्यानंतर त्यांनी शांतिनिकेतनमध्ये प्रवेश घेतला. त्यानंतर त्यांनी बेल्टला गर्ल्स स्कूलमध्ये शिक्षण घेतले, जिथे त्यांनी मॅट्रिक पूर्ण केले. त्यानंतर १९४४ मध्ये त्यांना आशुतोष कॉलेजमधून आयए मिळाले. त्यांनी रवींद्रनाथ टागोर यांनी स्थापन केलेल्या विश्व-भारती विद्यापीठात शिक्षण घेतले आणि इंग्रजीमध्ये बीए ( ऑनर्स ) पूर्ण केले , आणि नंतर कलकत्ता विद्यापीठातून इंग्रजीमध्ये एमए पूर्ण केले.

देवी यांनी १०० हून अधिक कादंबऱ्या आणि २० हून अधिक कथासंग्रह लिहिले जे प्रामुख्याने बंगालीमध्ये लिहिलेले होते परंतु अनेकदा इतर भाषांमध्ये अनुवादित केले गेले. त्यांची पहिली कादंबरी, 'झांशीची राणी' नावाची, झाशीच्या राणीच्या चरित्रावर आधारित होती. महाश्वेता देवी यांचे विशेष प्रावीण्य आदिवासी, दलित आणि उपेक्षित नागरिकांच्या अभ्यासात होते, ज्यात त्यांच्या स्त्रियांवर विशेष लक्ष केंद्रित केले होते. ब्रिटिश वसाहतवाद , महाजन आणि उच्चवर्गीय भ्रष्टाचार व अन्यायाविरुद्ध ते आंदोलक म्हणून ओळखले जात होते. त्या पश्चिम बंगाल, बिहार, मध्य प्रदेश, छत्तीसगड येथील आदिवासी गावांमध्ये वर्षानुवर्षे राहिल्या, त्यांच्याशी मैत्री केली आणि त्यांच्याकडून शिकल्या. त्यांनी त्यांचे संघर्ष आणि त्याग आपल्या शब्दांत आणि पात्रांमध्ये साकारले आहेत. त्यांनी असा दावा केला होता की त्यांच्या कथा त्यांची निर्मिती नाहीत, तर त्या त्यांच्या देशातील लोकांच्या कथा आहेत. त्यांचे 'छोटी मुंडी एबोंग तार तिर' हे कार्य याचेच एक उदाहरण आहे.

१९६४ मध्ये, तिने विजयगड ज्योतिष राय कॉलेजमध्ये ( कलकत्ता विद्यापीठ प्रणालीचे एक संलग्न महाविद्यालय ) शिकवायला सुरुवात केली. त्या काळात विजयगड ज्योतिष राय कॉलेज हे कामगार वर्गातील विद्यार्थिनींसाठी एक संस्था होती. त्या काळात तिने पत्रकार आणि सर्जनशील लेखिका म्हणूनही काम केले. तिने लोढा आणि शाबर , पश्चिम बंगालमधील आदिवासी समुदाय, स्त्रिया आणि दलितांचा अभ्यास केला . तिच्या विस्तृत बंगाली कथांमध्ये, तिने अनेकदा शक्तिशाली हुकूमशाही उच्च-जातीय जमीनदार, सावकार आणि भ्रष्ट सरकारी अधिकाऱ्यांकडून आदिवासी लोक आणि अस्पृश्यांवर होणाऱ्या क्रूर अत्याचारांचे चित्रण केले.

माझा नेहमीच विश्वास राहिला आहे की खरा इतिहास सामान्य माणसांकडून घडवला जातो. सामान्य माणसांनी पिढ्यानपिढ्या जपलेल्या लोककथा, लोकगीते, मिथके आणि आख्यायिका विविध स्वरूपांत पुन्हा पुन्हा माझ्यासमोर येतात. माझ्या लेखनाचे कारण आणि प्रेरणा ते लोक आहेत ज्यांचे शोषण होते आणि ज्यांचा वापर केला जातो, तरीही ते हार मानत नाहीत. माझ्यासाठी, लेखनासाठी लागणाऱ्या घटकांचा अखंड स्रोत हे आश्चर्यकारकपणे उदात्त, दुःखी माणसे आहेत. एकदा का मी त्यांना ओळखायला सुरुवात केली, की मी माझा कच्चा माल इतरत्र का शोधावा? कधीकधी मला असे वाटते की माझे लेखन हे खरे तर त्यांचेच कार्य आहे.



### वैयक्तिक जीवन

२७ फेब्रुवारी १९४७ रोजी, तिने प्रसिद्ध नाटककार बिजन भट्टाचार्य यांच्याशी लग्न केले, जे इंडियन पीपल्स थिएटर असोसिएशन चळवळीच्या संस्थापक पित्यांपैकी एक होते . १९४८ मध्ये, तिने नबरुण भट्टाचार्य यांना जन्म दिला , जे पुढे कादंबरीकार आणि राजकीय समीक्षक बनले. तिने पोस्ट ऑफिसमध्ये काम केले, परंतु तिच्या साम्यवादी विचारसरणीमुळे तिला कामावरून काढून टाकण्यात आले. त्यानंतर तिने साबण विकणे आणि निरक्षर लोकांसाठी इंग्रजीमध्ये पत्रे लिहिणे यासारखी विविध कामे केली. १९६२ मध्ये, भट्टाचार्य यांना घटस्फोट दिल्यानंतर तिने लेखक असित गुप्ता यांच्याशी लग्न केले. १९७६ मध्ये, गुप्ता यांच्यासोबतचे तिचे नाते संपुष्टात आले.

### महाश्वोतादेवींचा मृत्यू

गुजरातच्या तेजगढ येथील आदिवासी अकादमीमध्ये महाश्वेता देवी स्मारकाचे अनावरण करण्यात आले. २३ जुलै २०१६ रोजी, देवी यांना मोठा हृदयविकाराचा झटका आला आणि त्यांना कोलकाता येथील बेले व्ह्यू क्लिनिकमध्ये दाखल करण्यात आले . २८ जुलै २०१६ रोजी, वयाच्या ९० व्या वर्षी, अनेक अवयव निकामी झाल्यामुळे देवी यांचे निधन झाले. त्यांना मधुमेह , सेप्सिस आणि मूत्रमार्गाचा संसर्ग झाला होता.

# स्व. दादासाहेब काळमेघ : विज्ञान आणि अध्यात्माचा सुरेख संगम साधणारा वारकरी

नागपूर विद्यापीठाचे (आताचे राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ) माजी कुलगुरू तथा विदर्भातील ख्यातनाम श्री शिवाजी शिक्षण संस्थेचे माजी अध्यक्ष म्हणजेच जनसामान्यांच्या मनात, हृदयात ज्यांचे स्थान-स्मृती अजरामर आहेत, असे तुम्हा-आम्हा सर्वांचे प्रेरणास्थान 'विदर्भाचे मानचिन्ह' स्व. वा. मो. उपाख्य दादासाहेब काळमेघ यांचा आज दिनांक 29 जुलै 2026 रोजी 29 व्या स्मृतीदिनानिमित्त या लेखाच्या माध्यमातून श्रद्धांजली-शब्दांजली अर्पण.



श्री शिवाजी शिक्षण संस्था संचलित आदर्श विद्यालय, दर्यापुर जि. अमरावती या शाळेत इंग्रजी माध्यम नव्याने सुरू झाले व मला इंग्रजी माध्यमातून शिकायचे असल्याने माझ्या वडिलांनी आदर्श शाळेत मला 8 व्या वर्गात प्रवेश दिला, हे नमूद करण्याचे प्रयोजन असे की, त्यावेळेसच आयुष्यात प्रथमच दादासाहेब काळमेघ या नावाचा मला परिचय झाला. त्याचे कारण असे की, आमचे शिक्षक गिल्डा सर, पाकधुने सर, ताठे सर, देशमुख सर हे सर्वजण श्री शिवाजी शिक्षण संस्थेचे आजीवन सभासद. ते नेहमी अनौपचारिक गप्पा मारतांना दादासाहेबांमुळे इंग्रजी माध्यम तुम्हा विद्यार्थ्यांकरिता सुरू झाले, असे सांगत होते. यावरून दादासाहेबांची दूरदृष्टी किती दिव्य होती, हे आज आपल्या लक्षात येते.

एका लहानशा गावातून आलेला एक मुलगा अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत उच्च शिक्षणाकडे प्रवास करतो आणि आय.आय.टी. खरगपूर सारख्या नामांकित संस्थेतून एम.टेक. पदव्युत्तर पदवी घेऊन एल.आय.टी. सारख्या महाराष्ट्रातील ख्यातनाम संस्थेत प्रोफेसर होतो व अगदी तरुण वयात कुलगुरू होण्याचा मान महाराष्ट्रातच नव्हे तर देशभरात प्राप्त करतो, ही 80 च्या दशकात घडलेली घटना आज आपल्या दृष्टीने आश्चर्यचकित करणारी वाटत असली, तरी वा. मो. उपाख्य दादासाहेब काळमेघ हे वादळी व्यक्तिमत्त्व या काळात घडले हे त्रिवार सत्य आहे. विज्ञानाचे शिक्षक असूनही दादासाहेब अध्यात्माला खुप महत्त्व देत. विज्ञान आणि अध्यात्माचे महत्त्व दादांनी अनेक विवेचनांमधून, किर्तनांमधून, पोवाड्यातुन लोकांना पटवून दिले. संत महिमा, किर्तन, यज्ञ यावर हा वैज्ञानिक दृष्टी असलेला माणूस विश्वास ठेवतो (सामान्य लोकांचा बुद्धीतर्क) यावरुन दादा अनेकदा टिकेचे धनी सुद्धा ठरले. मात्र दादांनी या सर्वांवर मात करून आपला रुबाब कायम ठेवला.

विषय विज्ञान आणि अध्यात्माचा आहे, त्यामुळे नवीन पिढीसमोर एक प्रोफेसर-कुलगुरू व्यक्ती याचा ध्यास का घेतो याची सत्यता व उजळणी दादांच्या समकालीन पिढी व नवपिढीसमोर त्यांच्या पुण्यतिथीनिमित्त आली पाहिजे हा प्रयत्न आहे.

विज्ञान आणि अध्यात्म या बाबत दादांनी स्वतः भरपुर लिखाण केले. हे दादांचे हस्तलिखित श्री शरद व श्री हेमंत काळमेघ नजीकच्या काळात प्रसिद्ध करतीलच.. दादांच्या भाषेतील काही अंश पुढीलप्रमाणे. विज्ञान आणि अध्यात्माचा संगम करतांना दादा म्हणतात -

**" विज्ञान म्हणजे विशेष ज्ञान । अध्यात्म म्हणजे संपूर्ण ज्ञान ।**
**विज्ञान मर्यादित बिंदू । अध्यात्म सिंधू अध्यात्म असे ॥**
**विज्ञान तर्क्य, व्यक्ताचे, वादविवाद शोध संशोधनाचे ।**
**श्रद्धा, अनुभूती, परमार्थ परिणामांचे अतर्क्य, अव्यक्त अध्यात्म असे ।**
**विज्ञानाचा संबंध देहाशी । अध्यात्माचा देवाशी ।**
**विज्ञान डोळ्याचे । दृष्टीचे अध्यात्म असे ॥"**

या विवेचनावरून आपल्या लक्षात येईल की, दादा वैज्ञानिक डोळ्यांचे होते आणि अध्यात्माच्या व्यासंगाने त्यांना दिव्य दृष्टी प्राप्त होती, याचा प्रत्यय आपणास येतो. पुढे दादा म्हणतात -

" विज्ञान-अध्यात्माची करूनी युती ।
अर्थ-परमार्थाची जोडोनी नाती ।
शांती-क्रांतीची वाढवुनी गती । दारिद्र्य भेदाभेद मिटविण्यासाठी ।
मार्गक्रमावे उद्योग - धंदे ॥"

मग आपल्याला हे पटायला लागते की, दादांचे म्हणणे येवढेच की, विज्ञान आणि अध्यात्माचा संगम हा मानवी जीवनाच्या कल्याणाचा मुलमंत्र आहे. या विचारातुन दादांना 'किसान - मजदुरांचे राज्य' अपेक्षित होते. म्हणुण एका पोवाड्यातुन व्यक्त होतांना दादा म्हणतात

**" टिळकांचे होते स्वराज्य । नेहरुंचे होते लोकराज्य ॥**
**शास्त्रींचे होते किसान राज्य । गांधींचे होते रामराज्य ॥**
**तुकडोजींचे होते ग्रामराज्य । दादास हवे किसान-मजदुरांचे राज्य ॥"**

एकूणच दादांचा बाणा हा युक्तीने पटवुन देण्याचा होता, तो लोककल्याणाचा होता, सत्ता ही स्वार्थासाठी नव्हेतर लोक कल्याणासाठी वापरावी म्हणुन दादा लिहितात -

**" गेली आमची खुर्ची, घसरला आमचा भाव ।**
**नका आमच्या मांग लागू, नका करू काव काव ॥**
**होती आमची खुर्ची, होता आमचा मान ।**
**होतो करत आम्ही, रातदिन तनतन ॥**
**जाता आमची खुर्ची, गेला आमचा ताव ।**
**जाता आमची खुर्ची, गेली आमची हाव ॥"**

म्हणुन, आम्ही जेव्हा विचार करतो तेव्हा दादांमध्ये हे सामर्थ्य कशामुळे होते, ही निस्वार्थी वृत्ती कशामुळे होती तर हा विज्ञान आणि अध्यात्माचा दादांनी त्यांच्या जीवनात साधलेल्या सुरेख संगमामुळे त्यांना आचरता आला. दादांच्या स्वलिखित साहित्याचा, काव्याचा व त्यांच्या जीवनीचा जेंव्हा आम्ही परामर्श घेतो, तेंव्हा असे लक्षात येते की, 'मी' पेक्षा कुटुंब मोठे, कुटुंबापेक्षा समाज मोठा, समाजापेक्षा देश मोठा, आणि सर्वात मोठे 'विश्वकल्याण'. दादा विश्वकल्याणासाठीच तहहयात कर्म करित राहिले व आयुष्यभर झटले कारण दादांना आयुष्यातील सुख व दुःख याची स्पष्ट जाणीव होती. सुख आणि दुःख सारखेच हे मानणाऱ्या पैकी दादा होते.

कृतज्ञता, निस्वार्थ, निर्मोही, ज्ञानी, ही दादांच्या कर्मांची, कर्तृत्वाची भूषणे होती आणि म्हणूनच दादांना त्यामधून दिव्यत्व प्राप्त होते, ते असामान्य होते. दादांच्या मार्गानेच आपणही मार्गस्थ होण्याचा संकल्प केल्यास ती त्यांना खरी श्रद्धांजली ठरेल. पंढरीच्या वारीत लाखो लोक स्वयंशिस्तीने सहभागी होतात. अनेक विदेशी लोकही या विषयी आश्चर्य व्यक्त करतात. एकदा एका विदेशी व्यक्तीने वारकऱ्याला एक प्रश्न केला, तो असा - 'आर दे बेगर्स' हे सर्व वारकरी भिक मागत आहेत का ? या प्रश्नाचे उत्तर देताना वारकरी म्हणाला -

'येस दे आर बेगर्स, बट दे आर बेगींग फॉर वर्ल्ड वेलफेअर' होय ते भिकारी आहेत, परंतु ते विठ्ठलाकडे विश्वाच्या कल्याणाची भीक मागत आहेत. केवढी ही वारकऱ्याची ताकद.

आपले सर्वांचे दादा तर विज्ञान आणि अध्यात्माचा सुरेख संगम साधणारे वारकरी होते. **विनम्र श्रद्धांजली.**

**डॉ. दीपक धोटे**
प्राचार्य,
ब्रजलाल बियाणी विज्ञान महाविद्यालय,
अमरावती (मो. 9422857431

# पातूरच्या रेस्ट हाऊस रोडवरील खड्ड्याचे काम सुरु



## ग्राम पंचायत प्रशासनाने घेतली दखल

प्रतिनिधी २८ जुलै

**पातूर:** शहरातील रेस्ट हाऊस रोडवरील मोठा खड्डा नागरिकांसाठी जीवघेणा ठरत आहे. पावसाच्या पाण्याने खड्डा पूर्ण भरल्याने अनेक दुचाकीस्वार आणि पादचारी घसरून जखमी झाले आहेत. संतप्त नागरिकांनी ग्रामपंचायत प्रशासनाकडे तातडीने खड्डा बुजवण्याची मागणी केली असे वृत्त सोमवारी आरआरसी नेटवर्कने प्रकाशित केले. त्याची दखल घेऊन ग्रामपंचायतने दुरूस्ती काम हाती घेतले.

रेस्ट हाऊस रोड हा न्यायालय, भूमी अभिलेख कार्यालय, विश्रामगृह, शाहबाबू शाळा तसेच अनेक शासकीय कार्यालयांना जोडणारा महत्त्वाचा मार्ग आहे. या रस्त्यावरून दिवसभर विद्यार्थी, नागरिक, कर्मचारी, वकील आणि लहान-मोठ्या वाहनांची मोठ्या प्रमाणात ये-जा सुरू असते. मात्र

### आर आर सी इम्पॅक्ट

शाहबाबू शाळेजवळ रस्त्यालगत पडलेला मोठा खड्डा

अपघाताचे कारण ठरत होता. सततच्या पावसामुळे या खड्डयात पाणी साचत असल्याने त्याची खोली वाहनचालकांच्या लक्षात येत नाही. परिणामी अनेक दुचाकीस्वार घसरून पडत असून पादचाऱ्यांनाही मोठा त्रास सहन करावा लागत आहे.

विशेष म्हणजे हा रस्ता मुख्य महामार्गाला जोडणारा असल्याने येथे वाहतुकीची कायम वर्दळ असते. शाळकरी मुले, ज्येष्ठ नागरिक आणि महिलांना या मार्गावरून प्रवास करताना जीव मुठीत धरावा लागत आहे. सुदैवाने अद्याप मोठी दुर्घटना घडलेली नसली, तरी प्रशासनाने वेळेत उपाययोजना न केल्यास गंभीर अपघात होण्याची भीती नागरिक व्यक्त करत आहेत. संतप्त नागरिकांनी ग्रामपंचायत प्रशासनाने तातडीने हा खड्डा बुजवून रस्ता सुरक्षित करावा, अशी जोरदार मागणी केली आहे. तीव्र आंदोलनाचा इशारा दिला होता. परंतु आता समस्या दूर होणार असे दिसते.

# 'नारी शक्ती वंदन अधिनियमा'ची तातडीने अंमलबजावणी करा!

## जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन, जनवादी महिला संघटनेचे धरणे आंदोलन

प्रतिनिधी २८ जुलै

**अकोला :** केंद्र सरकारने महिलांसाठी नारी शक्ती वंदन अधिनियम लागू करण्याची घोषणा केली होती त्याची अंमलबजावणी त्वरित करावी, लाडकी बहीण योजनेतून किती लाडक्या बहिणींना वगळण्यात आले त्याची तालुकानिहाय माहिती द्या, या मागणीसाठी आज मंगळवारी अखिल भारतीय जनवादी महिला संघटनेच्यावतीने जिल्हाधिकारी कार्यालयासमोर महिलांनी धरणे आंदोलन केले. यावेळी विविध घोषणांनी जिल्हाधिकारी कार्यालय परिसर दणाणला होता. त्यानंतर जिल्हाधिकारी यांना महिलांनी आपल्या मागण्यांचे निवेदन सादर केले.



### वगळण्यात आलेल्या लाडक्या बहिणींनी माहिती द्या!

» मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेतून राज्यातील लाखो महिलांना ई-केवायसीच्या नावाखाली वगळण्यात आले आहे. त्यामुळे महाराष्ट्र राज्य सरकारने सुरु केलेल्या 'मुख्यमंत्री लाडकी बहीण' योजनेचे लाभ घेणाऱ्या किती महिला या योजनेतून वगळण्यात आल्या, त्याची तालुकानिहाय माहिती द्यावी, अशी मागणीही जनवादी महिला संघटनेने निवेदनातून केली आहे.

अखिल भारतीय जनवादी महिला संघटनेच्या वतीने महिलांसाठी संसद व राज्य विधानसभांमध्ये एक-तृतीयांश आरक्षणाची तरतूद करणाऱ्या भारतीय संविधान (१०६ वी दुरुस्ती) अधिनियम, २०२३ (जरी एनडीए सरकारच्या प्रचारात त्याला 'नारी शक्ती वंदन अधिनियम' असे संबोधले जाते) याची तातडीने अंमलबजावणी व्हावी आणि यासाठी या अधिनियमात दुरुस्ती करून त्यातील जनगणना आणि मतदारसंघ पुनर्रचनेची (परिसीमन) अट काढून टाकावी, अशीr मागणी यावेळी संघटनेने केली. तसेच आज राज्य विधानसभांमधील महिलांचे सरासरी प्रतिनिधित्व १० टक्क्यांपेक्षाही कमी आहे. तसेच पुढील एका वर्षात अनेक राज्य विधानसभांच्या निवडणुका होणार आहेत. अशा परिस्थितीत या उपाययोजनेची तातडी अधोरेखित करण्याची आवश्यकता नाही. त्यासाठी संविधानाच्या १०६ व्या दुरुस्ती अधिनियमात आवश्यक दुरुस्ती करावी. महिला आरक्षण हा स्वतंत्र विषय आहे. त्याला इतर कोणत्याही मुद्यांशी जोडण्याची आवश्यकता नाही. आपल्याद्वारे आम्ही केंद्र सरकारला संविधानाच्या १०६ व्या अधिनियमात आवश्यक दुरुस्ती करावी आणि महिला आरक्षण त्वरित लागू करावे, यासाठी धरणे आंदोलन करण्यात येत असून, तसे निवेदन जिल्हाधिकारी यांना सादर करण्यात आले.

# सनातन संस्थेच्या वतीने जानोरकर मंगल कार्यालियात उद्या 'गुरुपौर्णिमा महोत्सव'

प्रतिनिधी २८ जुलै

**अकोला :** सनातन संस्था यंदाचा 'गुरुपौर्णिमा महोत्सव' 'रामराज्याच्या निर्मितीची दिशा स्पष्ट करणारा उत्सव म्हणून साजरा करत आहे. बुधवार, २९ जुलैला जानोरकर मंगल कार्यालय, केशवनगर येथे महोत्सव होणार आहेत.

या महोत्सवात श्री व्यासपूजन आणि भक्तराज महाराज यांचे प्रतिमापूजन (गुरुपूजन), सनातन संस्था आणि संस्थेचे संस्थापक सच्चिदानंद परब्रह्म डॉ. आठवले यांचे कार्यावर लघुपट, धर्मरक्षक आणि हिंदुनिष्ठ यांचे सत्कार, राष्ट्रभक्त अन् धर्मनिष्ठ मान्यवरांचे मार्गदर्शन होणार आहे. पर्वणीचा लाभ सर्व अकोलावासियांनी घ्यावा असे आवाहन सनातन संस्थेच्या सौ. शुभांगी कुलकर्णी यांनी केले आहे. हॉटेल सेट्रल प्लाझा येथे आयोजित पत्रकार परिषदेच्या वेळी त्या बोलत होत्या.





संजय ठाकूर म्हणाले की गुरु पौर्णिमेला गुरुतत्त्व एक हजार पटीने कार्यरत असते आणि त्या गुरुतत्त्वाचा लाभ समाजातील सर्व स्तरावर होण्यासाठी सर्वांनी या गुरुपौर्णिमा महोत्सवाचा अवश्य लाभ घ्यावा. अशी विनंती त्यांनी अकोला वासियांना केली.सौं अश्विनी सरोदे यांनी गुरुपौर्णिमेची माहिती दिली. गुरुपौर्णिमेला प्रमुख वक्ता म्हणून सनातन संस्थेचे राष्ट्रीय प्रवक्ते चेतन राजहंस व काजल राजवैद्य संस्थापक काजल इनोव्हेशन अँड टेक्नॉलॉजी सोल्युशन या लाभणार आहेत.

# व्यंकटेश बालाजी इंग्लिश स्कूलमध्ये एपीजे अब्दुल कलाम यांची पुण्यतिथी साजरी

प्रतिनिधी २८ जुलै

**मुर्तीजापूर :** व्यंकटनाथ महाराज शिक्षण संस्थेद्वारा संचालित व्यंकटेश बालाजी इंग्लिश स्कूलमध्ये भारताचे माजी राष्ट्रपती, महान शास्त्रज्ञ तथा 'मिसाईल मॅन' डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम यांची पुण्यतिथी श्रद्धापूर्वक साजरी करण्यात आली.

कार्यक्रमाच्या सुरुवातीला संस्थेचे अध्यक्ष प्रा. अवधूत ढेरे, पर्यवेक्षिका मीनाक्षी महाजन व वंदना बोंडे यांच्या हस्ते डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम यांच्या प्रतिमेचे पूजन व अभिवादन करण्यात आले.



यावेळी शाळेतील विद्यार्थिनी माही उंबरकर तसेच शिक्षिका वैष्णवी दुबे यांनी डॉ. अब्दुल कलाम यांच्या प्रेरणादायी जीवनकार्यावर प्रकाश टाकत देशाच्या प्रगतीसाठी त्यांनी दिलेल्या अमूल्य योगदानाविषयी मार्गदर्शन केले. त्यांच्या साधेपणा, वैज्ञानिक दृष्टिकोन, राष्ट्रप्रेम आणि विद्यार्थ्यांप्रती असलेल्या प्रेमातून प्रत्येकाने प्रेरणा घ्यावी, असे यावेळी सांगण्यात आले.

डॉ. कलाम यांच्या विचारांचा आणि कार्याचा विद्यार्थ्यांनी आदर्श घेऊन देशाच्या उज्ज्वल भविष्यासाठी योगदान द्यावे, असा संदेश या कार्यक्रमातून देण्यात आला.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन तसेच आभारप्रदर्शन वैष्णवी कांबे यांनी केले. कार्यक्रमास शाळेतील शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते.

# लोंबत्या तारांची दुरूस्ती झाल्याने समाधान



प्रतिनिधी २८ जुलै

**हिवरखेड :** येथील मुख्य रस्त्यावर जुन्या कमानी जवळ ट्रकमुळे सर्विस लाईनच्या तारा रस्त्यावर लोंबत होत्या. काही काळ प्रवासी वाहतूक ठप्प झाली होती. जीवित हानी होऊ नये म्हणून सामाजिक कार्यकर्त्यांनी तत्परता दाखविली. ही बाब रामधन अग्रवाल यांच्या मुलांनी लक्षात सदर बाब आणून दिली.

याबाबत माजी सरपंच संदीप इंगळे, मनसेचे निखिल कराळे , सागर उरकडे, शाहरुख लाला यांनी तात्काळ दखल घेऊन वीज वितरण कंपनीशी संपर्क साधला व सागर काळे यांच्या माध्यमातून विद्युत तारा परत जोडून वाहतूक पुन्हा सुरळीत केली.

# कारगिल विजय दिनी विवेकानंद स्कूलचा पर्यावरणाचा संदेश

प्रतिनिधी २८ जुलै

**अकोट :** कारगिल विजय दिनानिमित्त अकोट येथील नामांकित श्री स्वामी विवेकानंद इंग्लिश स्कूलमध्ये देशभक्ती, पर्यावरण संवर्धन आणि शैक्षणिक बांधिलकी यांचा संगम घडवून आणणाऱ्या विविध कार्यक्रमांचे उत्साहपूर्ण आयोजन करण्यात आले.

कारगिल विजय दिनाचे औचित्य साधून शाळेच्या परिसरात वृक्षारोपण कार्यक्रम पार पडला. शाळेच्या आवारात तसेच क्रीडांगणावर विविध सावलीच्या वृक्षांची लागवड संस्था पदाधिकारी, मुख्याध्यापक व शिक्षक यांच्या हस्ते करण्यात आली. "झाडे लावा – देश वाचवा" हा पर्यावरण संवर्धनाचा संदेश विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचविणे हा या उपक्रमामागील प्रमुख उद्देश होता.

यात्रसंगी संस्थेचे अध्यक्ष अशोक मंगलानी, उपाध्यक्ष पुरुषोत्तमजी मुरकुटे, उपाध्यक्ष दिलीपजी अग्रवाल, सचिव प्रा. मोबीन शेख, शाळा समितीचे चेअरमन व सहसचिव दिलीपजी चावडा, कोषाध्यक्ष मुरलीधर रामनानी तसेच संस्था सदस्य मेहुल नगदिया यांची प्रमुख उपस्थिती होती. याच कार्यक्रमात संस्थेचे उपाध्यक्ष दिलीप अग्रवाल यांचा वाढदिवस उत्साहात साजरा करण्यात आला. केक कापून तसेच पुष्पगुच्छ देऊन त्यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा देण्यात आल्या. संस्थेचे सचिव प्रा. मोबीन शेख यांनी सर्वांना नवीन शैक्षणिक वर्षाच्या शुभेच्छा दिल्या.



संस्थेचे उपाध्यक्ष दिलीप अग्रवाल यांनी विद्यार्थ्यांमध्ये शिस्त, नियमांचे पालन आणि गुणवत्तापूर्ण शिक्षणाचे महत्त्व अधोरेखित केले. संस्था सदस्य मेहुल नगदिया यांनी पुत्र केशव नगदिया यांच्या स्मरणार्थ इयत्ता दहावीमध्ये प्रथम क्रमांकाने उत्तीर्ण होणाऱ्या विद्यार्थ्यास दरवर्षी ₹५,००० ची शिष्यवृत्ती देण्याची घोषणा केली. शाळा समितीचे नवनियुक्त चेअरमन दिलीप चावडा यांनी कारगिल युद्धातील शहीद जवानांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण केली. संस्थेचे अध्यक्ष अशोक मंगलानी यांनी "शिस्त, शिक्षण आणि उत्कृष्ट निकाल" ही त्रिसूत्री प्रत्येक शिक्षकाने अंगीकारावी, असे प्रतिपादन केले. शाळेचे मुख्याध्यापक हरीश पाचकवडे यांनी सर्व शिक्षकांच्या सहकार्याने शाळेचा विकास शक्य आहे असे सांगितले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन हर्षल बहादुरे यांनी केले, तर प्रणाली शामस्कर यांनी आभार मानले. प्राची अहिर यांनी सुरेल स्वरांनी वाढदिवसानिमित्त गीत सादर केले.

# एमआयडीसी मध्ये सुदैवाने मोठी दुर्घटना टळली

प्रतिनिधी २८ जुलै

**अकोला:** येथील मलकापूर एमआयडीसी क्रमांक-२ स्थित मलकापूर रेल्वे गेटवर रविवारी एक मोठा अपघात टळला. रस्त्याची योग्य माहिती नसल्यामुळे एक ट्रक रेल्वे गेटजवळ अडकला. ट्रकच्या अगदी वरून हायटेंशन विजेची वाहिनी (लाईन) गेली होती, तर रेल्वेचे रूळही काही अंतरावरच होते. वेळेत चालकाने दाखवलेल्या सतर्कतेमुळे ट्रक थांबला आणि मोठा अपघात टळला. माहिती मिळताच स्थानिक नागरिक घटनास्थळी पोहोचले आणि त्यांनी मोठ्या मेहनतीनंतर ट्रकला सुरक्षितपणे बाहेर काढले. या घटनेनंतर स्थानिक नागरिकांनी रेल्वे गेट परिसरात जड वाहनांसाठी उत्तम सुरक्षा व्यवस्था आणि योग्य दिशादर्शक फलकांची मागणी केली आहे.



# बोगस बियाण्यांबाबत माहिती मिळेना; जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी 'नॉट रिचेबल'

प्रतिनिधी २८ जुलै

**अकोला:** खरीप हंगामात बोगस बियाण्यांच्या तक्रारी आणि कृषी विभागाच्या कारवाईबाबत माहिती घेण्यासाठी जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी यांच्याशी संपर्क साधण्याचा प्रयत्न करण्यात आला. मात्र, वारंवार दूरध्वनी करूनही त्यांच्याशी संपर्क होऊ शकला नाही.

दरम्यान, संबंधित अधिकारी आज आत्मा कार्यालयातील बैठकीत उपस्थित असल्याची माहिती विभागीय सूत्रांकडून मिळाली. मात्र, बैठकीदरम्यानही दूरध्वनीवर संपर्क न झाल्याने बोगस बियाण्यांवरील कारवाई, जिल्ह्यातील पेरणीचे क्षेत्र, तपासणी मोहिमा आणि शेतकऱ्यांकडून प्राप्त तक्रारींबाबत अधिकृत माहिती मिळू शकली नाही.

खरीप हंगाम सुरू असताना शेतकऱ्यांशी संबंधित महत्त्वाची माहिती वेळेत उपलब्ध होणे आवश्यक आहे. त्यामुळे बोगस बियाण्यांवरील कारवाईचा तपशील, तपासणीची आकडेवारी आणि पेरणीची अधिकृत माहिती कृषी विभागाने सार्वजनिक करावी, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

# हिवरखेड मध्ये रुग्णांच्या संख्येत वाढ



प्रतिनिधी २८ जुलै

**हिवरखेड :** येथे शासकीय निमशासकिय दवाखाने दिवसांन दिवस गच्च भरत आहेत, याचे कारणही मोठे समोर येत आहे, गावातील दैनदिन होणारा पाणीपुरवठा हा सुरळीत सुरू आहे याबाबत कुठलीच शंका नाही, परंतु नागरिकांना मिळणारे पाणी हे गढूळ स्वरूपाचे येत असून यामध्ये कुठेतरी गाळ साचलेला असून. पिण्याच्या पाण्यामध्ये

वेगळ्या प्रकाराचे, शार , येत असल्याचे नागरिक सांगीत आहेत ज्यामुळे हे पाणी पिल्यानंतर. नागरिकांना पोटदुखी, सर्दी, खोकला, व संडासची लक्षणे होत आहेत, यामुळें रुग्ण संख्येत वाढ होत आहे. नागरिकांना शुद्ध पाणी पुरवठा करावा अशी मागणी आहे.

रुग्णांनी पाणी उकळून प्यावे, पिण्याच्या पाण्यात आम्ही दिलेले पावडर घालायचे जेणेकरून पाणी शुद्ध होईल पिण्यास योग्य होईल,

**वैशाली ठाकरे,** प्रभारी वैद्यकीय अधिकारी

--------------

सध्या पावसाळा असून अशा प्रकारे पाणी पुरवठा होतोच. तरीही आम्ही पाणीपुरवठा विभागात नागरिकांना चांगलेच पाणी मिळावे यासाठी नेहमी प्रयत्न करीत राहतो.

**अजीज खा,** पाणीपुरवठा सभापती

--------------

दैनंदिन होणारा पाणी पुरवठा गढूळ स्वरूपाचा होत असल्याने बऱ्याच नागरिकांना उलटी, संडास, पोटदुखी समोरे जावे लागत आहे, सबंधित विभागे तत्काळ पिण्याच्या पाण्यामध्ये बिलचिंग पावडर जीवन ड्रॉप टाकावे जेणेकरून पाणी शुद्ध मिळेल,

**प्रशांत भोपळे,** समाजसेवक


प्रोसेस क्र. ३४५१/२०२६

**जाहीर नोटीस**

**अमरावती येथील विद्यमान तदर्थ जिल्हा व सत्र न्यायाधिश ३, यांचे न्यायालय**

नियमित दिवाणी अपील क्र. २५/२०२६ ने.ता. ०३/०८/२०२६

**Applicant** : Mesponic Lodge Committee, Amravati Through The President Sanjay Raghunath Wankhade

-Versus-

**Respondent** : Lodge Berar No. 28, G.L.I., Amravati Through Pravin Sharadchandra Malpani and 6

**बनाम:** १. हरीण बाबुराव पिल्ले २. विजय बाबुराव पिल्ले ३. सदानंद बाबुराव पिल्ले ४. कु. विमल बाबुराव पिल्ले ५. कु. मंजु बाबुराव पिल्ले सर्व रा. टोपेनगर, अमरावती ता. जि. अमरावती

**APPEAL UNDER SECTION 96 OF THE CIVIL PROCEDURE CODE**

ज्याअर्थी वरील अपीलार्थी यांनी वि. तदर्थ जिल्हा न्यायाधीश -३, अमरावती यांच्या न्यायालयात अपील दाखल केले आहे

त्याअर्थी वरील उत्तरवादी हरीष बाबुराव पिल्ले, विजय बाबुराव पिल्ले, सदानंद बाबुराव पिल्ले, विमल बाबुराव पिल्ले, मंजु बाबुराव पिल्ले यांना पेपर प्रसिध्दीव्दारे नोटीस देण्यात येते की, त्यांनी अपीलाचे सुनावणीसाठी दिनांक ०३/०८/२०२६ रोजी सकाळी ११.०० वाजता वि. तदर्थ वर्ष जिल्हा न्यायाधीश ३. अमरावती यांचे न्यायालयात स्वतः किंवा रितसर निर्दीष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर व्हावे. वर नमुद केलेल्या तारखेस जर कोणीही हजर न झाल्यास सदहू अपीलाची एकतर्फी सुनावणी होवून निकाल दिला जाईल.

आज दिनांक २३ ०७.२०२६ रोजी माझे सहीनिशी व कोर्टाच शिक्क्यानिशी प्रसिद्धीसाठी दिला.

अमरावती
दि.: २३.०७.२०२६

आदेशानुसार
सहा. अधिक्षक (न्यायीक विभाग)
जिल्हा व सत्र न्यायालय , अमरावती



सत्यमेव जयते

DIRECTOR OF HEALTH SERVICES, MAHARASHTRA
Government of Maharashtra
CIVIL SURGEON, GENERAL HOSPITAL, AKOLA.
E-mail:cs_akola@rediffmail.com
Phone: 0724-2435018
Tender or supply of
TENDER FEES 25,000/- NON REFUNDABLE
Tender For STP ETP Project Turnkey Basis.

ETender Ref.No........
CIVIL SURGEON, GENERAL HOSPITAL, AKOLA.
(MAHARASHTRA STATE)

Tender reference No.02/CSGHSDH/E-TENDER/2026-27 (2026 DHS 1317952_1) CIVIL SURGEON, GENERAL HOSPITAL, AKOLA. Invites Online E-TENDER in two bid system from the Manufacturers/ Sole Distributors supplier Supply STP ETP Project on Turnkey Basis at DHW AKOLA Tq. AKOLA Dist.AKOLA.

For detail Tender document, interested bidder should visit https://mahatenders.gov.in Tender will be available for downloading and submission online from 16/7/26 upto 28/07/26 at 17.00 hrs.

-Sd-
Dr. Arti Kulwal
Civil Surgeon, Akola

सिटी न्यूज सुपरफास्ट यवतमाळ
मंगळवार, दि. २८ जुलै २०२६
https://epaper.citynewssuperfast.com

# दहा वर्षांनंतर जुळले प्रेमाचे धागे; विवाहित महिला-पुरुषाची आत्महत्या

प्रतिनिधी २८ जुलै

**यवतमाळ :** घाटंजी तालुक्यातील मानोली शिवारात जुन्या प्रेमसंबंधातून पुन्हा एकत्र आलेल्या विवाहित महिला आणि विवाहित पुरुषाने विषारी औषध प्राशन करून आत्महत्या केल्याची घटना समोर आली आहे. या घटनेने परिसरात खळबळ उडाली असून, आत्महत्येमागील नेमके कारण काय, याचा शोध पोलिसांनी सुरू केला आहे.

गणेश नामदेव ढोले आणि अंजली जोगेंद्र मीना अशी मृतकांची नावे आहे. प्राथमिक माहितीनुसार, सुमारे दहा वर्षांपूर्वी दोघांमध्ये प्रेमसंबंध होते. त्यानंतर अंजली कामानिमित्त राजस्थानला गेली. तेथे कुटुंबीयांनी तिचा विवाह लावून दिला. तिला दोन मुले असून, दरम्यान गणेशचाही विवाह झाला होता.




काही दिवसांपूर्वी सोशल मीडियाच्या माध्यमातून दोघांचा पुन्हा संपर्क झाला. त्यानंतर अंजली दोन दिवसांपूर्वी मानोली येथे आली होती. या भेटीनंतर दोघांनी मानोली शिवारात विषारी औषध प्राशन केल्याचा प्राथमिक अंदाज व्यक्त करण्यात येत आहे. मात्र, या टोकाच्या निर्णयामागील कारण अद्याप स्पष्ट झालेले नाही.

घटनेची माहिती मिळताच घाटंजी पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत पंचनामा केला. दोन्ही मृतदेह शवविच्छेदनासाठी पाठविण्यात आले असून, अहवालानंतर मृत्यूचे नेमके कारण स्पष्ट होणार आहे.

या प्रकरणाचा तपास पोलीस निरीक्षक केशव ठाकरे यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू असून, दोघांच्या संपर्काचा इतिहास, घटनाक्रम आणि आत्महत्येस कारणीभूत ठरलेल्या परिस्थितीचा तपास केला जात आहे.

# तीन दिवस घरात असलेला नाग पकडला; सर्पमित्रांच्या तत्परतेने अनर्थ टळला






प्रतिनिधी २८ जुलै

**झरी-जामणी :** झरी-जामणी तालुक्यातील माथार्जून येथील मारुती कुरसंगे यांच्या घरात गेल्या तीन दिवसांपासून विषारी नाग लपून बसल्याने कुटुंबीयांसह परिसरातील नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले होते. अखेर रविवारी सर्पमित्रांनी धाव घेत सुरक्षितरीत्या नागाला पकडत संभाव्य अनर्थ टाळला.

घरात नाग असल्याची माहिती मिळताच सर्पमित्र नागेश तुटेवार व त्यांचे सहकारी रेहान खान यांनी तातडीने घटनास्थळी पोहोचून रेस्क्यू मोहीम हाती घेतली. अत्यंत सावधगिरीने आणि कोणतीही इजा न करता त्यांनी नागाला पकडले. त्यानंतर वन्यजीव संवर्धनाच्या नियमांचे पालन करत नागाला त्याच्या नैसर्गिक अधिवासात सुरक्षितपणे सोडण्यात आले.

सलग तीन दिवस घरात विषारी नाग असल्यामुळे कुटुंबीयांमध्ये भीतीचे वातावरण होते. मात्र सर्पमित्रांच्या तत्परतेमुळे मोठा अनर्थ टळल्याने ग्रामस्थांनी समाधान व्यक्त केले. या धाडसी कार्याबद्दल गावकऱ्यांनी सर्पमित्रांचे कौतुक करून त्यांचे आभार मानले.

दरम्यान, पावसाळ्यात साप घरात किंवा परिसरात आढळल्यास घाबरून जाऊ नये किंवा त्याला मारण्याचा प्रयत्न करू नये. अशा वेळी तातडीने सर्पमित्र किंवा वन विभागाशी संपर्क साधून सुरक्षितरीत्या रेस्क्यू करून घ्यावे, असे आवाहन सर्पमित्रांनी केले.

# अनैतिक संबंधांच्या संशयातून खून; आरोपीला जन्मठेप

प्रतिनिधी २८ जुलै

**यवतमाळ :** अनैतिक संबंधांच्या संशयातून एका तरुणावर चाकूने जीवघेणा हल्ला करून त्याचा खून केल्याप्रकरणी प्रमुख जिल्हा व सत्र न्यायालयाने आरोपीला जन्मठेपेची शिक्षा सुनावली आहे. तसेच २ हजारांचा दंडही ठोठावला आहे.

शाम सुभाष जोगदंड (वय २८, रा. नेताजीनगर, यवतमाळ) असे आरोपीचे नाव आहे.

लोहारा पोलिस ठाण्यातील अपराध क्रमांक २१४/२०२४ मधील आरोपी शाम सुभाष जोगदंड (वय २८, रा. नेताजीनगर, यवतमाळ) याने २ जून २०२४ रोजी रंभाजीनगर येथे हेमंत कांबळे यांच्यावर चाकूने हल्ला केला होता. हेमंत कांबळे यांचे आरोपीच्या संशयानुसार अनैतिक संबंध असल्याच्या कारणावरून हा हल्ला करण्यात आला. गंभीर जखमी झालेल्या हेमंत कांबळे यांचा उपचारादरम्यान मृत्यू झाला.



या प्रकरणी मृतकाच्या पत्नीच्या फिर्यादीवरून लोहारा पोलिस ठाण्यात भारतीय दंड संहितेच्या कलम ३०२, ५०४ व ५०६ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पोलिस निरीक्षक यशोधरा मुनेश्वर यांनी सखोल तपास करून न्यायालयात दोषारोपपत्र दाखल केले. या खटल्यात सरकारी पक्षाने एकूण १० साक्षीदार तपासले. प्रत्यक्षदर्शी साक्षीदार, वैद्यकीय अधिकारी, फिर्यादी, तपास अधिकारी व इतर साक्षीदारांच्या साक्षी तसेच सादर करण्यात आलेल्या दस्तऐवजांच्या आधारे आरोपीविरुद्धचा गुन्हा सिद्ध झाल्याचे न्यायालयाने नमूद केले.

प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश ए. एल. यावलकर यांनी आरोपी शाम जोगदंड याला भारतीय दंड संहितेच्या कलम ३०२ अंतर्गत दोषी ठरवत जन्मठेपेची (सश्रम कारावास) शिक्षा सुनावली. तसेच २ हजारांचा दंडही ठोठावला. या खटल्यात सरकारी पक्षातर्फे सहायक सरकारी वकील नरेंद्र एन. पांडे यांनी युक्तिवाद केला. तर त्यांना ॲड राहुल पाटील यांनी सहकार्य केले. तर तपास अधिकारी पोलिस निरीक्षक यशोधरा मुनेश्वर यांना सहाय्यक पोलिस उपनिरीक्षक जगदीश भगत यांनी तपासात सहकार्य केले.

# शाळेचे मैदान की जनावरांचा कोंडवाडा?

## विद्यार्थ्यांच्या आरोग्य व सुरक्षिततेचा प्रश्न ऐरणीवर

प्रतिनिधी २८ जुलै

**उमरखेड :** शहरातील मोकाट जनावरांच्या वाढत्या वावरामुळे नागरिकांसह विद्यार्थ्यांनाही मोठा त्रास सहन करावा लागत आहे. पुसद रोडवरील ऐतिहासिक जिल्हा परिषद मुलांच्या शाळेचे विस्तीर्ण मैदान सध्या मोकाट जनावरांचा कायमस्वरूपी अड्डा बनल्याचे चित्र असून, विद्यार्थ्यांच्या आरोग्य व सुरक्षिततेबाबत चिंता व्यक्त केली जात आहे.

शहरातील नांदेड रोड, बसस्थानक परिसर, पुसद रोड, ढाणकी रोड आणि हनुमान मंदिर परिसरात दिवसभर मोकाट जनावरे रस्त्यावर वावरत असल्याने वाहतुकीलाही अडथळा निर्माण होत आहे. सकाळी व सायंकाळी ही जनावरे मोठ्या संख्येने जिल्हा परिषद शाळेच्या मैदानात जमा होत असल्याने विद्यार्थ्यांना खेळणे तर दूरच, मैदानातून चालणेही कठीण झाले आहे.

मैदानात सर्वत्र शेण साचल्याने दुर्गंधी पसरत असून संसर्गजन्य आजारांचा धोका वाढल्याची भीती पालकांकडून व्यक्त केली जात आहे. विद्यार्थ्यांच्या खेळाच्या मैदानाचे रूपांतर जनावरांच्या विसाव्याच्या ठिकाणात झाल्याने पालक आणि नागरिकांमध्ये नाराजी आहे.

दरम्यान, शाळेच्या प्रवेशद्वाराजवळ अतिक्रमण झाल्याचा आरोपही करण्यात आला आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांना अरुंद मार्गाने ये-जा करावी लागत असून अपघाताचा धोका वाढला आहे.

या पार्श्वभूमीवर नगरपरिषद प्रशासनाने मोकाट जनावरांसाठी तातडीने कोंडवाड्याची व्यवस्था करावी, शाळेचे मैदान स्वच्छ करून विद्यार्थ्यांना सुरक्षित वातावरण उपलब्ध करून द्यावे, तसेच प्रवेशद्वाराजवळील अतिक्रमण हटवावे, अशी मागणी शाळेचे मुख्याध्यापक प्रशांत धुळे यांनी केली आहे. तसेच शहरातील विविध भागांतील मोकाट जनावरांच्या समस्येवर कायमस्वरूपी उपाययोजना करण्याची मागणी पालक व नागरिकांनी केली आहे.

# कर्जमाफीच्या यादीत नाव नाही; नैराश्यातून शेतक-याची आत्महत्या

## लाखोंच्या कर्जाच्या ओझ्याखाली दबलेल्या राजू चुड्डके यांचे टोकाचे पाऊल; कुटुंबावर दुःखाचा डोंगर

प्रतिनिधी २८ जुलै

**यवतमाळ :** राळेगाव तालुक्यातील भांब येथील शेतकरी राजू बापुराव चुड्डके यांनी कर्जमाफीच्या यादीत नाव नसल्याच्या नैराश्यातून विष प्राशन करून आत्महत्या केल्याची दुर्दैवी घटना घडली. उपचारादरम्यान त्यांचा मृत्यू झाला असून या घटनेमुळे परिसरात हळहळ व्यक्त होत आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, राजू चुड्डके यांच्या नावावर मौजा मुधापूर उजाड येथे १ हेक्टर ३९ आर शेती आहे. त्यांच्या नावावर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे एक लाख रुपयांहून अधिक पीककर्ज, विविध मायक्रो फायनान्स कंपन्यांचे सुमारे अडीच लाख रुपयांचे कर्ज तसेच घरकुलासाठी घेतलेले खासगी कर्ज होते. सततची नापिकी, वाढते कर्ज आणि आर्थिक विवंचना यामुळे ते आधीच मानसिक तणावाखाली होते.



दरम्यान, राळेगाव येथील जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेत प्रसिद्ध झालेल्या कर्जमाफीच्या यादीत आपले नाव नसल्याचे समजल्यानंतर ते अधिकच खचल्याचे सांगितले जात आहे. त्यानंतर त्यांनी विष प्राशन केले. कुटुंबीयांनी त्यांना उपचारासाठी रुग्णालयात दाखल केले; मात्र उपचारादरम्यान त्यांची प्राणज्योत मालवली. मृत राजू चुड्डके यांच्या पश्चात पत्नी आणि दोन लहान मुले असा परिवार असून या घटनेमुळे कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला आहे. शासनाने या प्रकरणाची गंभीर दखल घेऊन कुटुंबाला तातडीची आर्थिक मदत द्यावी, अशी मागणी ग्रामस्थांकडून होत आहे.

दरम्यान, या घटनेवर प्रतिक्रिया देताना शेतकरी नेते मनीष जाधव यांनी सरकारच्या कर्जमाफी धोरणावर तीव्र टीका केली. ते म्हणाले, "शेतकरी आधीच सततची नापिकी, पावसाचा लहरीपणा आणि दुष्काळाच्या संकटातून जात आहे. अशा परिस्थितीत शासनाने पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या नावाने कर्जमाफी योजना सुरू केली. खरीप हंगामात शेतकऱ्यांना वेळेत कर्जपुरवठा होणे अत्यंत आवश्यक असताना तांत्रिक कारणांमुळे अनेक पात्र शेतकरी कर्जमाफीपासून वंचित राहत आहेत. त्यामुळे शेतकरी नैराश्याकडे ढकलले जात असून अशा धोरणांमुळे आत्महत्यांचे प्रमाण वाढण्याची भीती आहे. या आत्महत्या नसून शासन व्यवस्थेच्या अपयशातून घडलेल्या हत्या आहेत."

# ३ हजार ६०३ शेतकरी कर्जमाफीच्या यादीत

प्रतिनिधी २८ जुलै

**राळेगाव :** तीन हजार ६०३ शेतकऱ्यांची कर्जमाफीची पहिली यादी जाहीर करण्यात आली आहे. कर्जमाफी मिळालेल्या शेतकऱ्यांच्या याद्या संबंधित बँकेच्या शाखेत, सोसायटीत व सहायक निबंधक कार्यालयात लावल्या आहे. चार हजार १४५ शेतकऱ्यांची दुसरी यादी येणे बाकी आहे. पात्र शेतकऱ्यांनी आधार प्रमाणीकरण करून घ्यावे, असे आवाहन सहायक निबंधक नाईक यांनी केले आहे. यादीत नाव नसले तरी घाबरून न जाता सर्व संबंधित एजन्सीशी संपर्क साधून त्रुटी जाणून घेऊन त्या पूर्ण कराव्यात, असे सूचित केले आहे.

# पाच दिवस दडी; आता येलो अलर्ट

प्रतिनिधी २८ जुलै

**यवतमाळ :** जिल्ह्यात पावसाने मागील पाच दिवसांपासून दडी मारली आहे. काही ठिकाणी तुरळक सरी कोसळल्या. मात्र, वातावरणातील उष्णता कायम आहे. या पाच दिवसात उकाडा वाढला असून पावसाची चिंता सर्वांनाच सतावू लागली आहे. यातच हवामान विभागाने पुढील तीन दिवस दमदार पाऊस येणार असल्याचा अंदाज वर्तविला आहे. यासाठी जिल्ह्यात यलो अलर्टही देण्यात आला आहे. खरिपाच्या पेरण्या होऊन पावसाने दडी मारली आहे. यामुळे मोठे संकट शेतकऱ्यांपुढे निर्माण झाले आहे. पिके वाचविण्यासाठी उपलब्ध साधनांचा वापर करीत सिंचन करण्यात येत आहे. यातही कृषी पंपाला नियमित वीज मिळत नसल्याने रोष आहे.

# यवतमाळ-माहूर रेल्वे मार्गाच्या मागणीला गती?

## नितीन गडकरींकडून कृती समितीला सकारात्मक आश्वासन : शिष्टमंडळाची नागपुरात भेट

प्रतिनिधी २८ जुलै

**आर्णी :** यवतमाळ-आर्णी-हिवरा-माहूर-किनवट या प्रस्तावित रेल्वे मार्गाच्या मागणीला आणखी बळ मिळण्याची चिन्हे दिसू लागली आहेत. केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांनी केंद्रीय रेल्वे कृती समितीच्या शिष्टमंडळाची नागपुरात भेट घेऊन निवेदन स्वीकारले. रेल्वे मार्गाच्या प्रस्तावाबाबत सविस्तर माहिती घेत सकारात्मक प्रतिसाद दिल्याचे समितीने सांगितले.

या रेल्वे मार्गासाठी गेल्या काही दिवसांपासून विविध स्तरांतून पाठिंबा वाढत आहे. दहा दिवसांपूर्वी माहूर येथे झालेल्या सर्वपक्षीय विचारविनिमय



बैठकीत खासदार प्रतिभाताई धानोरकर, आमदार प्रा. राजू तोडसाम, आमदार किसन वानखडे, माजी आमदार तसेच विविध लोकप्रतिनिधींनी या मागणीला पाठिंबा दर्शविला होता. महंत गुरु डॉ. धनेश्वर भारती यांनीही कृती समितीच्या प्रयत्नांचे स्वागत करून आशीर्वाद दिले होते.

संसदेचे अधिवेशन सुरू असतानाही नितीन गडकरी यांनी वेळ काढून शिष्टमंडळाशी चर्चा केली. रेल्वे मार्गाची आवश्यकता, संभाव्य लाभ आणि विदर्भ-मराठवाडा जोडणाऱ्या या मार्गाचे महत्त्व याबाबत समितीच्या पदाधिकाऱ्यांनी त्यांच्यासमोर भूमिका मांडली. त्यावर गडकरी यांनी विषय सकारात्मकपणे विचारात घेण्याचे आश्वासन दिल्याचे समितीने स्पष्ट केले. माहूर हे रेणुकादेवीचे शक्तिपीठ असून, नितीन गडकरी यांची कुलदैवतही रेणुकादेवी आहे. त्यामुळे माहूरच्या विकासासाठी त्यांनी यापूर्वी रस्ते आणि विविध पायाभूत सुविधा उभारण्यासाठी पुढाकार घेतला आहे. रेणुकादेवी गडाच्या पायथ्यापासून स्काय वॉक उभारण्याचे कामही सुरू आहे.

नागपूर येथील भेटीदरम्यान केंद्रीय रेल्वे कृती समितीचे उपाध्यक्ष गणेश हिरोळे, दयानंद मिश्रा, विनोद गिरी, दत्तात्रय भोयर आणि अनिल गेडाम उपस्थित होते. गडकरी यांनी दिलेल्या सकारात्मक प्रतिसादामुळे रेल्वे मार्गाच्या मागणीला नवी चालना मिळेल, अशी अपेक्षा कृती समितीने व्यक्त केली.

# दीड वर्षांपासून विज्ञान शिक्षकांचा अभाव

## भौतिकशास्त्र, रसायनशास्त्र शिक्षकांची पदे रिक्त

प्रतिनिधी २८ जुलै

**झरी-जामणी :** तालुक्यातील शासकीय आश्रम शाळा, शिबला येथे इयत्ता ११ वी व १२ वी विज्ञान शाखेसाठी गेल्या दीड वर्षांपासून भौतिकशास्त्र आणि रसायनशास्त्र विषयांचे नियमित शिक्षक नसल्याने विद्यार्थ्यांच्या शिक्षणावर गंभीर परिणाम होत आहे. विज्ञान शाखेतील महत्त्वाच्या विषयांसाठी शिक्षक उपलब्ध नसल्याने विद्यार्थ्यांचे शैक्षणिक भवितव्य धोक्यात आल्याची चिंता पालक व नागरिकांनी व्यक्त केली आहे.

**शिबला आश्रम शाळेतील विद्यार्थ्यांचे भवितव्य धोक्यात**

वैद्यकीय, अभियांत्रिकी तसेच इतर व्यावसायिक अभ्यासक्रमांमध्ये प्रवेशासाठी विज्ञान शाखेतील विद्यार्थ्यांना भक्कम शैक्षणिक पाया आवश्यक असतो. मात्र, संबंधित विषयांचे शिक्षक नसल्यामुळे विद्यार्थ्यांना आवश्यक मार्गदर्शन मिळत नसून स्पर्धा परीक्षांच्या तयारीवरही विपरीत परिणाम होत आहे.

शिक्षकांच्या कमतरतेमुळे अनेक विद्यार्थ्यांना खासगी शिकवण्यांचा आधार घ्यावा लागत आहे. आर्थिकदृष्ट्या दुर्बल आदिवासी कुटुंबांतील विद्यार्थ्यांसाठी हा अतिरिक्त खर्च परवडणारा नसल्याने गुणवत्तापूर्ण शिक्षणापासून ते वंचित राहत असल्याची खंत व्यक्त होत आहे.

गेल्या दीड वर्षांपासून रिक्त असलेल्या भौतिकशास्त्र व रसायनशास्त्र शिक्षकांच्या पदांमुळे विद्यार्थ्यांच्या अभ्यासात सातत्य राहत नसून त्यांच्या शैक्षणिक प्रगतीवर परिणाम होत आहे. त्यामुळे आदिवासी विकास विभागाने तातडीने दखल घेऊन शासकीय आश्रम शाळा, शिबला येथे पात्र व नियमित शिक्षकांची नियुक्ती करावी, अशी मागणी विद्यार्थी, पालक आणि परिसरातील नागरिकांनी केली आहे.

# जनसेवा सप्ताहात आरोग्य, शिक्षण ते पर्यावरण संवर्धनाचे उपक्रम

## स्व. अजितदादा पवार जयंतीनिमित्त पुसदमध्ये विविध समाजोपयोगी कार्यक्रम

प्रतिनिधी २८ जुलै




**पुसद :** स्व. अजितदादा पवार यांच्या जयंतीनिमित्त राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या वतीने पुसद येथे २२ ते २६ जुलैदरम्यान जनसेवा सप्ताह विविध समाजोपयोगी उपक्रमांनी उत्साहात साजरा करण्यात आला. आरोग्य, शिक्षण, पर्यावरण संवर्धन, धार्मिक सेवा आणि संघटनात्मक बळकटी या पाच प्रमुख क्षेत्रांतील उपक्रमांना नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

जनसेवा सप्ताहाची सुरुवात स्व. अजितदादा पवार यांच्या प्रतिमेचे पूजन करून झाली. त्यानंतर आयोजित मोफत रोगनिदान, नेत्रतपासणी आणि रक्तदान शिबिरात शेकडो नागरिकांनी सहभाग घेतला. तज्ज्ञ डॉक्टरांनी आरोग्य तपासणी करून आवश्यक मार्गदर्शन केले.

दुसऱ्या दिवशी नगर परिषद क्षेत्रातील इयत्ता पहिली ते सातवीच्या विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले. विद्यार्थ्यांमध्ये इतिहासाची जाण आणि राष्ट्रप्रेमाची भावना रुजावी, या उद्देशाने छत्रपती शिवाजी महाराजांच्या किल्ल्यांच्या प्रतिकृतीही देण्यात आल्या.

श्रीरामपूर परिसरातील गरजू विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले. तसेच पी.एन. कॉलेज ऑफ सायन्स, आर्ट अँड कॉमर्स येथे वृक्षारोपण कार्यक्रम पार पडला. यावेळी आषाढी एकादशीनिमित्त विद्यार्थ्यांनी साकारलेला विठ्ठल-रुक्मिणी देखावा आकर्षणाचा केंद्रबिंदू ठरला. वृक्ष लागवडीसोबतच त्यांचे संगोपन करण्याचा संदेश देण्यात आला. बंजारा कॉलनीतील संत सेवालाल सांस्कृतिक भवन परिसरातही "एक वृक्ष - एक संकल्प" उपक्रमांतर्गत वृक्षारोपण करण्यात आले.

आषाढी एकादशीनिमित्त पुसद बसस्थानक परिसरात विठ्ठल-रुक्मिणी दर्शनासाठी आलेल्या भाविकांसह प्रवाशांना फराळाचे वाटप करण्यात आले. या सेवाभावी उपक्रमाचा हजारो भाविकांनी लाभ घेतला. जनसेवा सप्ताहाचा समारोप नाईक बंगला येथे आयोजित पक्षप्रवेश सोहळ्याने झाला. पुसद व उमरखेड तालुक्यातील विविध गावांतील अनेक नागरिकांनी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात प्रवेश केला.

यावेळी राज्यमंत्री इंद्रनील नाईक यांनी, स्व. अजितदादा पवार यांच्या स्मृतीप्रित्यर्थ समाजोपयोगी उपक्रम राबविणे हीच त्यांना खरी आदरांजली असल्याचे सांगितले. नगराध्यक्ष मोहिनी नाईक यांनी शिक्षण, आरोग्य, पर्यावरण आणि समाजसेवेच्या माध्यमातून नागरिकांशी असलेले नाते अधिक दृढ करण्याचा प्रयत्न असल्याचे नमूद केले.

जनसेवा सप्ताहातील सर्व कार्यक्रमांना राज्यमंत्री इंद्रनील नाईक, नगराध्यक्ष मोहिनी नाईक, राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हा, तालुका व शहर पदाधिकारी, नगर परिषदेचे पदाधिकारी, नगरसेवक, विद्यार्थी, व्यापारी, पोलीस भरतीची तयारी करणारे युवक-युवती तसेच नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## नाव बदल जाहीरनामा

मी, Rahila Tabassum Mahommad Idris (राहिला तबस्सुम मोहम्मद इद्रीस), वडील Mahommad Idris (मोहम्मद इद्रीस), रा. महागाव, ही जाहीर करते की माझा विवाह दि. 15/02/2015 रोजी Shahbaj Suraiyya (शहबाज सुरैया) यांच्याशी झाल्यानंतर माझे नाव Rahila Shahbaj Suraiyya (राहिला शहबाज सुरैया) असे झाले आहे.

त्यामुळे Rahila Tabassum Mahommad Idris (राहिला तबस्सुम मोहम्मद इद्रीस) आणि Rahila Shahbaj Suraiyya (राहिला शहबाज सुरैया) ही दोन्ही नावे एकाच व्यक्तीची असून, यापुढे सर्व शासकीय, पासपोर्ट, बँक व इतर सर्व नोंदींमध्ये Rahila Shahbaj Suraiyya (राहिला शहबाज सुरैया) हेच नाव माझे वैध नाव म्हणून ग्राह्य धरावे.

## आझाद हिंद मंडळात गुरुपौर्णिमा उत्सव 29 जुलै रोजी गुणवंत विद्यार्थी व खेळाडूंचा होणार सत्कार

**अमरावती :** आझाद हिंद मंडळ, बुधवारा यांच्या वतीने भारतीय संस्कृतीचे जतन व गुरु-शिष्य परंपरेचा गौरव करण्यासाठी गुरुपौर्णिमा उत्सव आयोजित करण्यात आला आहे. तसेच देशभक्त स्व. नानासाहेब बामणगावकर स्मृती प्रित्यर्थ गुणवंत विद्यार्थी व खेळाडूंचा सत्कारही यावेळी करण्यात येणार आहे. हा कार्यक्रम बुधवार, २९ जुलै २०२६ रोजी सायंकाळी ६.०० वाजता स्व. हरिभाऊ कलोती स्मारक मंदिर, बुधवारा, अमरावती येथे आयोजित करण्यात आला आहे. या कार्यक्रमास नागरिक, मंडळाचे कार्यकर्ते, विद्यार्थी, खेळाडू तसेच गुरुजनांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून कार्यक्रमाची शोभा वाढवावी, असे आवाहन संयोजक तथा माजी महापौर तथा विरोधी पक्षनेता विलास इंगोले यांनी केले आहे.

# टिटंबा आश्रमशाळा विषबाधा प्रकरणात मंत्री डॉ. अशोक उईके यांचा मोठा निर्णय

### कंपनीविरुद्ध गुन्हा दाखल करण्याचे निर्देश, काही दिवस सेंट्रल किचन बंद ठेवणार

प्रतिनिधी २८ जुलै

**अमरावती:** टिटंबा, ता. धारणी येथील शासकीय आदिवासी आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांना झालेल्या संशयित विषबाधेच्या गंभीर घटनेची आदिवासी विकास मंत्री डॉ. अशोक उईके यांनी दखल घेततली. त्यांनी तातडीने धारणी आणि टिटंबा येथे भेट देऊन संपूर्ण प्रकरणाचा आढावा घेतला. विद्यार्थ्यांच्या आरोग्याशी कोणतीही तडजोड होऊ देणार नाही, असा ठाम निर्धार व्यक्त करत त्यांनी संबंधित कंपनीविरुद्ध गुन्हा दाखल करण्याचे निर्देश दिले. तसेच राज्यातील आदिवासी आश्रम शाळांमध्ये सुरू असलेली सेंट्रल किचन व्यवस्था पुढील काही दिवस बंद ठेवण्याची घोषणा केली.



शनिवारी टिटंबा आश्रम शाळेतील सुमारे ७० विद्यार्थ्यांना उलट्या, मळमळ व पोटदुखीचा त्रास झाल्यानंतर त्यांना धारणी उपजिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आले. या घटनेची माहिती मिळताच आदिवासी विकास मंत्री डॉ. अशोक उईके यांनी तातडीने धारणी येथे भेट देत उपचार घेत असलेल्या विद्यार्थ्यांची भेट घेतली. त्यांनी वैद्यकीय अधिकाऱ्यांकडून विद्यार्थ्यांच्या प्रकृतीची सविस्तर माहिती जाणून घेतली. तसेच पालकांशी संवाद साधून त्यांना धीर दिला. यानंतर मंत्री डॉ. उईके यांनी थेट टिटंबा आश्रमशाळेत जाऊन घटनास्थळाची पाहणी केली. विद्यार्थी, पालक, आदिवासी संघटनांचे प्रतिनिधी आणि प्रशासनातील वरिष्ठ अधिकाऱ्यांसोबत त्यांनी सविस्तर बैठक घेतली.

विद्यार्थ्यांच्या आरोग्याला सर्वोच्च प्राधान्य देत टिटंबा आश्रमशाळेसाठी सेंट्रल किचनमधून पुरविले जाणारे भोजन तात्काळ बंद करण्याचा निर्णयही मंत्री डॉ. उईके यांच्या उपस्थितीत घेण्यात आला. यापुढे अशा प्रकारच्या घटना घडू नयेत, यासाठी संपूर्ण व्यवस्थेचा पुनर्विचार करण्यात येईल, असे त्यांनी स्पष्ट केले.

यावेळी मंत्री डॉ. अशोक उईके यांनी दोषी अधिकारी, कर्मचारी अथवा संबंधित संस्थेला कोणीही पाठीशी घालणार नाही. चौकशी अहवालानुसार कठोर कायदेशीर कारवाई केली जाईल, असे सांगितले. बैठकीत विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेचा मुद्दा मांडण्यात आला. विद्यार्थ्यांच्या हितासाठी सेंट्रल किचन व्यवस्था बंद करणे, दोषींवर गुन्हे दाखल करणे आणि भविष्यात अशा घटना टाळण्यासाठी कायमस्वरूपी उपाययोजना करण्याची मागणी करण्यात आली. चर्चेनंतर मंत्री डॉ. उईके यांच्या हस्तक्षेपामुळे प्रशासनाने महत्त्वाचे निर्णय जाहीर केले आणि लेखी आश्वासन दिले. त्यानंतर विद्यार्थी, पालक व आदिवासी संघटनांनी सुरू असलेले आंदोलन मागे घेत मंत्री डॉ. उईके यांचे आभार मानले.

या संपूर्ण प्रकरणात मंत्री डॉ. उईके यांनी स्वतः घटनास्थळी जाऊन परिस्थिती हाताळत विद्यार्थ्यांच्या आरोग्याला सर्वोच्च प्राधान्य दिले. त्यांनी घेतलेल्या निर्णयांमुळे विद्यार्थ्यांच्या हितासाठी शासन कटिबद्ध असल्याचा स्पष्ट संदेश मिळाल्याची भावना उपस्थित नागरिकांनी व्यक्त केली.

## उद्या स्व.दादासाहेब काळमेघ स्मृती पुण्यस्मरण कार्यक्रम

प्रतिनिधी २८ जुलै

**अमरावती :** स्व.दादासाहेब काळमेघ स्मृती प्रतिष्ठान तर्फे स्व. दादासाहेबांच्या स्मृतींना विनम्र अभिवादन करण्याच्या निमित्ताने 29 वा पुण्यस्मरण कार्यक्रम उद्या बुधवार 29 जुलै रोजी सायंकाळी पाच वाजता छत्रपती श्री शिवाजी महाराज सभागृह डॉ.पंजाबराव उपाख्य भाऊसाहेब देशमुख स्मृती वैद्यकीय महाविद्यालय अमरावती येथे आयोजित करण्यात आला आहे.

या पुण्यस्मरण कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी श्री शिवाजी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष हर्षवर्धन देशमुख राहतील तर प्रमुख अतिथी म्हणून मराठी भाषा विद्यापीठ रिद्धपूरचे कुलगुरू डॉ.अविनाश आवलगावकर, सप्त खंजिरी वादक ह भ प श्री सत्यपाल महाराज, तरुण भारतचे मुख्य संपादक शैलेश पांडे, नागपूर विद्यापीठाचे माजी कुलसचिव सुभाष बेलसरे यांची प्रमुख उपस्थित राहणार आहे. यासोबतच दादासाहेब काळमेघ यांना मानणारा विविध क्षेत्रातील त्यांचा मोठा चाहता वर्ग उपस्थित राहील. या वैचारिक कार्यक्रमाचा आस्वाद सर्व विद्यार्थी, शिक्षक व नागरिकांनी घ्यावा अशी विनंती आयोजकाच्या वतीने करण्यात आली आहे.

# 5 ठिकाणी जुगारावर कारवाई 28 आरोपीकडून अडीच लाखाचा मुद्देमाल जप्त करण्यात पोलिसांना यश

प्रतिनिधी २८ जुलै

**वलगाव:** ग्राम साहूर येथे एकुण 22 आरोपीतावर एक्का बादशा नावाच्या पैशाचे हारजितीच्या जुगारावर रेड केली त्यांच्याकडून एकुण 2,33,200 /- रुपयाचा मुद्देमाल मिळुन आल्याने तो पंचासमक्ष जप्ती पंचांनाम्याप्रमाणे जप्त करण्यात आला असुन नमुद 22 आरोपी विरुद्ध पो.स्टे वलगाव येथे कलम 4,5 महाराष्ट्र जुगार कायदा अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.



पोलीस स्टेशन फ्रेझरपुरा आरोपी शेखर संजय गडलिंग वय 28 रा राहुल नगर, अमरावती, सागर गजानन पवार वय 31 रा.लोणी ता नांदगाव खडेश्वर जि अमरावती हे शुक्रवार बाजार येथील सार्वजनिक ठिकाणी वरली जुगारच्या चिट्ट्यासह हार जीत चा खेळ खेळताना मिळून आल्या वरून त्यांच्याकडून नगदी 2200 रु व पेन कि. अ.20 रु असा एकूण 2220 /- रु चा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

आरोपी र वींद्र भीमरावजी वाकोडे वय 50 वर्ष रा गोपालपूर ता जि अमरावती, सुरज सिंग कैलास सिंग चंदेल वय 37 रा.कमल कॉलनी अमरावती हे यशोदा नगर येथील सार्वजनिक ठिकाणी वरली जुगारच्या चिट्ट्यासह हार जीत चा खेळ खेळताना मिळून आल्या वरून त्यांच्याकडून नगदी 3000 रु व पेन कि. अ.20 रु असा एकूण 3020* /- रु चा मुद्देमाल जप्त करण्यात आला. त्याचा विरुद्ध पो.स्टे फ्रेजरपुरा येथे कलम 12(अ ) जुगार कायदा अंतर्गत गुन्हा दाखल केला.

पोस्टे गाडगे नगर आरोपी सिद्धार्थ सुरेश रोकडे राहणार सिद्धार्थ नगर येथील सार्वजनिक ठिकाणी वरली जुगारच्या चिट्ट्यासह खेळ खेळताना मिळून आल्या वरून त्यांच्याकडून नगदी 1480 रु व पेन कि. अ.20 रु असा एकूण 1500* /- रु चा मुद्देमाल जप्त करण्यात आला. त्याचा विरुद्ध पो.स्टे गाडगे नगर येथे कलम 12(अ ) जुगार कायदा अंतर्गत गुन्हा दाखल केला.

पोस्टे नागपुरीगेट

आरोपी नामे:- 1) सय्यद शकील सय्यद यासीन वय 42 वर्ष राहणार फातिमानगर हा अकबर नगर नाल्याजवळील सार्वजनिक ठिकाणी वरली जुगारच्या चिट्ट्यासह खेळ खेळताना मिळून आल्या वरून त्यांच्याकडून नगदी 1800 रु व जुगाराच्या साहित्यासह मिळून आल्याने मुद्देमाल जप्त करून त्याचा विरुद्ध पो.स्टे नागपुरी गेट येथे कलम 12(अ ) जुगार कायदा अंतर्गत गुन्हा दाखल केला.

# ग्राम टिटंबा येथील आश्रम शाळेतील विद्यार्थ्यांना झालेल्या अन्न विषबाधा संदर्भात धारणी पोलिस स्टेशनची कारवाई

प्रतिनिधी २८ जुलै

**अमरावती:** ग्राम टिटंबा येथे विद्यर्थीनी झालेल्या अन्न विषबाधे येथील शासकिय निवासी आश्रम शाळेतील विद्यार्थी व संबंधाने पोलीस स्टेशन धारणी मार्फत कार्यवाही करण्यात आली आहे.

दिनांक 25/07/2026 रोजी रात्री 7. 30 वा दरम्यान पोलीस स्टेशनला माहीती मिळाली की, ग्राम टिटंबा ता. धारणी जि. अमरावती येथील शासकिय निवासी आश्रम शाळेतील विद्यार्थी व विद्यर्थीनी यांना अन्नातुन विषबाधा होवुन त्यांना उलट्या व पोट दुखत असल्या बाबत माहीती मिळाली वरुन पो.स्टे ला उपलब्ध असलेल्या संपुर्ण अधिकारी व अंमलदार यांना तात्काळ सुचना निर्गमीत करुन एक चमु ग्राम टिटंबा येथील आश्रम शाळेवर रवाना करुन एक चमु उप जिल्हा रुग्णालय धारणी तसेच एक चमु ग्राम टेंम्बली येथील सेंट्रल किचन या ठिकाणी रवाना करण्यात आले. उर्वरीत पोलीस स्टफ हे अन्न विष बाधीत विद्यार्थ्यांना पो.स्टे ला उपलब्ध सर्व शासकिय वाहनसह ने आण करणेकामी रवाना करण्यात आले. त्याच प्रमाणे इतर विभागातील अधिकारी यांना सदर घटने बाबत माहीती देण्यात आली. ग्राम टिटंबा येथे पोहचुन अन्न विषबाधेने प्रकृती खराब झालेल्या मुला मुलींना मिळेल त्या वाहनाने व पोलीस स्टेशन धारणी येथील उपलब्ध वाहनाने विद्यार्थ्यांना उप जिल्हा रुग्णालय धारणी येथे आणण्यात आले. उप जिल्हा रुग्णालय धारणी येथे दिनांक 25/07/2026 रोजी 50 मुली व 19 मुले असे एकुण 69 विद्यार्थी उपचाराकरीता दाखल करण्यात आले होते.

उपचार घेत असलेल्या विर्धार्थ्यांकरीता रुग्णालययात पिण्याचे पाणी, फळ फुट व अल्पोउपहार याची व्यवस्था पोलीस विभागामार्फत करण्यात आली होती. उप जिल्हा रुग्णालय धारणी येथील वैद्यकिय स्टॉफ कमी पडतील करीता धारणी शहरातील व लगतच्या गावातील खाजगी वैद्यकिय स्टॉफ यांना उप जिल्हा रुग्णालय येथे बोलावुन भरती असलेल्या अन्न विषबाधीत मुला मुलींचा तात्काळ उपचार करण्यात आला उपलब्ध असलेल्या वैद्यकिय स्टॉफ ने केलेल्या उपचारामुळे इलाज करीता भरती असलेल्या संपुर्ण मुला-मुली ची प्रकृती ही चांगली व सुस्थित तथा धोक्याबाहेर असल्याची खात्री वैद्यकिय अधिकारऱ्या मार्फत करण्यात आली. रात्री दरम्यान इलाजा करीता अलेल्या एकुण 69 मुला मुलींपैकी 66 मुला मुलींची प्रकृती स्थीर असल्यामुळे त्यांना त्याच दिवशी रुग्णालयातुन आश्रम शाळेत परत करण्यात आले. आता केवळ 01 मुली यांना रुग्णालयात वैद्यकिय अधिकारी यांच्या देखरेख खाली ठेवण्यात आली ती देखील सुरक्षित आहे. तत्पूर्वी पोलीस स्टेशन धारणी येथुन नेमण्यात आलेल्या पोलीस पथका पैकी एका पथकाने ग्राम टिटंबा येथील आश्रम शाळेवर जावुन तेथे पुरवीण्यात आलेल्या अन्नाचे नमुणे फारेंन्सीक विभाग मार्फत जप्त करण्यात करण्यात येवुन घटनास्थळ पंचानामा करण्यात आला होता.

# महिलेची हरविलेली बॅग पोलिसांनी केली परत

### वाहतूक पोलिसांचे माणुसकीचे दर्शन, पंचवटी चौकातील घटना



**अमरावती:** मूल्यवान वस्तू असलेले व पैसे असलेली महिलेची हरवलेली बॅग वाहतूक पोलिसांनी त्या महिलेला परत करून माणुसकीचे दर्शन घडवले आहे. ही घटना काल पंचवटी चौकात घडली.

तबसूम बानो राहणार यास्मिन नगर यांची बॅग रोडवर पडलेली होती. ती त्यांना सुरक्षित परत करण्यात आली. त्यांनी पोलीस खात्याचे आभार व्यक्त केले आहे.

पोलीस निरीक्षक पानसरे यांच्या मार्गदर्शनात पंचवटी चौक येथे कर्तव्यावर असलेले पोलीस उपनिरीक्षक विनोद धोटे सोबत पोलीस हवालदार अनंत लोखंडे नाईक पोलीस शिपाई प्रदीप लोणारे व पोलीस शिपाई प्रशांत वाघ पैंजण यांनी सुश्री तबसून बानो यांची हरवलेली बॅग त्यांना मिळवून दिली. करिता त्यांनी पोलिसांचे आभार व्यक्त केले.

# प्रा. राम मेघे कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग अँड मॅनेजमेंट, बडनेरा यांना यूजीसीकडून सत्र 2026-27 पासून स्वायत्त दर्जा प्राप्त

प्रतिनिधी २८ जुलै




**अमरावती :** विदर्भ यूथ वेल्फेअर सोसायटी संचलित प्रा. राम मेघे कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग अँड मॅनेजमेंट, बडनेरा या महाविद्यालयाला विद्यापीठ अनुदान आयोग (UGC) तर्फे सत्र २०२६-२७ पासून स्वायत्त (Autonomous) महाविद्यालयाचा दर्जा प्राप्त झाला आहे. ही महाविद्यालयासाठी अत्यंत अभिमानाची आणि ऐतिहासिक उपलब्धी आहे.

याबाबत आयोजित पत्रकार परिषदेत संस्थेचे अध्यक्ष डॉ. नितीन धांडे यांनी ही माहिती दिली. यावेळी उपाध्यक्ष अॅड. उदय देशमुख, सचिव युवराजसिंग चौधरी, कोषाध्यक्ष प्रा. डॉ. हेमंत देशमुख, कार्यकारी सदस्य नितीन हिवसे, डॉ. पूनम चौधरी, श्री. पंकज देशमुख, प्रा. विनय गोहाड आणि प्रा. गजानन काळे, तसेच महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अजय ठाकरे उपस्थित होते. यावेळी उपस्थित व्यवस्थापनाने प्राचार्य डॉ. अजय ठाकरे यांच्या नेतृत्वाखाली सर्व विभागप्रमुख, डीन,प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थ्यांनी केलेल्या अथक परिश्रमांचे कौतुक करून त्यांचे अभिनंदन केले. संस्थेचे अध्यक्ष डॉ. नितीन धांडे यांनी सांगितले की, "स्वायत्त दर्जा हा महाविद्यालयाच्या शैक्षणिक गुणवत्ता, संशोधन, नवोपक्रम आणि उत्कृष्टतेच्या सातत्यपूर्ण प्रवासाला मिळालेली मोठी दाद आहे. हा दर्जा विद्यार्थ्यांना अधिक गुणवत्तापूर्ण, उद्योगाभिमुख आणि जागतिक दर्जाचे शिक्षण देण्याच्या दिशेने महत्त्वपूर्ण टप्पा ठरेल."

प्राचार्य डॉ. अजय ठाकरे यांनी सांगितले की, "स्वायत्त दर्जामुळे महाविद्यालयाला उद्योगाच्या गरजांनुसार अभ्यासक्रम विकसित करण्याचे, आधुनिक मूल्यमापन पद्धती राबविण्याचे, कौशल्याधारित शिक्षणाला प्रोत्साहन देण्याचे तसेच विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी अधिक प्रभावी शैक्षणिक उपक्रम राबविण्याचे स्वातंत्र्य प्राप्त होणार आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांना राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावरील स्पर्धात्मक संधी अधिक प्रभावीपणे उपलब्ध होतील." पत्रकार परिषदेत उपस्थित पत्रकारांनी स्वायत्त दर्जामुळे महाविद्यालयात होणारे शैक्षणिक बदल, नवीन अभ्यासक्रम, उद्योग-संलग्न उपक्रम आणि विद्यार्थ्यांसाठी उपलब्ध होणाऱ्या नव्या संधींबाबत विचारलेल्या प्रश्नांना व्यवस्थापन व प्राचार्यांनी सविस्तर उत्तरे दिली.

## नशामुक्त युवा फॉर विकसित भारत' जिल्हास्तरीय स्पर्धेत सहभागाचे आवाहन

**अमरावती:** युवा कार्यक्रम व क्रीडा मंत्रालयाच्या 'माय भारत' उपक्रमांतर्गत 'नशामुक्त युवा फॉर विकसित भारत' अभियानांतर्गत विविध जिल्हास्तरीय स्पर्धांचे आयोजन करण्यात आले आहे. या स्पर्धा गुरुवार, दि. 30 जुलै 2026 रोजी सकाळी 10 वाजता विद्याभारती महाविद्यालयात होणार आहे.

या अभियानाचा उद्देश युवकांमध्ये व्यसनमुक्तीबाबत जनजागृती निर्माण करणे, निरोगी जीवनशैलीला प्रोत्साहन देणे आणि 'विकसित भारत' उभारणीत युवाशक्तीचा सक्रिय सहभाग वाढविणे आहे.

स्पर्धांमध्ये सामूहिक लोकगीत, सामूहिक नृत्य, पथनाट्य, चित्रकला, लघुपट, रील निर्मिती, घोषवाक्य लेखन, मौखिक काव्य सादरीकरण आणि वक्तृत्व स्पर्धांचा समावेश आहे. सर्व स्पर्धांचे विषय व्यसनमुक्ती, निरोगी जीवनशैली आणि विकसित भारताशी संबंधित असतील. जिल्हास्तरीय स्पर्धांतील प्रथम क्रमांकाच्या विजेत्यांना राज्यस्तरीय स्पर्धेत जिल्ह्याचे प्रतिनिधित्व करण्याची संधी मिळणार आहे. स्पर्धांमध्ये सहभागी होऊ इच्छिणाऱ्या युवक-युवतींनी mybharat.gov.in या संकेतस्थळावर नोंदणी करून अधिक माहितीसाठी माय भारत, अमरावती जिल्हा कार्यालयाशी संपर्क साधावा, तसेच 15 ते 29 वर्षे वयोगटातील युवक-युवतींनी सहभागी व्हावे, असे आवाहन 'माय भारत'चे जिल्हा युवा अधिकारी अक्षय निपाणे यांनी केले आहे.

# 'पीएम यशस्वी' शिष्यवृत्ती योजनेसाठी 31 ऑगस्टपर्यंत अर्ज करण्याचे आवाहन

प्रतिनिधी २८ जुलै

**अमरावती :** ओबीसी, ईबीसी आणि डीएनटी प्रवर्गातील गुणवंत विद्यार्थ्यांना अकरावीपर्यंत उच्च दर्जाचे शिक्षण मिळावे, यासाठी केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार 'टॉप क्लास एज्युकेशन इन स्कूल फॉर ओबीसी, ईबीसी अँड डीएनटी स्टुडंट्स अंडर पीएम यशस्वी ही योजना राबविण्यात येत आहे. यासाठी विद्यार्थ्यांनी 31 ऑगस्टपर्यंत अर्ज करावेत, असे आवाहन करण्यात आले आहे.

या योजनेचा लाभ घेण्यासाठी पात्र विद्यार्थ्यांनी राष्ट्रीय शिष्यवृत्ती पोर्टलच्या scholarships.gov.in या अधिकृत वेबसाईटवर ऑनलाईन अर्ज करणे आवश्यक आहे. ज्या विद्यार्थ्यांच्या पालकांचे एकूण वार्षिक उत्पन्न 2.5 लक्ष रुपयांपेक्षा कमी आहे, असेच विद्यार्थी या योजनेसाठी पात्र ठरतील. अर्ज करण्यासाठी विद्यार्थ्यांनी सर्वप्रथम पोर्टलवर 'New Registration' करावे. मिळालेला Application ID व पासवर्ड वापरून 'Fresh Login (AY २०२६-27)' अंतर्गत अर्ज भरावा. अर्जात वैयक्तिक, शैक्षणिक आणि बँक खात्याचा तपशील भरून जात प्रमाणपत्र, उत्पन्न प्रमाणपत्र, गुणपत्रक, प्रवेश प्रमाणपत्र, आधार कार्ड आणि बँक पासबुकची प्रत ही कागदपत्रे पीडीएफ, जेपीजीई स्वरूपात अपलोड करावीत. अंतिम सबमिशन करण्यापूर्वी सर्व माहिती नीट तपासून घ्यावी. एकदा 'Final Submit' केल्यावर अर्जात बदल करता येत नाही.

अर्ज सादर केल्यानंतर विद्यार्थ्यांनी त्याची प्रिंट काढून शाळेत संपर्क साधावा, जेणेकरून शाळेचे 'Institute Nodal Officer' तो अर्ज ऑनलाईन पडताळू शकतील. वेळापत्रकानुसार विद्यार्थी अर्ज प्रक्रिया 31 ऑगस्ट पर्यंत खुली असली, तरी शाळास्तरावरील पडताळणी 15 सप्टेंबर 2026 पर्यंत आणि जिल्हा, राज्यस्तरावरील पडताळणी 30 नोव्हेंबर 2026 पर्यंत पूर्ण केली जाईल. अर्ज करताना मोबाईल व ईमेल सक्रिय असणे आवश्यक आहे, अन्यथा अर्ज रद्द होऊ शकतो.

# NIMA अमरावतीच्या CME मध्ये डॉ. आशिष डगवार यांचे मार्गदर्शन

प्रतिनिधी २८ जुलै

**अमरावती :** नॅशनल इंटिग्रेटेड मेडिकल असोसिएशन (NIMA) अमरावतीच्या वतीने रविवार, दि. 26 जुलै 2026 रोजी हॉटेल ग्रेस इन, राजापेठ येथे वैद्यकीय क्षेत्रातील अत्यंत महत्त्वाच्या विषयावर सतत वैद्यकीय शिक्षण (CME) कार्यक्रम उत्साहात पार पडला. या कार्यक्रमात सुप्रसिद्ध लॅप्रोस्कोपिक सर्जन डॉ. आशिष डगवार यांनी "सामान्य व्यवहारात तीव्र पोटात दुखण्याचा दृष्टीकोन – लवकर निदान आणि वेळेवर रेफरल" या विषयावर सखोल व मार्गदर्शक व्याख्यान दिले.

आपल्या व्याख्यानात डॉ. डगवार यांनी सामान्य वैद्यकीय व्यवहारात येणाऱ्या तीव्र पोटदुखीच्या रुग्णांचे मूल्यमापन करताना घ्यावयाची काळजी, धोक्याची लक्षणे ओळखणे, योग्य वेळी आवश्यक तपासण्या करणे आणि रुग्णाला तज्ज्ञांकडे वेळेवर रेफर करण्याचे महत्त्व याविषयी सविस्तर माहिती दिली. त्यांनी अनेक प्रत्यक्ष अनुभवांवर आधारित उदाहरणांद्वारे लवकर निदानामुळे रुग्णांचे प्राण वाचू शकतात तसेच गुंतागुंत टाळता येऊ शकते, हे अधोरेखित केले. उपस्थित डॉक्टरांनी या व्याख्यानाला उत्स्फूर्त प्रतिसाद देत विविध शंकांचे निरसन करून चर्चेत सहभाग घेतला.




या कार्यक्रमाला अनेक मान्यवरांची उपस्थिती लाभली.

यावेळी मंचावर निमा अध्यक्ष डॉ प्रवीण औगड (अध्यक्ष निमा अमरावती ) डॉ. विजय अजमिरे (सहसचिव, निमा सेंट्रल कौन्सिल , नवी दिल्ली), डॉ. अनिल बाजारे (माजी सरचिटणीस, निमा महाराष्ट्र तथा सह-अध्यक्ष, कुटुंब कल्याण समिती, निमा सेंट्रल कौन्सिल, नवी दिल्ली ), डॉ. कमल राऊत (समन्वयक, निमा सेंट्रल कौन्सिल ), डॉ. आशिष येवतीकर (समन्वयक, निमा महाराष्ट्र), आणि डॉ. उन्मेष डालके (अध्यक्ष, आयुर्वेद फोरम, अमरावती) यांची प्रमुख उपस्थिती होती. मान्यवरांनी वैद्यकीय क्षेत्रात अद्ययावत ज्ञान आत्मसात करण्यासाठी अशा CME कार्यक्रमांचे महत्त्व अधोरेखित केले.

कार्यक्रमाचे प्रकल्प संचालक डॉ. राजेंद्र भामकर यांनी उत्कृष्ट नियोजन करून कार्यक्रम यशस्वीरीत्या पार पाडला. कार्यक्रमास अमरावती व परिसरातील अनेक वैद्यकीय व्यावसायिकांची मोठ्या संख्येने उपस्थिती लाभली. कार्यक्रमाचे संचालन डॉक्टर वैष्णवी झोड यांनी केले. तर स्पीकरचा परिचय डॉ. सुषमा मेश्राम यांनी वाचून दाखविला.

उपस्थित डॉक्टरांनी या शैक्षणिक सत्राचा लाभ घेतल्याबद्दल डॉक्टर नितीन नांदरधने आयोजकांचे आभार मानले. शेवटी NIMA अमरावतीच्या वतीने सर्व मान्यवर, वक्ते, प्रायोजक तसेच उपस्थित सदस्यांचे आभार मानण्यात आले. वैद्यकीय ज्ञान अद्ययावत ठेवण्यासाठी आणि रुग्णसेवा अधिक सक्षम करण्यासाठी भविष्यातही अशाच दर्जेदार शैक्षणिक उपक्रमांचे आयोजन करण्यात येणार असल्याचे यावेळी सांगण्यात आले.

सिटी न्यूज सुपरफास्ट वाशीम

मंगळवार, दि. २८ जुलै २०२६ http://epaper.citynewssuperfast.com



# शासनाचा निधी हडपण्यावर जोर, संस्था चालक चोरावर मोर !

## * सखोल चौकशी करा, जागा ताब्यात घ्या, संबंधितांवर गुन्हे दाखल करा


● सिटी न्युज ब्युरो @ वाशीम ●

येथील राजस्थान शिक्षण संस्थेने शासकीय जागेवर अतिक्रमण करून अवैध रित्या वस्तीगृह बांधले. व शासनाचे कोट्यवधीचे अनुदान हडप केले. आता चोरावर मोर होत या संस्था अध्यक्षांनी शासनाचीच जागा शासनाला म्हणजे वैद्यकीय महाविद्यालयाच्या मुलींच्या वस्तीगृहाला भाड्याने देवून पैसे लुटण्याचा धंदा सुरू केला. मुलींच्या वसतीगृहाची ईमारत बेकायदेशीर बांधल्या प्रकरणी 'या' संस्थेतील गैरकारभार चव्हाट्यावर आला आहे. शासनाने त्या वादग्रस्त जागेचा नमूना 'ड' चार वर्षापुर्वीच रद्द केला आहे.

तरीपण राजस्थान शिक्षण संस्थेचे विद्यमान अध्यक्ष ठाकूरदास मालाणी व त्यांच्या कार्यकारिणीतील उच्चशिक्षीत आणि फक्त सह्याजीराव असलेल्या संचालक मंडळाने 'ती' वादग्रस्त मुलींच्या वसतीगृहाची जागा वाशीम येथील शासकीय



वैद्यकीय महाविद्यालयातील मुलींच्या वसतीगृहासाठी भाड्याने दिल्याचा पराक्रम केल्याची धक्कादायक बाब उघडकीस आली आहे. आधीच या संस्थेचे माजी सचिव, कार्याध्यक्ष आणि सह्याचे अधिकार असलेले राजेंद्र सोमाणी यांच्या कार्यकाळातील अनेक घोटाळे झाल्यामुळेच त्यांची विद्यमान संचालक मंडळातून हकालपट्टी करण्यात आली आहे. सोमाणींचा कित्ता मालाणींनी घडविल्यामुळे 'या' संस्थेच्या मागील २० वर्षातील आर्थिक व्यवहारासह संचालक मंडळाने घेतलेल्या सर्व ठरावाची शासनाने सखोल चौकशी करण्याची मागणी केल्या जात आहे.



हाच तो नमुना 'ड'

येथील राजस्थान शिक्षण मंडळाद्वारे संचालीत राजस्थान आर्य कला, मि.क. वाणिज्य आणि स.रा.राठी विज्ञान महाविद्यालय, वाशीम तसेच रामकृष्णजी राठी विधी महाविद्यालयातील मुलींच्या वसतीगृहासाठी जवाहर नवोदय विद्यालयाजवळ असलेल्या शासकीय जागेवर अतिक्रमण करून त्या जागेवर विद्यापीठ अनुदान आयोगाकडून मिळालेल्या कोट्यवधीच्या निधीतून मुलींच्या वसतीगृहाची टोलेजंग ईमारत बांधली. हे बांधकाम तत्कालीन कर्तेधर्ते आणि कमिशन खाण्यात पटाईत असलेल्या कारभारी राजेंद्र सोमाणी यांच्या अधिपत्याखाली झाल्याचे सर्वश्रुत आहे. उल्लेखनिय म्हणजे या वसतीगृहाचे बांधकाम झाले तेव्हापासून या वसतीगृहात राजस्थान महाविद्यालयातील एकही मुलगी त्या वसतीगृहात राहिली नसल्याची बाबही जगजाहिर आहे. पैशासाठी काहीही करणाऱ्या लालची सोमाणींनी या मुलींच्या वसतीगृहात शासकीय, खासगी सेवेत असलेल्या अधिकारी, कर्मचाऱ्यांना भाडेतत्वावर खोल्या दिल्याचीही बाब यापुर्वीच सामाजिक कार्यकर्ते सुभाष देवढे पाटील यांनी उघडकीस आणली होती. देवढे यांनी शासनासह वाशीमच्या जिल्हाधिकाऱ्यांकडे 'या' वादग्रस्त अतिक्रमीत जागेसंदर्भात पुराव्यासह तक्रारी देवून सर्व दोषींवर फौजदारी कारवाई करून ती वादग्रस्त जागा शासनाने ताब्यात घेण्यासाठी पाठपुरावा केला आहे. अद्यापही देवढे यांचा पाठपुरावा सुरूच असून जिल्हाप्रशासनाने मौनव्रत धारण करून राजस्थान शिक्षण मंडळातील आजी-माजी संचालकांना 'आश्रय' दिल्याची चर्चा आहे. म्हणूनच या संस्थेचे विद्यमान अध्यक्ष ठाकूरदास मालाणी यांनी व त्यांच्या सहकारी संचालकांनी शासकीय जागेवर अतिक्रमण करुन संस्थेने बेकायदेशीर बांधकाम केलेल्या मुलींच्या वसतीगृहाची ईमारत वाशीमच्या शासकीय वैद्यकीय महाविद्यालयातील मुलींच्या वसतीगृहासाठी भाड्याने दिल्याची धक्कादायक बाब उघडकीस आली आहे. शासनाने राजस्थान शिक्षण मंडळ, वाशीम च्या मागील २० वर्षातील सर्व आर्थिक व्यवहाराची आणि आजी-माजी संचालक मंडळाने घेतलेल्या सर्व ठरावाची वरिष्ठ सनदी अधिकाऱ्या मार्फत चौकशी करून या घोटाळ्यात व भ्रष्टाचारात सहभागी असलेल्या सर्व दोषींविरूद्ध फौजदारी कारवाई करण्याची मागणी सामाजिक कार्यकर्ते सुभाष देवढे यांनी केली आहे.




## थोडक्यात

### मंगरूळपीर येथे छत्रपती शिवाजी महाराज समाधान शिबिर

● सिटी न्युज ब्युरो @ वाशीम ●

वाशिम-मंगरूळपीर विधानसभा मतदारसंघासाठी छत्रपती शिवाजी महाराज समाधान अभियानांतर्गत समाधान शिबिराचे आयोजन ३१ जुलै २०२६ रोजी सकाळी १० वाजता सांस्कृतिक सभागृह, मानोली रोड, मंगरूळपीर येथे करण्यात आले आहे. या शिबिराचे आयोजन उपविभागीय अधिकारी, मंगरूळपीर, तहसीलदार, मंगरूळपीर तसेच तहसीलदार, वाशिम यांच्या संयुक्त विद्यमाने करण्यात आले आहे.

या शिबिरात महसूल विभागाच्या विविध सेवांसह आरोग्य विभाग, भूमी अभिलेख विभाग, नगर परिषद यांच्यामार्फत विविध सनदांचे वितरण, कृषी विभागामार्फत विविध लाभांचे वितरण, महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळामार्फत महिलांना प्रवास पासचे वितरण, कामगार कल्याण विभागामार्फत साहित्य (किट) वाटप, आदिवासी विकास विभागाच्या विविध योजनांतील लाभांचे वितरण तसेच सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था यांच्यामार्फत पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना-२०२६ अंतर्गत पात्र लाभार्थ्यांना लाभ वितरण करण्यात येणार आहे. या शिबिराचे अध्यक्षस्थान वाशिम-मंगरूळपीर विधानसभा मतदारसंघाचे आमदार श्यामभाऊ खोडे भूषविणार आहेत. 'छत्रपती शिवाजी महाराज समाधान अभियानाच्या माध्यमातून विविध शासकीय सेवा व योजनांचा लाभ नागरिकांना एकाच ठिकाणी उपलब्ध करून देण्यात येणार आहे. नागरिकांनी आवश्यक कागदपत्रांसह मोठ्या संख्येने उपस्थित राहून या शिबिराचा लाभ घ्यावा, असे आवाहन उपविभागीय अधिकारी रवी काळे यांनी केले आहे.

### सरदार पटेल राष्ट्रीय एकता पुरस्कार-२०२६ साठी नामांकनांना प्रारंभ

● सिटी न्युज ब्युरो @ वाशीम ●

**राष्ट्रीय एकता व अखंडतेसाठी उल्लेखनीय कार्य करणाऱ्या व्यक्ती व संस्थांनी अर्ज करण्याचे आवाहन**

भारत सरकारतर्फे प्रदान करण्यात येणाऱ्या सरदार पटेल राष्ट्रीय एकता पुरस्कार-२०२६ साठी नामांकने/शिफारसी मागविण्यात आल्या आहेत. भारताच्या राष्ट्रीय एकता, अखंडता व ऐक्य दृढ करण्यासाठी उल्लेखनीय, प्रेरणादायी आणि अपवादात्मक योगदान देणाऱ्या व्यक्ती, संस्था किंवा संघटनांचा या प्रतिष्ठेच्या पुरस्काराद्वारे गौरव करण्यात येतो.

हा पुरस्कार दरवर्षी राष्ट्रीय एकता दिन (३१ ऑक्टोबर) निमित्त जाहीर केला जातो. धर्म, जात, पंथ, लिंग, जन्मस्थान, वय अथवा व्यवसाय यांचा कोणताही भेदभाव न करता भारतातील सर्व नागरिक तसेच संस्था व संघटना या पुरस्कारासाठी पात्र आहेत. सरदार पटेल राष्ट्रीय एकता पुरस्कार-२०२६ साठीची नामांकने अथवा शिफारसी राष्ट्रीय पुरस्कार पोर्टलवरूनच स्वीकारण्यात येणार आहेत. इच्छुकांनी www.awards.gov.in या संकेतस्थळावर जाऊन ऑनलाईन अर्ज सादर करावा. नामांकन करताना पोर्टलवर नमूद केलेल्या नमुन्यानुसार सर्व आवश्यक माहिती भरून संबंधित व्यक्ती किंवा संस्थेने राष्ट्रीय एकता व अखंडतेसाठी केलेल्या उल्लेखनीय कार्याचे सविस्तर विवरण जोडणे आवश्यक आहे. नामांकन सादर करण्याची संपूर्ण ऑनलाईन प्रक्रिया देखील राष्ट्रीय पुरस्कार पोर्टलवर उपलब्ध आहे. पात्र व्यक्ती, संस्था व संघटनांनी या संधीचा लाभ घेऊन वेळेत नामांकन सादर करावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

## नाही उत्पादन तिथी, मग एक्सपायरी कधी...

# घातक लेमन सोडा, कारवाईतून शिकवा धडा !

● सिटी न्युज ब्युरो @ वाशीम ●

जिल्ह्यातील शेलुबाजार येथील कोल्ड्रिंक्स सेंटर, पानठेले आणि किराणा दुकानांमधून सर्रास विक्री होणारे थंड पेय 'लेमन सोडा' या पेयाच्या बाटलीवर उत्पादन तारखेची कोणतीही नोंद नसल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. सदर लेमन सोड्याची मुदत उत्पादनानंतर तीन महिने असल्याचा बाटलीवर उल्लेख आहे. मात्र बाटलीवर उत्पादन तारीखच नसेल तर अंतिम मुदतीचे तीन महिने कसे कळणार ? उत्पादक कंपनीची ही अक्षम्य चूक असून यामुळे नागरिकांच्या आरोग्यास धोका निर्माण होण्याची शक्यता आहे. या गंभीर प्रकरणात अन्न व औषध प्रशासन काय कारवाई करणार ? असा प्रश्न स्थानिक नागरिक उपस्थित करत आहेत.








पुरव्यासहित हाती आलेल्या माहितीनुसार मंगरूळपीर तालुक्यात येत असलेल्या शेलुबाजार येथील एका सॉफ्ट ड्रिंक्स अँड मिनरल वॉटर कंपनीच्या २०० मी.ली. लेमन सोडा बाटलीवर इएऐंघलायसन्स क्रमांक असूनही उत्पादन तारीख, बॅच नंबर आणि किरकोळ विक्री किंमतची जागा पूर्णपणे रिकामी ठेवण्यात आली आहे. सदर लेमन सोड्याच्या बाटलीवर चिटकवण्यात आलेल्या लेबलवर फक्त 'SEE BOTTLER NECK/CAP असे स्पष्ट लिहिले आहे, मात्र बाटलीच्या झाकणावर कोणतीही नोंद नाही. अन्न सुरक्षा आणि मानके कायदा २००६ नुसार प्रत्येक खाद्यपदार्थांवर उत्पादन तारीख, अंतिम तारीख आणि बॅच नंबर लिहिणे बंधनकारक आहे. असे असतांनाही लेमन सोडा उत्पादक कंपनीने कायदा धाब्यावर बसवून नियमांचे उल्लंघन करून नागरिकांच्या आरोग्याशी खेळ सुरू केला आहे. तर उन्हाळ्याच्या दिवसात लहान मुलांपासून ते वृद्धांपर्यंत सर्रास अशी थंड पेय पिली जातात. त्यामुळे अशा खाद्यपदार्थांचे उत्पादन करणारे उत्पादक कायदा व नियम पाळतात की नाही हे पाहणे खुप गरजेचे झाले आहे. या गंभीर प्रकाराबाबत अधिक शहानिशा केली असता, 'बाटलीवर तारीखच नसेल तर सदर लेमन सोडा जुना आहे की ताजा हे कसे कळणार ? त्यामुळे लहान मुलांना देताना भीती वाटते,' अशा प्रतिक्रिया स्थानिक नागरिकांनी व्यक्त केल्या आहेत.

या अक्षम्य प्रकरणाची अन्न व औषध प्रशासन विभाग सखोल चौकशी करुन सबंधित कंपनी आणि विक्रेत्यांवर कठोर कारवाई करणार का, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.




## भिंतीवरील वृक्ष वाढलेल्यामुळे धरण धोक्यात !



● सिटी न्युज ब्युरो @ वाशीम ●

तालुक्याती पाचंबा - शेलूखडसे लघु पाटबंधारे प्रकल्पच्या भिंतीवर अवैध वाढलेले अमाप झाडेझूडपे धरणासाठी धोकादायक ठरत आहेत. मात्र, या गंभीर बाबीकडे लघु पाटबंधारे विभागाचे अक्षम्य दुर्लक्ष होत आहे. परिणामी वाढलेल्या झाडांच्या मुळामुळे भिंत कमकुवत होऊन धरण धोकादायक ठरत आहे. याकडे संबंधित विभागाने तातडीने लक्ष घालून योग्य ती उपाययोजना करावी अशी मागणी नागरिकांकडून करण्यात येत आहे. शेलू खडसे पाचंबा धरणाच्या भिंतीवर वाढलेल्या झाडेझुडपांमुळे धरणाच्या अस्तित्वालाच धोका निर्माण झाला आहे. या वाढलेल्या वनस्पतींच्या मुळांमुळे धरणाची भिंत कमकुवत होऊन तिला तडे जाण्याची भीती व्यक्त होत आहे.

## समान काम, समान वेतन'च्या मागणीसाठी... वाशिम येथे न्यायालयीन कर्मचाऱ्यांची बैठक !

● सिटी न्युज ब्युरो @ वाशीम ●

अधीनस्थ न्यायालयांतील गट 'क' व गट 'ड' कर्मचाऱ्यांना मा. उच्च न्यायालयातील कर्मचाऱ्यांप्रमाणे 'समान काम, समान वेतन' या तत्त्वावर वेतनवाढ लागू करण्यात यावी, या प्रलंबित मागणीच्या समर्थनार्थ वाशिम येथे सेवानिवृत्त व कार्यरत न्यायालयीन कर्मचाऱ्यांची बैठक उत्साहात पार पडली.

बैठकीत मुंबई उच्च न्यायालय तसेच नागपूर व औरंगाबाद खंडपीठातील कर्मचाऱ्यांना मिळालेल्या वेतनवाढीच्या धर्तीवर अधीनस्थ न्यायालयांतील कर्मचाऱ्यांनाही समान लाभ देण्यासाठी शासनाकडे प्रलंबित असलेल्या प्रस्तावावर सविस्तर चर्चा करण्यात आली. तसेच या



मागणीसंदर्भातील पुढील आंदोलनाची दिशा आणि संघटनात्मक भूमिका यावर उपस्थितांनी विचारमंथन केले. बैठकीस महाराष्ट्र राज्य न्यायालयीन कर्मचारी गट 'क' महासंघाचे अध्यक्ष मा. दिगंबर निकम हे प्रमुख मार्गदर्शक म्हणून उपस्थित होते. यावेळी यवतमाळ न्यायालयीन कर्मचारी गट 'क' संघटनेचे माजी अध्यक्ष तसेच महाराष्ट्र वेल्फेअर महासंघाचे माजी पदाधिकारी श्री. गुलाब राठोड यांची प्रमुख उपस्थिती लाभली. वाशिम जिल्हा न्यायालयीन कर्मचारी संघटनेचे अध्यक्ष, पदाधिकारी, सेवानिवृत्त व कार्यरत कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. मार्गदर्शन करताना मा. दिगंबर निकम यांनी न्यायालयीन कर्मचाऱ्यांच्या वेतनवाढीच्या प्रस्तावाबाबत सुरू असलेल्या घडामोडींची माहिती दिली. शासनाने प्रस्तावास मंजुरी न दिल्यास १ नोव्हेंबर २०२६ पासून महाराष्ट्रातील

**वेतनवाढीचा प्रस्ताव मंजूर न झाल्यास १ नोव्हेंबरपासून आमरण उपोषणाचा इशारा**

सेवानिवृत्त न्यायालयीन कर्मचारी रीतसर आमरण उपोषणास सुरुवात करतील, असा इशारा त्यांनी दिला. तसेच वेतनवाढीचा प्रश्न निकाली न निघाल्यास यंदाची दिवाळी साजरी न करण्याचा निर्धारही त्यांनी व्यक्त केला. बैठकीत वाशिम जिल्ह्यातील सेवानिवृत्त न्यायालयीन कर्मचाऱ्यांनी प्रस्तावित आंदोलनास एकमुखी पाठिंबा जाहीर केला. न्यायालयीन कर्मचाऱ्यांच्या न्याय्य मागण्यांसाठी संघटितपणे लढा देण्याचा निर्धार यावेळी व्यक्त करण्यात आला. या बैठकीस वाशिम जिल्ह्यातील सेवानिवृत्त व कार्यरत न्यायालयीन कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. बैठकीमुळे 'समान काम, समान वेतन'च्या मागणीला जिल्ह्यातून नवसंजीवनी मिळाल्याचे मत उपस्थितांनी व्यक्त केले.

## प्रशासनाचे अभय, गुटखा माफियाचा 'विजय'

# बंदी असूनही बिनधास्त विक्री, मुजोर माफियांना वरदहस्त कोणाचा !



● सिटी न्युज ब्युरो @ रिसोड ●

राज्यात गुटख्यावर बंदी असताना गुटखा माफिया प्रशासनाच्या नाकावर टिच्चून राजरोस गुटखा विक्री करत असल्याचे पुरावे समोर आले आहेत. परिणामी अशा भामट्या माफियांना वरदहस्त कोणाचा ? असा प्रश्न उपस्थित होत असून प्रशासनाचे अभय असल्यानेच हे गुटखा माफिया 'मुजोर' झाले आहेत. त्यामुळेच बंदी असूनही हे गुटखाकिंग पोलिसांना आव्हान देत असल्याचे बोलले जात आहे.



वाशिम जिल्ह्यातील अवैद्य गुटखा विक्रीचे केंद्रबिंदू असलेले रिसोड शहरातील दोन भाऊ यांनी शहरासह तालुक्यात अवैध मटका विक्रीत चक्क विक्रम गाटला असल्याचे पुन्हा एकदा शहरासह तालुक्यात झाले असून शाळा कॉलेज समोर अल्पवयीन विद्यार्थी अवैध गुटख्याच्या मोठ्या प्रमाणात आलेली गेली असल्याचे नाकारता येत नाही परंतु वाशिम अन्न व औषध प्रशासन विभाग नुसतच

**नावालाच सख्खे भाऊ पक्के वैरी !**

प्रशासनाला आपल्या मुठीत ठेवत सख्खी भाऊ पक्के वैरी असलेले दोन भाऊ चढा वाढीने शहरासह तालुक्यात दर दिवसाला लाखो रुपयाचा अवैद्य गुटख्याचा दुचाकी वरून पुरवठा खुलेआम करीत असल्याचे पुन्हा एकदा शहरासह तालुक्यात दिसून येत आहे.

नावाला असल्याचे शहरासह संपूर्ण जिल्ह्यात चर्चा सुरू असल्याचे दिसून येत आहे. शहरातील अवैध गुटखा विक्री किंग सखे भाऊ पक्के वैरी अस म्हणत रिसोड शहरासह तालुक्याला कर्करोग सारख्या मोठ्या रोगाचा सामना जण सामान्य नागरिकांना करावा लागत आहे.

कर्करोग हा आजार भारतात महाराष्ट्र




अव्वल नंबर वन असून अन्न व औषध विभाग याकडे किती गांभीर्याने लक्ष देऊन कार्यवाही करणार की अर्थपूर्ण दुर्लक्ष करून सख्खे भाऊ पक्के वैरी यांना खुला आशीर्वाद देणार याकडे शहरासह तालुक्याचे लक्ष लागले आहे.

## वाशीम येथील फुले मार्केट नव्हे 'फेल मार्केट'!

● सिटी न्युज ब्युरो @ वाशीम ●

नगरपरिषदेच्या वतीने शहरातील मोक्याच्या जागी बीओटी तत्वावर बांधण्यात आलेल्या महात्मा फुले संकुलाची आजघडीला दुरावस्था झाली असून या संकुलाची स्वच्छता व देखरेखीसाठी नियुक्त करण्यात आलेल्या विकासकाचे याकडे दुर्लक्ष होत असल्यामुळे येथील दुकानदारांच्या व्यवसायावर वाईट परिणाम होत आहे.

येथील दुकानदारांकडून कर व भाडे न.प.ला भरणापोटी काही रक्कम या संकुलाच्या देखरेखीसाठी नियुक्त केलेल्या विकासकाला मिळत असते हे येथे उल्लेखनिय. माहितीच्या अधिकारान्वये या संकुलाबाबतच्या महत्वपुर्ण कागदपत्रांची मागणी केली असता ही कागदपत्रे अमरावती येथील विभागीय कार्यालयात जमा असल्याचे सांगण्यात आले. याबाबत अधिक वृत्त असे की, लघु व्यवसायीकांच्या



व्यवसायासाठी येथील रविवार बाजारात नगर परिषदेच्या वतीने महात्मा फुले संकुल उभारण्यात आले आहे. व्यापारीक दृष्टीकोनातून उभारण्यात आलेले हे संकुल न.प.पदाधिकारी व अधिकाऱ्यांच्या ठिसूळ नियोजनामुळे पुर्णत: 'फेल मार्केट' म्हणून कुप्रसिध्द झाले आहे. सगळीकडे घाण, दुर्गंधी, अस्वच्छता या चक्रात सापडलेल्या या संकुलाचा वापर आजघडीला गदुल्ले, नशेबाज, पत्तेबाज, अवैध दारुविक्री, अवैध वरली मटक्यासाठी उपयोगात येत आहे. त्यामुळे या डोकेदुखीला संकुलातील लघुव्यवसायीकांना सामोरे जावे लागत आहे.

# कृषी पायाभूत सुविधा निधी योजनेमुळे उद्योजकतेची नवी संधी!

## २ कोटींपर्यंत कर्ज, ३ टक्के व्याज सवलत !

प्रतिनिधी २८ जुलै

**खामगाव :** महाराष्ट्र शासनाच्या कृषी विभागामार्फत राबविण्यात येणारी कृषी पायाभूत सुविधा निधी योजना शेती आणि ग्रामीण विकासाला गती देणारी महत्त्वाची योजना ठरत आहे. या योजनेअंतर्गत शेतकरी, शेतकरी गट, कृषी उद्योजक तसेच शेतीमाल प्रक्रिया उद्योगांना आर्थिक साहाय्य उपलब्ध करून दिले जात आहे. योजनेअंतर्गत प्रकल्प उभारणीसाठी २ कोटी रुपयांपर्यंत कर्ज उपलब्ध होऊ शकते. या कर्जावर सरकारकडून ३ टक्के व्याज परतावा सात वर्षांपर्यंत दिला जातो. २ कोटी रुपयांपर्यंतच्या कर्जासाठी कोणतेही तारण आवश्यक नसल्याने ही योजना अधिक सुलभ व आकर्षक ठरते. योजनेच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी १९ जून ते २० जुलै या कालावधीत विशेष मोहीम राबविण्यात आली. प्रस्ताव स्वीकारणे अद्याप सुरू असुन, इच्छुकांनी आपले प्रस्ताव अधिकृत संकेतस्थळावर सादर करावेत, असे आवाहन कृषी विभागाने केले आहे. अधिक माहितीसाठी जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी किंवा तालुका कृषी अधिकारी कार्यालयाशी संपर्क साधावा. तसेच सर्व पात्र बँका व वित्तीय संस्थांमार्फत कर्ज सुविधा उपलब्ध आहे.

या योजनेचे लाभार्थी म्हणून कोणाला संधी ?

या योजनेचे लाभार्थी म्हणून वैयक्तिक शेतकरी, शेतकरी गट, शेतकरी उत्पादक कंपन्या, कृषी स्टार्टअप्स, महिला स्वयंसहायता गट तसेच प्रक्रिया उद्योग यांचा समावेश आहे.

विशेषतः शेतकऱ्यांनी एकत्र येऊन स्थापन केलेल्या उत्पादक कंपन्यांना प्राधान्य दिले जाते.

**कर्जासाठी कोणत्याही तारणाची आवश्यकता नाही!**

### अर्ज कसा करावा ?

या योजनेअंतर्गत लाभ घेण्यासाठी इच्छुक शेतकरी व उद्योजकांनी अधिकृत संकेतस्थळावर ऑनलाइन अर्ज सादर करावा. अर्ज करताना प्रकल्पाचा सविस्तर अहवाल, आवश्यक कागदपत्रे व आर्थिक तपशील सादर करणे गरजेचे आहे. अर्ज प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर संबंधित बँक किंवा वित्तीय संस्था कर्ज प्रस्तावाची छाननी करून मंजूरी देते.

या योजनेअंतर्गत लाभार्थ्यांना २ कोटी रुपयांपर्यंत कर्ज सुविधा उपलब्ध असून, त्या कर्जावर सात वर्षांपर्यंत ३ टक्के व्याज परतावा दिला जातो. २ कोटी रुपयांपर्यंतच्या कर्जासाठी कोणत्याही तारणाची आवश्यकता नसल्याने योजना अधिक सुलभ ठरते.

# गटविकास अधिकाऱ्यांसमोर विद्यार्थ्यांचे अभ्यास आंदोलन

## रोहणा येथे शिक्षकाची नियुक्ती करण्याची मागणी

प्रतिनिधी २८ जुलै



**खामगाव :** शिक्षणाचा मूलभूत हक्क मिळावा आणि शाळेत तातडीने शिक्षकाची नियुक्ती करावी, या मागणीसाठी तालुक्यातील रोहणा येथील केंद्रीय मराठी प्राथमिक शाळेतील विद्यार्थ्यांनी सोमवारी पंचायत समिती कार्यालयात अनोखे आंदोलन केले. विद्यार्थ्यांनी थेट संवर्ग गटविकास अधिकाऱ्यांच्या दालनात ठिय्या देत तेथेच अभ्यास सुरू केला आणि अक्षरशः 'शाळा' भरवून प्रशासनाचे लक्ष वेधले. या अनोख्या आंदोलनामुळे पंचायत समिती परिसरात काही काळ खळबळ उडाली. हातात दप्तर, पुस्तके आणि वह्या घेऊन आलेल्या विद्यार्थ्यांनी अधिकाऱ्यांसमोरच अभ्यास करत शिक्षकांच्या रिक्त पदाकडे प्रशासनाचे लक्ष वेधले. आम्हाला शिक्षक द्या, शिक्षण वाचवा, अशी मागणी विद्यार्थ्यांनी केली. विद्यार्थ्यांच्या या शांततापूर्ण आंदोलनाला पालक, ग्रामस्थ आणि शाळा व्यवस्थापन समितीनेही पाठिंबा दिला. यावेळी शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष बोचरे यांच्यासह सदस्य ज्योती खंडारे, सविता गव्हाळे, यशोदा खंडारे, अंजली बोचरे, प्रल्हाद देशमुख, श्याम कुटे, संदीप घोंगे, गोपाल बोचरे, रवी पाटोळे, सागर सावंग, प्रदीप सावंग, सुरेश पाटोळे, माला सातव, पूनम महाले, शारदा सातव, मंदा खंडारे, आशिष सावंग तसेच ग्रामस्थ उपस्थित होते. ग्रामस्थांनी निवेदन देऊन शाळेतील शिक्षिका व्यवहारे विद्यार्थ्यांना नियमित अध्यापन करत नसल्याची तक्रार केली. यामुळे विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक गुणवत्तेवर विपरीत परिणाम होत असल्याचा आरोप केला.

### शिक्षक नसल्याने विद्यार्थ्यांचे नुकसान

रोहणा येथील केंद्रीय मराठी प्राथमिक शाळेत शिक्षकांची कमतरता असल्याने विद्यार्थ्यांचे नियमित अध्यापन विस्कळीत होत असल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला आहे. यामुळे विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान टाळण्यासाठी तातडीने शिक्षकाची नियुक्ती करावी, नियमित अध्यापन सुरू करावे आणि शाळेतील शैक्षणिक व्यवस्था सुरळीत करण्यासाठी प्रशासनाने त्वरित निर्णय घ्यावा, अशी एकमुखी मागणी आंदोलनकर्त्यांनी केली.

# रिक्त पदांमुळे योजना रखडल्या!

प्रतिनिधी २८ जुलै

**खामगाव :** स्थानिक पंचायत समित्यांमध्ये विविध विभागांतील अनेक पदे दीर्घकाळापासून रिक्त असल्याने शासकीय योजनांच्या अंमलबजावणीवर परिणाम होत असल्याचे चित्र आहे. विशेषतः घरकूल योजनांची कामे रखडत असल्याने लाभार्थ्यांना मनस्ताप सहन करावा लागत आहे. रिक्त पदांमुळे प्रशासकीय कामकाजावर अतिरिक्त तक्रार ताण पडत असून, प्रकरणांचा निपटारा वेळेत होत नसल्याची नागरिकांकडून केली जात आहे.

### पंचायत समितीमधील चित्रः नागरिक वैतागले !

घरकूल योजनांसह विविध विकासकामे आणि नागरिकाभिमुख योजनांच्या अंमलबजावणीत विलंब होत आहे. यामुळे पंचायत समित्यांमधील रिक्त पदे तातडीने भरून प्रशासन सक्षम करावे आणि प्रलंबित कामांना गती द्यावी, अशी मागणी नागरिकांकडून करण्यात येत आहे. तसेच योजनांचा लाभ वेळेत मिळण्यासाठी आवश्यक मनुष्यबळ उपलब्ध करून देण्याची अपेक्षाही व्यक्त केली जात आहे.

# तीन महिन्यांतच टेंभुर्णा मार्गावर पुन्हा खड्डे, नागरिकांमध्ये नाराजी !

प्रतिनिधी २८ जुलै

**खामगाव :** तीन महिन्यांपूर्वी दुरुस्ती करण्यात आलेल्या खामगाव-टेंभूर्णा मार्गाची अवस्था पुन्हा जैसे थे होत असून, रस्त्यावर खड्डे पडले आहेत. सध्या या मार्गावर दोन ते तीन ठिकाणी मोठ-मोठे खड्डे पडले असून, वाहनचालकांना अडचणींचा सामना करावा लागत आहे. अनेक वर्षाच्या प्रतीक्षेनंतर मागील वर्षी या मार्गाचे नूतनीकरण करण्यात आले होते. यापूर्वी दुपदरी असलेला हा रस्ता चौपदरी करण्यात आल्याने वाहतूक सुलभ होईल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात होती; मात्र कामाचा दर्जा निकृष्ट असल्याचे काही महिन्यांतच स्पष्ट झाले आणि रस्ता पुन्हा खराब होऊ लागला. या पार्श्वभूमीवर नागरिकांनी तीव्र नाराजी व्यक्त केल्यानंतर सुमारे तीन महिन्यांपूर्वी संबंधित विभागाकडून रस्त्याची पुन्हा संपूर्ण दुरुस्ती करण्यात आली. तथापि, ही दुरुस्तीही अपेक्षित दर्जाची न झाल्याचे आता दिसून येत आहे. अल्पावधीतच रस्त्यावर पुन्हा खड्डे पडू लागल्याने कामाच्या गुणवत्तेबाबत प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. स्थानिक नागरिकांच्या मते, वारंवार होणाऱ्या दुरुस्त्यांनंतरही रस्त्याची स्थिती सुधारत नसल्याने सार्वजनिक निधीचा अपव्यय होत आहे, तसेच या मार्गावरून दररोज मोठ्या प्रमाणात वाहतूक होत असल्याने अपघातांचा धोका वाढला आहे. संबंधित विभागाने या प्रकरणाची गांभीर्याने दखल घेऊन कामाच्या दर्जाची चौकशी करावी व दोषींवर कारवाई करावी, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे. यासोबतच, रस्त्याची कायमस्वरूपी आणि गुणवत्तापूर्ण दुरुस्ती करण्याची अपेक्षाही व्यक्त केली जात आहे.

### रस्ता कामाच्या दर्जावर प्रश्नचिन्हः चौकशीची मागणी

# ग्रीन फाउंडेशन व जिजाऊ फिटनेस क्लबचा पर्यावरण संवर्धनासाठी पुढाकार

प्रतिनिधी २८ जुलै



**मलकापूर :** पृथ्वीचे वाढते तापमान, पर्यावरणाचा ढासळता समतोल आणि वाढत्या नैसर्गिक आपत्तींच्या पार्श्वभूमीवर पर्यावरण संवर्धनासाठी ग्रीन फाउंडेशन व जिजाऊ फिटनेस क्लब यांच्या संयुक्त विद्यमाने लक्ष्मीनारायण स्मशानभूमी परिसरात वृक्षारोपण मोहीम राबविण्यात आली. या मोहिमेत ५१ देशी वृक्षांची लागवड करण्यात आली असून त्यांचे संवर्धन व संगोपन करण्याचा संकल्पही सहभागी सदस्यांनी केला. ग्रीन फाउंडेशनतर्फे "३६५ दिवस दररोज एक तास पर्यावरणासाठी" हा संकल्प राबवित शहर हिरवेगार करण्यासाठी सातत्याने विविध शाळा, महाविद्यालये तसेच सार्वजनिक ठिकाणी वृक्षारोपण केले जात आहे. यासोबतच पूर्वी लावलेल्या वृक्षांची नियमित निगा राखून त्यांचे संरक्षण करण्याचे कार्यही फाउंडेशनकडून केले जात आहे. ग्रीन फाउंडेशनच्या आवाहनाला सकारात्मक प्रतिसाद देत जिजाऊ मॉर्निंग फिटनेस क्लबने २८ ते ३० जुलै दरम्यान सुरू असलेल्या या मोहिमेत श्रमदान करून सक्रिय सहभाग नोंदविला. ग्रीन फाउंडेशनच्या सदस्यांसह जिजाऊ फिटनेस क्लबच्या सदस्यांनी ५१ देशी वृक्षांची लागवड केली आणि भविष्यात या वृक्षांचे संगोपन करण्याची जबाबदारीही स्वीकारली. या उपक्रमासाठी स्थानिक नगरसेवक शिवराज जाधव यांनी नगरपालिकेच्या माध्यमातून जेसीबीच्या सहाय्याने परिसराची साफसफाई करून आवश्यक सहकार्य केले. मोहिमेत ग्रीन फाउंडेशन, जिजाऊ फिटनेस क्लब, लक्ष्मीनगर मित्रमंडळ, महारुद्र हनुमान मंदिर ट्रस्ट, शिवराय मित्र मंडळ तसेच परिसरातील पर्यावरणप्रेमी नागरिकांनी उत्स्फूर्त सहभाग घेत पर्यावरण संवर्धनाचा संदेश दिला.

# ग्रीनाथॉन मधून हरित खामगावचा संदेश

प्रतिनिधी २८ जुलै

**खामगाव :** येथील नगर परिषद आणि मिशन ओ २ यांच्या संयुक्त विद्यमाने रविवार, २६ जुलै रोजी आयोजित करण्यात आलेल्या ' ग्रीनाथॉन' खामगावकरांचा उपक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. दरवर्षीप्रमाणे

यंदाही मोठ्या उत्साहात झालेल्या या उपक्रमातून पर्यावरण संरक्षण, वृक्ष संवर्धन आणि 'हरित खामगाव'चा संदेश देण्यात आला. यावेळी नगराध्यक्ष अपर्णा फुंडकर यांच्या प्रमुख उपस्थितीत कार्यक्रमाला सुरुवात करण्यात आली. नगर परिषदेपासून ग्रीनाथॉनला सुरुवात होऊन जनुना तलाव येथे समारोप झाला. याठिकाणी ग्रीनाथॉनमध्ये सहभागी झालेल्या नागरिकांनी शहर परिसरात वृक्षारोपण करून पर्यावरण संवर्धनाची सामूहिक जबाबदारी अधोरेखित केली. तसेच निरोगी व आरोग्यदायी जीवनशैलीचा संदेशही या उपक्रमातून देण्यात आला. यावेळी विविध क्षेत्रांतील मान्यवर, मिशन ओ २ चे पदाधिकारी, सामाजिक कार्यकर्ते तसेच खामगावातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. या उपक्रमाच्या यशस्वी आयोजनाबद्दल सहभागी नागरिकांनी समाधान व्यक्त केले.

### खामगाव नगरपालिकेचा पुढाकार

# प्राचीन श्री माता महाकाली मंदिर येथे डॉ. राणा प्रतीकराजसिंह यांची भेट

## मंदिराच्या ऐतिहासिक वारशाला मिळाला उजाळा

प्रतिनिधी २८ जुलै



**मलकापूर :** नळगंगा नदीच्या तीरावर वसलेले प्राचीन श्री माता महाकाली (शाळुदेवी) मंदिर येथे सरदार श्रीमंत राणा बहादूर सोलंकी यांचे थेट वंशज श्रीमान डॉ. राणा प्रतीकराजसिंह यांनी भेट देत मंदिराच्या ऐतिहासिक वारशाला उजाळा दिला. यावेळी त्यांनी मंदिराच्या इतिहासाबाबत माहिती देताना सांगितले की, मलकापूर ते माहूरगड हा संपूर्ण परिसर पूर्वी कालीगढ म्हणून ओळखला जात होता. या परिसरावर राणा घराण्याचे अधिपत्य होते. श्री माता महाकाली (शाळुदेवी) हे राणा घराण्याचे आराध्य दैवत असून या मंदिराला घराण्यात विशेष महत्त्वाचे स्थान आहे. या ठिकाणी आपल्या घराण्यातील एका महिलेने सती गेले असल्याचा उल्लेख करत त्यांनी सांगितले की, पूर्वी नवरात्रोत्सवानंतर मोठ्या उत्साहात दसरा उत्सव याच ठिकाणी साजरा केला जात असे. तसेच पूर्वीच्या काळात प्रचलित असलेल्या बली प्रथेनुसार येथे बली देण्याची परंपराही होती. परिसराचे संरक्षण करणारे दैवत म्हणून महाकाली मातेला श्रद्धेने पूजले जात होते. मंदिराची देखभाल व जतन करण्याचे कार्य बैरागी परिवाराकडून वंशपरंपरागत पद्धतीने सुरू आहे. आपल्या धर्म, संस्कृती आणि परंपरांचे जतन करणे ही प्रत्येकाची जबाबदारी आहे. धर्मरक्षणासाठी आपल्या वीर योद्ध्यांनी वैयक्तिक आयुष्याची पर्वा न करता संघर्ष केला आणि देव, धर्म व देशाच्या संरक्षणासाठी योगदान दिले, असेही डॉ. राणा प्रतीकराजसिंह यांनी यावेळी सांगितले. याप्रसंगी मंदिराचे पुजारी महंत नगिनदास बैरागी यांनी डॉ. राणा प्रतीकराजसिंह यांचा मातेची चुनरी, शाल व श्रीफळ देऊन यथोचित सत्कार केला. त्यांच्या या भेटीमुळे प्राचीन श्री माता महाकाली मंदिराच्या ऐतिहासिक महत्त्वाला नव्याने उजाळा मिळाला.

# पम्पिंग हाउस व जॅकवेल बांधकामात अनियमितता




प्रतिनिधी २८ जुलै

**मलकापूर :** दि. 27 जुलै 2026 रोजी नगरपरिषद मार्फत धुपेश्वर येथे पम्पिंग हाउस व जॅकवेल चे बांधकाम सुरू असुन त्या बांधकामामध्ये ठेकेदाराकडून मोठ्या प्रमाणात अनियमितता व भ्रष्टाचार केला जात असल्याने

या कामांची तात्काळ चौकशी करून काम बंद करण्यात यावे या प्रमुख मागणीसाठी उपविभागीय अधिकारी साहेब यांच्या कार्यालय समोर भिवा भाऊ चोपडे यांनी अन्नत्याग आंदोलन सुरू केले आहे . या आंदोलनाची अनेक राजकीय पक्ष व सामाजिक संघटना नी दखल घेत या आंदोलनाला जाहीर पाठिंबा दर्शविला आहे. यावेळी भारतीय बौद्ध महासभेचे जिल्हाध्यक्ष राजेश भाई इंगळे, आर.पी. आय(A)गटाचे जिल्हाध्यक्ष भाऊसाहेब सरदार ,शिवसेना(ठाकरे) गटाचे जिल्हा उपप्रमुख गजानन भाऊ ठोसर, बहुजन समाज पार्टीचे जिल्हा प्रभारी धर्मपाल इंगळे, प्रहार संघटनेचे जिल्हा उपप्रमुख अजय टप, दिव्यांग फाउंडेशन चे अध्यक्ष निलेश भाऊ चोपडे यांनी आंदोलन स्थळी येऊन जाहीर पाठिंबा दर्शविला आहे.

# माती मिश्रित मुरुम टाकून खड्डे बुजवले; ग्रामीण पोलिस स्टेशनचा रस्ता चिखलमय !

## पावसात रस्ता धोकादायक; अपघाताची शक्यता वाढली!

प्रतिनिधी २८ जुलै

**खामगाव :** शहरातील ग्रामीण पोलिस स्टेशनकडे जाणारा रस्ता खड्डेमय असताना, या मार्गावरील खड्डे अखेर बुजविण्यात आले आहेत; मात्र हे काम मातीमिश्रित मुरुम टाकून केल्याने पावसामुळे रस्ता चिखलमय झाला आहे. त्यामुळे नागरिकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत असून, अपघाताची शक्यता वाढली आहे. सध्या रेल्वे अंडरपासचे काम सुरू असल्याने गेल्या तीन वर्षापासून रेल्वे गेट बंद आहे. त्यामुळे या मार्गावरील सर्व वाहतूक ग्रामीण पोलिस स्टेशनकडे जाणाऱ्या रस्त्यावर वळविण्यात आली आहे. परिणामी, या पर्यायी मार्गावर दररोज मोठ्या प्रमाणात वाहतूक होत असून, दुसरा पर्याय उपलब्ध नसल्याने हजारो नागरिकांना याच रस्त्याचा वापर करावा लागत आहे; मात्र रस्त्याची अवस्था अत्यंत खराब असून, वारंवार खड्डे पडत आहेत.

**तात्पुरत्या उपाययोजनांवर नागरिकांचा रोष!**

खड्डे बुजविण्याचे काम केवळ तात्पुरत्या स्वरूपात केल्याचा आरोप नागरिकांकडून केला जात आहे. निकृष्ट दर्जाच्या साहित्यामुळे काही दिवसांतच रस्त्याची पुन्हा दुरवस्था होत असल्याने प्रशासनाच्या कामकाजावर नाराजी व्यक्त केली जात आहे.

**कायमस्वरूपी दुरुस्ती करण्याची मागणी**

या परिस्थितीमुळे वाहतूक कोंडी, घसरणे तसेच लहान-मोठ्या अपघातांचा धोका वाढला आहे. या समस्येकडे प्रशासनाने लक्ष देऊन रस्त्याची दर्जेदार व कायमस्वरूपी दुरुस्ती तातडीने करावी, अशी मागणी नागरिकांनी केली आहे. तसेच, तात्पुरत्या उपाययोजनांऐवजी ठोस नियोजन करून नागरिकांना दिलासा देण्याची आवश्यकता व्यक्त केली जात आहे.

**चिखलामुळे वाढला अपघातांचा धोका!**

पावसाळ्यात मातीमिश्रित मुरुम चिखलात रूपांतरित होत असल्याने वाहनांचे नियंत्रण सुटण्याच्या घटना वाढल्या आहेत. दुचाकीस्वार घसरण्याच्या घटना वारंवार घडत असून, पादचाऱ्यांनाही चालताना त्रास सहन करावा लागत आहे. यामुळे या मार्गावर अपघातांचा धोका लक्षणीयरीत्या वाढला आहे.



# 31 जुलैपर्यंत पीकविमा भरण्याचे आवाहन

## नैसर्गिक आपत्तीपासून पिकांना मिळणार आर्थिक संरक्षण बजाज जनरल इन्शुरन्स कंपनी लिमिटेडची जिल्ह्यासाठी अधिकृत विमा कंपनी

प्रतिनिधी २८ जुलै

**बुलढाणा :** खरीप हंगाम २०२६-२७ साठी बुलढाणा जिल्ह्यात प्रधानमंत्री पीक विमा योजना लागू करण्यात आली असून, यंदा बजाज जनरल इन्शुरन्स कंपनी लिमिटेडची जिल्ह्यासाठी अधिकृत विमा कंपनी म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. नैसर्गिक आपत्ती, अवकाळी पाऊस, दुष्काळ तसेच कीड-रोगांमुळे होणाऱ्या पिकांच्या नुकसानीपासून आर्थिक संरक्षण मिळावे, यासाठी सर्व कर्जदार व बिगर कर्जदार शेतकऱ्यांनी ३१ जुलैपूर्वी पीक विमा भरावा, असे आवाहन जिल्हाधिकारी डॉ. प्रविणकुमार देवरे आणि जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी संतोष डाबरे यांनी केले आहे. शेतकरी आपल्या जवळील कॉमन सर्व्हिस सेंटर (CSC), महा-ई-सेवा केंद्र, बँक तसेच प्रधानमंत्री पीक विमा योजनेच्या अधिकृत पोर्टलद्वारे पीक विमा भरू शकतात. योजनेत सहभागी होण्यासाठी ३१ जुलै २०२६ ही अंतिम मुदत असून, त्यानंतर अर्ज स्वीकारले जाणार नाहीत.

त्यामुळे अंतिम दिवसाची वाट न पाहता वेळेत विमा भरून पिकांचे संरक्षण करावे, असे प्रशासनाने स्पष्ट केले आहे. विमा भरताना किंवा पिकाच्या नुकसानीची माहिती नोंदविताना अडचण आल्यास संबंधित तालुक्यातील बजाज जनरल इन्शुरन्स कंपनीचे तालुका समन्वयक किंवा तालुका कृषी अधिकारी कार्यालयाशी संपर्क साधण्याचे आवाहन जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी संतोष डाबरे यांनी केले आहे. जिल्हा व तालुका स्तरावर कंपनीचे प्रतिनिधी नियुक्त करण्यात आले असून प्रत्येक तालुक्यासाठी स्वतंत्र समन्वयक उपलब्ध आहेत. पीकनिहाय शेतकरी हिस्सा (प्रति हेक्टर विमा हप्ता) सोयाबीन रु. १,२५०, कापूस रु. १,३००, तूर- रु. ९४० मुग रु.७५, उडीद - रु. ६७. ५०, मका-रु. १०० प्रमाणे आहे. नैसर्गिक आपत्तीमुळे होणाऱ्या आर्थिक नुकसानीपासून संरक्षण मिळविण्यासाठी सर्व पात्र शेतकऱ्यांनी अंतिम मुदतीपूर्वी पीक विमा योजनेत सहभागी व्हावे, असे आवाहन जिल्हा प्रशासनाने केले आहे.

# डीबीटी पोर्टल दोन महिन्यांपासून बंद, विद्यार्थ्यांची शिष्यवृत्ती ठप्प

प्रतिनिधी २८ जुलै

**अकोला :** सामाजिक न्याय आणि विशेष सहाय्यता विभागाचे 'महा डीबीटी' पोर्टल जवळपास दोन महिन्यांपासून बंद असल्याने, शिष्यवृत्तीसाठी पात्र असलेले हजारो विद्यार्थी गंभीर अडचणींचा सामना करत आहेत. पोर्टल बंद असल्यामुळे, विद्यार्थ्यांकडून प्रवेशाच्या वेळी शिक्षण शुल्क, विकास शुल्क आणि इतर शुल्क आकारले जात आहे. अनेक विद्यार्थ्यांनी आरोप केला आहे की, काही महाविद्यालये या परिस्थितीचा गैरफायदा घेऊन विद्यार्थ्यांकडून मनमानी शुल्क आकारत आहेत.




### तात्काळ पुन्हा सुरू करण्याची मागणी

» 'महा डीबीटी' पोर्टलमुळे विद्यार्थ्यांची शिष्यवृत्ती ठप्प झाली आहे. अनेक महाविद्यालये विद्यार्थ्यांची कागदपत्रे रोखून धरत असून, त्यांच्या पुढील शिक्षणात अडथळा आणत आहेत. त्यामुळे, समाज कल्याण विभागाने लवकरात लवकर पोर्टल सुरू करावे अशी मागणी विद्यार्थी करीत आहेत

### विद्यार्थ्यांच्या शिष्यवृत्तीवर परिणाम

» 'महा डीबीटी' पोर्टलद्वारे शिष्यवृत्तीचा निधी थेट विद्यार्थी आणि महाविद्यालयांच्या खात्यात हस्तांतरित केला जातो. निर्वाह भत्त्यासह केंद्र सरकारच्या अनुदानापैकी ६० टक्के रक्कम थेट विद्यार्थ्यांच्या खात्यात जमा केली जाते. तर, राज्य सरकारच्या अनुदानापैकी ४० टक्के रक्कम महाविद्यालये आणि विद्यार्थ्यांना वितरित केली जाते. या रकमेचा उपयोग विद्यार्थ्यांचा निर्वाह भत्ता आणि महाविद्यालयीन शुल्क भरण्यासाठी केला जातो. गंभीर बाब म्हणजे शिष्यवृत्तीची रक्कम न मिळाल्यामुळे अनेक महाविद्यालयांनी विद्यार्थ्यांचे मूळ कागदपत्रे अडवून ठेवल्याचे विद्यार्थ्यांचे म्हणणे आहे त्यामुळे अनेक विद्यार्थ्यांना पुढील वर्गात प्रवेश घेणे आणि इतर महाविद्यालयात स्थलांतर करणे किंवा आवश्यक शैक्षणिक प्रक्रिया पूर्ण करणे अशक्य झाले आहे

# हेल्मेट सक्ती योग्य निर्णय, परंतु सिग्नल यंत्रणा सुद्धा सुरळीत करावी



## नागरिकांनी केले हेल्मेट सक्तीचे स्वागत

प्रतिनिधी २८ जुलै

**अकोला:** जिल्ह्यात एक ऑगस्ट पासून जिल्हा पोलीस अधीक्षक अर्चित चांडक यांनी दुचाकी वाहन चालकांच्या सुरक्षेसाठी हेल्मेट सक्ती अनिवार्य केली आहे. हेल्मेट सक्तीसाठी केवळ चार दिवस उरले आहेत. पोलिसांच्या कारवाईच्या भीतीने लोक मोठ्या संख्येने हेल्मेट खरेदी करत आहेत.

अपघातापासून स्वतःचे संरक्षण करण्यासाठी हेल्मेट सक्ती आवश्यक आहे. वाहतुकीचे कायदे सर्वांना लागू होतात. जर एखादा पोलीस अधिकारी किंवा कर्मचारी हेल्मेट शिवाय गाडी चालवताना आढळला तर सामान्य नागरिकाप्रमाणे त्याच्यावरही तात्काळ कारवाई केली जाईल, असे पोलीस विभागाने स्पष्ट केले आहे. नियमाची अंमलबजावणी करण्यापासून कोणालाही सूट दिली जाणार नाही या मोहिमेचा उद्देश दंड आकारून महसूल वाढवणे हा नसून रस्ते अपघातामध्ये जीव वाचवणे हा आहे.



जरी हा नवीन बदल स्वीकारणे कठीण असली तरी हेल्मेट घालण्याचा निर्णय स्वीकारला पाहिजे कारण तो वाहनचालकाच्या हिताचा आहे.



हेल्मेट सक्तीचा निर्णय योग्य आहे परंतु सर्वप्रथम शहरातील रस्ते सुधारणे आणि त्यानंतर हेल्मेट घालण्याची सक्ती लागू करणे आवश्यक होते



परंतु शहरातील रहदारी सुरळीत ठेवण्यासाठी ट्रॅफिक सिग्नल यंत्रणा सुद्धा नियमितपणे सुरू राहावे तसेच उद्दाम ऑटो चालकांवर सुद्धा कारवाई करावी



हेल्मेट घातल्याने आपलाच जीव वाचण्यास मदत होईल त्यामुळे यां नियमाचे सर्वांनीच पालन करावे कारण हा जनहिताचा निर्णय आहे.

# जुगार अड्ड्यावर पोलिसांचा छापा; 11 जण ताब्यात

## गोपाळ नगरातील घटना; गुन्हा दाखल

प्रतिनिधी २८ जुलै

**खामगाव :** शिवाजीनगर पोलिसांनी गोपाळनगर परिसरातील एका घरावर छापा टाकून सुरू असलेल्या जुगार अड्डयावर धडक कारवाई केली. या कारवाईत ११ जणांना ताब्यात घेण्यात आले असून ४७, ७५० रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. आरोपींविरुद्ध महाराष्ट्र जुगार प्रतिबंधक कायद्याच्या कलम ४ व ५ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिस हेडकॉन्स्टेबल अमरसिंग पवार यांच्या फिर्यादीनुसार, २७ जुलै रोजी दुपारी एका कौटुंबिक तक्रारीची शहानिशा करण्यासाठी पोलिस पथक गोपाळनगर येथे गेले होते. त्यावेळी उमेश जीवनसिंग चव्हाण यांच्या घराच्या वरच्या मजल्यावरील खोलीत काहीजण पैशांवर 'एक्का बादशहा' नावाचा जुगार खेळत असल्याची गोपनीय माहिती पोलिसांना मिळाली. पोलिस निरीक्षक मंदार पुरी यांच्या आदेशानुसार पंचांसह पथकाने घटनास्थळी छापा टाकला. यावेळी ५२ पत्त्यांच्या ताशावर पैशांची हारजीत लावून जुगार खेळणारे ११ जण रंगेहाथ आढळले. पोलिसांची चाहूल लागताच काही संशयित घटनास्थळावरून पसार झाले. कारवाईदरम्यान आरोपींकडून रोख रक्कम, विविध कंपन्यांचे मोबाइल फोन, जुगारासाठी वापरलेले ५२ पत्ते तसेच डावावर लावलेली रोकड असा एकूण ४७ हजार ७५० रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. संबंधित घर आरोपी उमेश जीवनसिंग चव्हाण यांच्या पत्नीच्या मालकीचे असल्याचे तपासात निष्पन्न झाले. ही कारवाई शिवाजीनगर पोलिस पथकाने केली.

# मोहसीन शेख मृत्यू प्रकरणात दोघांना अटक

## सीसीटीव्ही फुटेजच्या आधारे आरोपींचा शोध

प्रतिनिधी २८ जुलै

**अकोला :** शिवसेना शिंदे गटाच्या अल्पसंख्याक आघाडीचे जिल्हाध्यक्ष मोहसीन शेख समद यांच्या मृत्यूस कारणीभूत ठरलेल्या अपघात प्रकरणी खदान पोलिसांनी कारवाई करत दोन आरोपींना अटक केली आहे. तांत्रिक तपास, सीसीटीव्ही फुटेज आणि पोलिसांच्या कसून शोधमोहिमेच्या आधारे ही कारवाई करण्यात आली असून, गुन्ह्यात वापरण्यात आलेली मारुती इग्निस चारचाकी कारही जप्त करण्यात आली आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, २३ जुलै रोजी दुपारी २.२० वाजताच्या सुमारास मोहसीन शेख समद है विनानंबरच्या सुझुकी ॲक्सेस मोपेडवरून जात असताना भरधाव वेगाने येणाऱ्या मारुती इग्निस (क्र. एमएच-३०-बीडब्ल्यू-१२३७) या कारने त्यांच्या दुचाकीला पाठीमागून जोरदार धडक दिली. या अपघातात ते गंभीर जखमी झाले. त्यांना रुग्णालयात दाखल करण्यात आले; मात्र उपचारादरम्यान त्यांचा मृत्यू झाला. फिर्यादीच्या तक्रारीवरून खदान पोलीस ठाण्यात संबंधित वाहन चालकाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला. खदान पोलिसांनी विशेष पथक तयार करून शहरातील तसेच खदान परिसरातील सुमारे ३० सीसीटीव्ही कॅमेऱ्यांचे फुटेज तपासले. यातून गुन्ह्यातील चार आरोपींपैकी सोहन उर्फ पृथ्वीराज आनंद काळे (१८) रा. कौलखेड रिंग रोड, अकोला आणि आर्यन सुभाष पाटकर (१८) रा. कौलखेड, अकोला यांना अटक करण्यात आली. याशिवाय, आरोपींनी वापरलेली मारुती इग्निस कार (क्र. एमएच-३०-बीडब्ल्यू-१२३७) जप्त करण्यात आली आहे. प्रकरणातील उर्वरित दोन आरोपींचा शोध सुरू असून, त्यांना लवकरच अटक करण्यात येईल,असा विश्वास पोलिसांनी व्यक्त केला. ही कारवाई पोलिस अधीक्षक अर्चित चांडक, अपर पोलिस अधीक्षक रेड्डी आणि उपविभागीय पोलिस अधिकारी सुदर्शन पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस निरीक्षक मनोज केदारे, पोलिस उपनिरीक्षक विजय इंगळे, नीलेश खंडारे, भूषण मोरे, अभिमन्यू सदांशिव, जय मंडावरे, वैभव कस्तुरे, मंगेश खेडकर आणि शिवम दुबे यांनी केली.



# वाईन बारवर चोरट्यांचा डल्ला; विदेशी मद्य, रोकडसह डीव्हीआर लंपास

**पुसद :** शहरालगतच्या वरुड येथील एका वाईन बारमध्ये अज्ञात चोरट्यांनी घरफोडी करून विदेशी मद्य, रोकड आणि डीव्हीआर असा एकूण ₹३ लाख ३१ हजार १३० किमतीचा ऐवज लंपास केल्याची घटना उघडकीस आली. या प्रकरणी पुसद शहर पोलिसांनी अज्ञात आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल करून तपास सुरू केला आहे. वरुड येथील मानस वाईन बारचे चालक सतीश गणेशलाल जयस्वाल (वय ५४) यांनी २४ जुलै रोजी रात्री व्यवसाय आटोपून बार बंद केला होता. दुसऱ्या दिवशी (२५ जुलै) दुपारी सुमारे २.३० वाजता बार उघडण्यासाठी गेल्यानंतर पाठीमागील लोखंडी दरवाजा वाकवून अज्ञात चोरट्यांनी आत प्रवेश केल्याचे त्यांच्या निदर्शनास आले. चोरट्यांनी बारमधून ₹२ लाख ९२ हजार ७३० किमतीचे विदेशी मद्य, ₹२६ हजार ४०० ची रोकड आणि ₹१२ हजार किमतीचा डीव्हीआर असा एकूण ₹३ लाख ३१ हजार १३० किमतीचा मुद्देमाल चोरून नेला. घटनेची माहिती मिळताच पुसद शहर पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत पंचनामा केला. अज्ञात चोरट्यांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला.

# समान नागरी कायदा मसुदा समितीचे सदस्य न्या. मेहरे यांचा जिल्हाधिकारी कार्यालयात गौरव

प्रतिनिधी २८ जुलै



**अकोला :** समान नागरी कायदा मसुदा समितीवर महाराष्ट्र शासनाने माजी न्यायमूर्ती संजय मेहरे यांची नियुक्ती केली आहे. त्याबद्दल इंडियन रेड क्रॉस सोसायटीच्या वतीने जिल्हाधिकारी कार्यालयात रेड क्रॉस सोसायटीच्या अध्यक्ष तथा जिल्हाधिकारी वर्षा मीना यांच्या हस्ते गौरविण्यात आले. यावेळी इंडियन रेड क्रॉस सोसायटीचे मानद सचिव प्रभजीतसिंह बछेर, ॲड.महेंद्र साहू, ॲड. सुभाष मुंगी, संदेश रांदड,रामहरी डांगे, अमर गौड,कपिल रावदेव, राजू बुडकले, मोहन काजळे आदी उपस्थित होते. समान नागरी कायद्याचा मुख्य उद्देश सर्व नागरिकांना समान नियमांच्या कक्षेत आणणे आहे.

याबाबत नागरिकांची मते व अभिप्राय मागविण्यात येत असून, नागरिकांचे अभिप्राय महत्त्वाची भूमिका बजावतील असे प्रतिपादन समान नागरी कायदा मसुदा समितीचे सदस्य उच्च न्यायालयाचे माजी न्यायमूर्ती संजय मेहरे यांनी केले. प्रास्ताविक ॲड.सुभाषसिंग ठाकूर यांनी केले. बछेर यांनी सूत्रसंचालन केले. आभार सीए मनोज चांडक यांनी मानले.

# रतनलाल प्लॉट चौक ते छोटी उमरी मार्गाचे तातडीने चौपदरीकरण करा

## वाढती वाहतूक, अपघातांचा धोका नागरिकांची प्रशासनाकडे मागणी

प्रतिनिधी २८ जुलै

**अकोला :** शहरातील रतनलाल प्लॉट चौक ते छोटी उमरी हा अत्यंत वर्दळीचा मार्ग असून या रस्त्याचे तातडीने चौपदरीकरण करण्याची मागणी नागरिकांकडून जोर धरू लागली आहे. दिवसेंदिवस वाढणारी वाहतूक, वारंवार होणारी वाहतूक कोंडी आणि अपघातांचा वाढता धोका लक्षात घेता प्रशासनाने या मार्गाकडे तातडीने लक्ष देण्याची गरज व्यक्त होत आहे. अकोला शहराच्या वाढत्या विस्तारामुळे रतनलाल प्लॉट चौक ते छोटी उमरी हा मार्ग आज शहरातील महत्त्वाच्या आणि सर्वाधिक वर्दळीच्या रस्त्यांपैकी एक बनला आहे. या मार्गावर दररोज हजारो दुचाकी, चारचाकी, शालेय बस, मालवाहू वाहने आणि रुग्णवाहिकांची मोठ्या प्रमाणात ये-जा सुरू असते. मात्र अरुंद रस्त्यामुळे वाहतूक कोंडी ही नित्याची बाब बनली असून नागरिकांना मोठा मनस्ताप सहन करावा लागत आहे. वाहतुकीच्या वाढत्या ताणामुळे किरकोळ अपघातांची संख्याही वाढत असून पादचारी, विद्यार्थी, ज्येष्ठ नागरिक आणि महिलांना जीव धोक्यात घालून प्रवास करावा लागत आहे. शहराचा विस्तार आणि भविष्यातील वाहतुकीची गरज लक्षात घेता या मार्गाचे चौपदरीकरण हा केवळ विकासाचा नव्हे तर नागरिकांच्या सुरक्षिततेचाही महत्त्वाचा प्रश्न बनला आहे. स्थानिक नागरिक, व्यापारी आणि वाहनचालकांनी अनेकदा प्रशासनाचे लक्ष वेधण्याचा प्रयत्न केला असला तरी अद्याप कोणतीही ठोस कार्यवाही झालेली नाही. त्यामुळे या रस्त्याच्या चौपदरीकरणाचा प्रस्ताव तातडीने मंजूर करून कामाला सुरुवात करावी, अशी एकमुखी मागणी आता जोर धरत आहे. रस्त्याचे चौपदरीकरण झाल्यास वाहतूक कोंडी कमी होईल, अपघातांना आळा बसेल आणि शहराच्या विकासालाही मोठी चालना मिळेल. आता प्रशासन नागरिकांच्या या रास्त मागणीची कितपत दखल घेते, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.




# मलकापूर परिसरातील अतिक्रमण हटवले



प्रतिनिधी २८ जुलै

**अकोला :** शहरात ठिकठिकाणी करण्यात आलेले अतिक्रमण त्या परिसरातील रहिवासी तसेच यंत्रणेसाठी डोकेदुखी झाली आहे. मलकापूर भागात अस्थाई दुकाने तयार केली होती. त्यामुळे त्रास होता. सोमवारी महापालिकेच्या अतिक्रमण विरोधी पथकाने या भागात कारवाई केली. या भागात लोखंडी पाईप, बल्ल्याचा वापर करून दुकाने थाटली होती. या विरोधात ओरड होऊनही कारवाई होत नव्हती. अखेर महापालिका पथकाने सोमवारी या भागात मोहीम सुरू केली आणि परिसरातील अतिक्रमण काढले. त्यामुळे परिसर मोकळा झाला आहे. तसेच मुख्य रस्त्यावर झालेले अडथळे देखील दूर करण्यात आले. सोमवारी सायंकाळी उशिरा पर्यंत मोहीम सुरू होती. मुख्य मुद्दा हा आहे की एकदा हटवलेल्या जागेवर नव्याने अतिक्रमण धारक ठिय्या जमवू नये. याकडे लक्ष देणे आवश्यक आहे.

# बाळापूर किल्ल्यावरील राष्ट्रध्वजाची अवहेलना थांबवा

## नागरिकांत संताप, तातडीने बदलाची मागणी

प्रतिनिधी २८ जुलै

बाळापूरः ऐतिहासिक किल्ल्यावरील मुख्य प्रवेशद्वाराजवळ सुमारे ५० फूट उंच ध्वजस्तंभावर फडकणारा राष्ट्रध्वज फाटलेल्या अवस्थेत असल्याचे समोर आले आहे. अनेक दिवसांपासून ध्वज बदलण्यात न आल्याने नागरिकांनी तीव्र नाराजी व्यक्त केली असून स्थानिक प्रशासनाने तातडीने नवीन राष्ट्रध्वज लावावा, अशी मागणी केली आहे. स्थानिकांच्या माहितीनुसार, राष्ट्रध्वज सन्मानाने फडकविणे आणि नियमानुसार त्याची देखभाल करणे आवश्यक असताना फाटलेला ध्वज कायम असल्याचे दिसून येत आहे. याबाबत पुरातत्त्व विभागाकडे तक्रार करण्यात आली असून वरिष्ठ अधिकाऱ्यांना माहिती देण्यात आल्याचे संबंधित अधिकाऱ्यांनी सांगितले आहे. ध्वजस्तंभाची उंची सुमारे ५० फूट असून तो वायर-रोप यंत्रणेद्वारे कार्यरत आहे. यंत्रणेत तांत्रिक अडचण निर्माण झाल्यामुळे ध्वज खाली उतरविण्यात विलंब झाल्याचे सांगण्यात येत आहे. आवश्यक असल्यास हायड्रा किंवा अन्य यंत्रसामग्रीच्या साहाय्याने ध्वज उतरवून नवीन राष्ट्रध्वज फडकविण्यात येईल, असेही प्रशासनाकडून स्पष्ट करण्यात आले आहे. दरम्यान, बाळापूर किल्ला हा अकोला जिल्ह्यातील महत्त्वाचा ऐतिहासिक वारसा असून तो राष्ट्रीय संरक्षित स्मारक आहे. त्यामुळे अशा ठिकाणी राष्ट्रध्वज फाटलेल्या अवस्थेत राहणे योग्य नसल्याची भावना नागरिकांनी व्यक्त केली आहे. संबंधित विभागाने तातडीने कारवाई करून राष्ट्रध्वजाचा सन्मान कायम राखावा, अशी मागणी जोर धरत आहे. बाळापूर किल्ला हा राष्ट्रीय संरक्षित स्मारक असून त्याचे ऐतिहासिक महत्त्वही मोठे आहे.



# 'त्या' आदिवासी आश्रम शाळेची खासदार बळवंत वानखडे यांच्याकडून पाहणी

प्रतिनिधी २८ जुलै

**धारणी :** धारणी तालुक्यातील टिटंबा येथील आदिवासी शाळेतील जवळपास ५० ते ६० मुलांना विषबाधा झाल्याची गंभीर घटना घडली आहे. या सर्व विद्यार्थ्यांना उपचारासाठी उपजिल्हा रुग्णालय, धारणी येथे दाखल करण्यात आले आहे. या घटनेची गंभीर दखल घेत अमरावती लोकसभा क्षेत्राचे खासदार बळवंतभाऊ वानखडे यांनी आज उपजिल्हा रुग्णालय, धारणी येथे प्रत्यक्ष भेट दिली. यावेळी त्यांनी उपचाराधीन असलेल्या विद्यार्थ्यांच्या प्रकृतीची आस्थेने विचारपूस केली व उपस्थित वैद्यकीय अधिकाऱ्यांना विद्यार्थ्यांच्या उपचाराबाबत योग्य ती काळजी घेण्याचे कडक निर्देश दिले. त्यानंतर खासदार वानखडे यांनी थेट टिटंबा येथील आदिवासी शाळेला भेट देऊन तिथे उपस्थित विद्यार्थी आणि पालकांशी सविस्तर चर्चा केली. विद्यार्थ्यांच्या आरोग्याशी खेळणाऱ्या आणि गंभीर लापरवाही दाखवणाऱ्या आश्रम शाळेच्या अधीक्षक व मुख्याध्यापकांवर तात्काळ सखोल चौकशी लावून त्यांना निलंबित करण्याच्या स्पष्ट सूचना खासदार बळवंत वानखडे यांनी प्रकल्प अधिकारी शुक्ला यांना दिल्या आहेत. विद्यार्थ्यांच्या सुरक्षेबाबत व गैरव्यवहाराबाबत कोणतीही कसूर खपवून घेतली जाणार नाही, असा आक्रमक पवित्रा यावेळी खासदार महोदयांनी घेतला. यावेळी प्रामुख्याने राजकुमार पटेल ( माजी आमदार ) , प्रदिप शेवाळे ( तहसीलदार धारणी ) , चव्हाण साहेब ( ठाणेदार धारणी ), सहदेव बेलकर ( तालुका अध्यक्ष काँग्रेस कमिटी चिखलदरा ) , रोहित पटेल ( सभापती कृ.उ.बा.स. धारणी ) , पंकज मोरे ( नगरसेवक ) , राजाखान ( नगरसेवक ) , गोलू खान, कालूभाई मालवीय ( तालुकाध्यक्ष काँग्रेस कमिटी धारणी ) , मलिक शेख, शोएब मेमन, सौरभ लोखंडे यांच्यासह धारणी काँग्रेस कमिटीचे पदाधिकारी कार्यकर्ते, नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.



हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक प्रदीप पुंडलिकराव देशमुख यांनी सायरन ऑफसेट प्रिंटर्स एमआयडीसी क्र. २ पोलिस स्टेशन समोर ता. जि. अकोला येथे मुद्रित करून सिटी न्यूज सुपरफास्ट कार्यालय, उत्सव संकुल, गांधी रोड, अकोला येथे प्रकाशित केले.
■ मुख्य संपादक : प्रदीप पुंडलिकराव देशमुख ■ संपर्क - ०७२४ - २४३५५७३, २४४४७७४ ■ email- citynewss80@gmail.com, RNI No.- MAHMAR/ 2012 / 49642, RRC Helpline No. 8484842135